# अगस्त्य

## रामायण अरण्यकांड सर्ग - ११ - अगस्ति ऋषी

- प्रा. डॉ. भास्करराव खांडगे

**(१)** एक वैदिक ऋषी. याची व्याख्या अशी - 'अगं (विन्ध्यं) स्त्ययति इति' = विंध्य पर्वताच्या वृद्धीस प्रतिबंध करणारा (विग्रहकोश). अर्थात हे याचे मूळ नाव नसून, नंतरच्या आयुष्यात केलेल्या एका महत्कार्यामुळे त्याला मिळालेली ही गौरवपूर्ण उपाधी आहे. याच नावाने पुढे तो प्रसिद्ध झाला. याची पैतृक नावे मान्य व मांदार्य अशी दोन आहेत (क्र. ७.३३.१३). हा मित्रावरुणांचा पुत्र असून, वसिष्ठाचा सख्खा भाऊ आहे. एका सत्रात मित्रावरुण गेले असता तिथे आलेल्या उर्वशीवर त्यांची नजर पडली आणि तिच्याविषयी उत्पन्न झालेल्या अभिलाषेने त्यांचे वीर्य-स्खलन झाले. ते वीर्य वसतीवरी नावाच्या कुंभात पडले. त्यातून अगस्त्य व वसिष्ठ जन्म पावले. अगस्त्य कुंभाच्या मध्यातून जन्मला. (बृह. देवता ५.१३४) अगस्त्य हा कुंभातून म्हणजे आदिवासींच्या मातृरुप दैवतापासून जन्मला, अशी उपपत्ती डॉ. कोसंबी यांनी लावली आहे. अगस्त्य हा ऋग्वेदातल्या २६ सूक्तांचा द्रष्टा आहे.

पुढे हा खेलराजाचा पुरोहीत बनला. खेलाची पत्नी विश्पला पतीसमवेत शत्रूशी लढत असता दुर्दैवाने शत्रूच्या हाती सापडली व त्यांनी तिचा पाय तोडला. अगस्त्याला त्याबद्दल दु:ख झाले. त्याने तिच्यासाठी अश्विनी देवाचे स्तवन केले. त्या स्तोत्राने ते प्रसन्न झाले व त्यांनी विश्पलेला लोखंडाचा पाय जोडून दिला. (क्र. १.११८.८).

एकदा मरुतांसाठी आणलेला पशू इंद्राने पळविला. त्यामुळे मरुत हे वज्र घेऊन इंद्राला मारायला धावले. त्या वेळी अगस्त्याने मध्ये पडून तो संघर्ष टाळला व त्यांचे सख्य घडवून आणले. (क्र. १.१६५, १७०, ऐ. ब्रा. ५.१६). वैदिक आर्यांचा पुढारी इंद्र आणि त्याचे अनुयायी मरुत त्यांच्यामधला हा संघर्ष असावा. तो दूर करुन अगस्त्याने आर्यांचे ऐक्य अबाधित राखण्याचे कार्य केले असावे.

विदर्भ देशाची राजकन्या 'लोपामुद्रा' ही याची भार्या होय. ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळातले १७९ वे सूक्त हे अगस्त्य-लोपामुद्रा यांच्या संवादाचे आहे. तिथे लोपामुद्रा वृद्ध अगस्त्याला संभोगाविषयी प्रवृत्त करीत असताना दिसते. अगस्त्याने शेवटी तिच्या इच्छेला मान दिला आहे. याच्यापासून लोपामुद्रेला दृढास्यू नावाचा पुत्र झाला व तोच पुढे इध्मवाह या नावाने प्रसिद्ध झाला. अगस्त्य हा सर्व ऋषींत वृद्ध असल्यामुळे इंद्राने यालाच गायत्र्युपनिषद उपदेशिले व याने ते इषाला शिकवून त्याची परंपरा सुरु केली. (जै. उ. ब्रा. ४.१५.१,१६.१)

पुराणवाङमयात याला अग्नीचा अवतार मानले आहे (मत्स्य पु. ६१.२०१). अगस्त्य विरक्त होता, पण लोपामुद्रेची ऐश्वर्य भोगण्याची आसक्ती प्रबळ होती. तिची इच्छा पूर्ण करावी म्हणून हा द्रव्य मागण्यासाठी अनेक राजांकडे गेला. पण त्याला अपेक्षित धन कुठेच मिळाले नाही. शेवटी इल्वल दैत्याचा पराभव करुन त्याने त्याची अपार संपदा हस्तगत केली.

अगस्त्याचे मुख्य पराक्रम तीन - विंध्यविजय, समुद्रविजय व इंद्रविजय. हा प्रथम काशीत राहात असे. आर्यावर्तात दाटीवाटीकरुन पाहिलेल्या आर्यजनांना वसाहतीसाठी विंध्याच्या खालचा दक्षिणप्रदेश उपलब्ध करुन द्यावा, म्हणून हा त्या मोहिमेवर निघाला. त्यावेळी विंध्य पर्वत मेरुपर्वताशी स्पर्धा करण्यासाठी उंच वाढू लागला होता. अगस्त्याने त्याला नमविले व 'आपण दक्षिणेहून परत येईपर्यंत असाच नमून राहा' म्हणून सांगितले. कालकेय नावाचे दैत्य समुद्रात वास्तव्य करुन जगाला पीडा देत होते. त्यांचा नाश करण्यासाठी याने एकाच आचमनात समुद्र आटवून टाकला (म. भा. वन. १०४, १०५). याने द्वादशवार्शिक सत्र करुन पशुहिंसा न करताही इंद्राला पर्जन्यवृष्टी करायला भाग पाडले. (म. भा. आश्व. ९२). प्रजांच्या हितासाठी याने सर्व मृगांचे देवतोद्देशाने प्रोक्षण केले. त्यामुळे देव-पितृकार्यात मृगमांस अपर्ण करण्यास प्रत्यवाय उरला नाही. (म. भा. अनु. ११५). नहुष हा इंद्रपदावर बसला असता त्याने इंद्राणीच्या महालात जाण्यासाठी अगस्त्यादी ऋषींना आपली पालखी वाहायला लाविले. नहुष 'लवकर चल' या अर्थी त्याला 'सर्प सर्प' म्हणाला. तेव्हा अगस्त्याला क्रोध येऊन त्याने नहुषाला, 'तू सर्प होऊन धरणीवर पडशील' असा शाप दिला. महाभारताच्या अनुशासन पर्वात हा शाप अगस्त्याला जटेत बसलेल्या भृगूने दिला असे म्हटले आहे. (१.५७)

तामिळनाडू प्रदेशात अगस्त्याचे नाव आदराने घेतले जाते. ते लोक त्याला शिवाचा शिष्य, पारंगत विद्वान, वेदशास्त्रांचा प्रणेता, त्याचप्रमाणे अलौकिक शक्तीचा महर्षी मानतात. याने दक्षिणेत येऊन आर्य-द्रविड संस्कृतींचा समन्वय साधण्याचे महत्कार्य केले आणि उत्तर-दक्षिण हा भेद मिटवून सारा भारत एकसंघ करण्याचा प्रयत्न केला. पांड्य राजांचा कुलगुरु या नात्याने तो तिकडे प्रसिद्ध आहे. याने तमिळ भाषेचे अध्ययन केले व तिचे एक बृहत् व्याकरणही रचले अशी कथा सांगतात. याने आर्यभाषा आणि आर्यकथा यांचा तिकडे प्रचार केला आणि तमिळ साहित्याच्या अभिवृद्धीसाठी संघम्‌ची स्थापना केली. तामिळनाडूच्या प्राचीन इतिहास अगस्त्याच्या कथांनी ओतप्रोत भरलेला आहे. दक्षिणापथाच्या प्रवासात त्याने अनेक जंगले तोडून वसाहती उभारल्या. त्याला या कामी मदत करणाऱ्या दक्षिणेतील जमातींत वेळीर व अरुवालर या दोन जमाती मुख्य होत्या. तामिळ साहित्याचा पिता या नात्याने तिकडचे लोक याला भजतात. दक्षिणेत अगस्त्याच्या नावाशी संबद्ध अशी अनेक क्षेत्रे आहेत. त्यांत कर्नाटकातले वातापी (बदामी), कूर्गमधले ब्रह्मगिरी, आंध्रमधले द्राक्षारामम, तंजौर जिल्ह्यातले अगस्त्यम्‌पल्ली, तिरुनेलवेल्ली जिल्ह्यातले पोदियमलैव अगस्त्यवरम ही क्षेत्रे सर्वात प्रसिद्ध आहेत. प्राय: या सर्व प्रदेशात अगस्त्याची मंदिरे आहेत. या सर्वात पोदियमलैला विशेष महत्त्व आहे. पंचवटीतून निघाल्यावर या ठिकाणीच त्याने आपला मुख्य आश्रम स्थापित केला आणि इथूनच साऱ्या तामिळ देशात आर्यसंस्कृतीचा प्रचार केला. पण अगस्त्याचे पर्यटन इथेच समाप्त होत नाही. तिकडील लोकांचा असा विश्वास आहे, की त्याने समुद्र पार करुन यवद्वीप (जावा), बरहनद्वीप (बोर्निओ), सुमात्रा, सयाम इ. देशांत संचार करुन तिथेही आर्यसंस्कृतीचा पाया घातला.

आकाशात दक्षिणेकडे असलेल्या नौकापुंजातील एका ठळक ताऱ्याला अगस्त्याचेच नाव दिले आहे. तो भाद्रपदात उगवतो व त्याच्या उदयानंतर पावसाळ्यात

गढूळ झालेले नद्यांचे पाणी निवळते, असा साक्षात्कार आहे (रघु ४.२१).

आकाशात महाभारत आणि पुराणे यांत ज्या कथा आढळतात, त्यांचा त्यांच्या ऋग्वेदातील सुक्तांत आभासही मिळत नाही. तो उत्तरेहून दक्षिणेस गेला आणि विंध्याचा गुरु झाला, याचाही सुगावा ऋग्वेदात लागत नाही. त्यामुळे ''दक्षिणेत आर्यसंस्कृतीची पताका फडकविणारा अगस्त्य हा अगस्त्याच्या वंशातला दुसराच कोणीतरी पुरुष असावा'', असे श्री. राहुल सांकृत्यायन म्हणतात. मात्र हा कोणी अगस्त्य असेल तो साहसी, दूरदर्शी आणि संवावृत्तीचा असला पाहिजे, यात शंका नाही. संस्कृती प्रचारासाठी जिवाची तमा न बाळगता शेकडो कोसांच्या दुर्गम प्रवासाला निघालेला हा पहिला प्रवासी आहे, असे निरसंशय म्हणता येते. शकपूर्व ८०० वर्षे हा या पुरुषाचा काल असावा, असे डॉ. भांडारकर इ. पंडीतांनी मानलेले आहे. हा आर्यसंस्कृतीचा अग्रदूत आहे. दक्षिणेत यज्ञसंस्थेचे बीजारोपणही यानेच केले आणि त्याच्याच आदेशानुसार दक्षिणेचे अनेक राजे आणि सामंत यज्ञ करु लागले. कावेरी पूं पट्टिणम्च्या चोळ राजाला त्यानेच इंद्राप्रीत्यर्थ प्रतिवार्षिक २८ दिवसांचा उत्सव करायला सांगितले.

अगस्त्यगीता, अगस्त्यसंहिता, शिवसंहिता, द्वैधनिर्णयतंत, इ. ग्रंथ याच्या नावावर आहेत. अगस्त्याला ऋग्वेदाच्या ऋषितर्पणात स्थान नाही. पण हिरण्यकेशी शाखेच्या तर्पणात आहे. यावरुन सदर शाखा दक्षिणेकडची असावी व दक्षिणेत प्रमुख स्थान मिळविलेल्या अगस्त्याचा, त्या शाखेच्या तर्पणात अंतर्भाव झाला असावा. सुक्तकार अगस्त्य आणि आश्रमऋषी अगस्त्य हे दोघे भिन्न असावे, असे श्री. चापेकर म्हणतात (तर्पण), ते वरील राहुल सांकृत्यायनांच्या मताशी जुळलेले आहे. अगस्ति-अगस्त्य हे गोत्र आपस्तंब, माध्यंदिन व देशस्थ ऋग्वेदी या ब्राह्मणांत आढळते. पुराणांतील माहितीवरुन अगस्त्यवंशाच्या पौलस्त्य, पौलह आणि ऋतू अशा तीन शाखा असल्याचे दिसते. या वंशातील राजांची अगस्त्यांची मुले दत्तक घेतली, असे उल्लेख आढळतात. पाहा-लोपामुद्रा, दक्षिणापथ, तमिळ साहित्य (प्रा. च. को., क्र. आ., ऋ. द., त. सा. सं., वे. इं.)

(२) एक वैयाकारण. याचा काल सुमारे एक हजार वर्षामागचा. हा शूद्र जातीत जन्मला होता. हा कवी असून याला प्राचीन अगस्त्याचा अवतार मानतात. याचे अगस्त्यव्याकरण हे तमिळ भाषेचे पहिले व्याकरण मानतात. याशिवायही याचे बरेच ग्रंथ तमिळ भाषेत आहेत.

(३) दक्षिणेतला एक शिल्पशास्त्रज्ञ. आगस्तीय सकलाधिकार या ग्रंथाचा कर्ता. द. भारतातील मूर्तिकलेला याने वळण लावले. मूर्तीच्या प्रमाणांविषयी याने घालून दिलेले नियम आजमितीसही तिकडील कलाकार पाळतात. त्याच्या सकलाधिकार ग्रंथाची ११ प्रकरणे आलेली आहेत. त्यावरुन त्याच्या वेळी देक्षिणेस उदयाला आलेली मूर्तिकला कशा प्रकारची होती, हे कळून येते. शिवाच्या १६ प्रतिमांची माहिती त्याने दिलेली आहे. हा पहिल्या पांड्य राजाचा मंत्री व पुरोहित होता. असे सांगतात. (म.ज्ञा.का., त. सा. सं., स. काँ. सा. इं. क.)

■ ■ ■

# शिष्याद् इच्छैत पराजयम्

– प्रा. अशोक त्र्यंबक भाटे

शिष्याकडून पराजयाची इच्छा करावी. गुरुने शिष्याला स्वत:पेक्षा अधिक विद्वान केले कि, गुरु म्हणुन त्याचे ते मोठे यश असते. शिष्याचे यश म्हणजेच गुरुच्या ज्ञानाचा विकास होय. प्रत्येक पिढीमध्ये ज्ञानाच्या प्रगतीचे पाऊल पुढेच पडले पाहिजे.

आमचा विद्यार्थी प्रकाश रविंद्र सोमणी याचे बाबतीत हेच म्हणता येईल की, वरील विचार त्याने सार्थ ठरविलेले आहेत.

सन १९९१ मधे प्रकाशने अकोले महाविद्यालयात प्रथम वर्ष विज्ञान या वर्गात प्रवेश घेतला. एक शांत नाजूक शरीरयष्टीचा अबोल विद्यार्थी. खरं म्हणजे एकाच गल्लीमधे राहात असूनसुद्धा प्रकाशची जवळून व खरी ओळख झाली ती त्याने बी. एस्सी. पदवीसाठी स्पेशल विषय म्हणुन पदार्थ विज्ञान (फिजिक्स) हा विषय निवडला तेव्हा.

तसा तो या वर्गातही शांतच होता. मात्र त्याच्या अंगचा चिकाटी हा गुण या वर्षी प्रकर्षाने लक्षात आला. पदार्थविज्ञान विषयातील अनेक क्लिष्ट उदाहरणे तो स्वत: सोडवून नंतर शिक्षकांकडून तपासून घेत असे. साधारणत: पाच ते सहा गुणांसाठी जो कॉम्प्युटर प्रोग्रॅम परीक्षेस विचारला जातो अशा प्रकारचे शंभर ते सव्वाशे प्रोग्रॅम्स प्रकाशन परीक्षा तयार करुन ते माझ्याकडून तपासून घेतल्याची आठवण माझे सहकारी प्रा. दातीर यांनी सांगितली. शिक्षण घेताना त्याच्यातील जिद्द नेहमीच दृष्टोत्पत्तीस आली. त्याची शारिरीक तसेच घरची आर्थिक परिस्थितीही सर्वसाधारणच होती. परंतु अशी परिस्थिती हा काही दोष नाही. त्याने कुणाचीही योग्यता कमी होत नाही. मनुष्याची योग्यता त्याच्या गुणावगुणांवर अवलंबून असते. त्याच्या आर्थिक स्थितीवर नाही हे प्रकाशने सिद्ध करून दाखविले.

असा हा विद्यार्थी परिक्षेतील गुणसंपादनात मात्र श्रीमंत होता. सन १९९४ मध्ये त्याने ७८% गुण मिळवून पदार्थविज्ञान (फिजिक्स) विषयात विशेष प्राविण्यासह बी.एस्सी. पदवी संपादन केली.

ज्ञानार्जनाची तृष्णा समजविण्यासाठी त्याला महाविद्यालयातून विश्वविद्यालयात जाणे क्रमप्राप्तच होते. पुणे विश्वविद्यालयात त्याने एम. एस्सी. पदार्थविज्ञान या वर्गात प्रवेश घेतला. पुण्यासारख्या ठिकाणी राहून विद्यार्जन करणे अत्यंत खर्चिक असले तरीसुद्धा त्यातून मार्ग काढून प्रकाशने सन १९९६ मधे यशस्वीरित्या एम.एस्सी. पदवी मिळविली. शिक्षणाची ही वाटचाल चालत असतांना त्याने कधीही आर्थिक अडचणी सांगितल्याचे मला आठवत नाही. उच्च शिक्षणाचा ध्यासच त्याने घेतला होता.

एम.एस्सी. नंतर पुणे विद्यापीठातच रिसर्च फेलो म्हणून फिजिक्स डिपार्टमेंटला जॉईन झाला. एक ते दीड वर्ष त्या ठिकाणी काम केल्यानंतर त्याने (एन.सी.एल.) राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा पुणे येथे तेच काम पुढे चालू ठेवले. एन. सी. एल. मधूनच त्याने दि. ८/३/२००२ रोजी भौतिक शास्त्रात म्हणजेच फिजिक्स विषयात डॉक्टरेट ही पदवी संपादन केली व आमचा प्रकाश हा डॉ. प्रकाश सोमणी झाला.

या पदवीसाठी याला डॉ. एस्. राधाकृष्णन यांचे मार्गदर्शन लाभले. या पदवीसाठी याने केलेले 'रंग संवेदनशील विद्युतवाहक पॉलिमर्सचे प्रकाशविद्युतिय उपयोग'' हे काम महत्त्वाचे मानले जाते.

दरम्यानच्या काळात सोमणी याने (सी.एम.इ.टी.) सेंटर फॉर मटेरियल्स ऑफ इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी'' पुणे ही केंद्र सरकारच्या अधिपत्याखालील संशोधन संस्था फॅकल्टी मेंबर म्हणून जॉईन केली.

संशोधन क्षेत्रात प्रकाशची आता घोडदौड सुरु झाली होती. त्याने यशस्वीरित्या रंगविद्युतीय दर्शकाची निर्मिती केली. अशा प्रकारचा दर्शक इतर दर्शकांपेक्षा अधिक उपयुक्त मानला जातो. प्रचलित ''लिक्वीड क्रीस्टल डिस्प्ले (द्रव-स्फटिक दर्शक) मध्ये बघणाऱ्या व्यक्तीचा पडद्यावरील चित्राकडे बघण्याचा कोन बदलला तर दर्शकावरील चित्र योग्य प्रकारे दिसत नाही. हा दोष डॉ. सोमणी याने केलेल्या रंगविद्युतीय दर्शकात दूर झालेला आहे. वातावरणातील

आर्द्रतेच्या प्रमाणानुसार रंग बदलणारे पॉलिमर्स सुद्धा डॉ. सोमणी यांनी तयार केले आहेत. अन्न गोठवण प्रक्रियेमध्ये अशा प्रकारचे पॉलिमर्स उपयुक्त ठरु शकतात.

प्रकाश आता ज्ञानसागराच्या अंतर्भागात डुंबत होता. उच्च पिझो-रेझिस्टीव्हीटी असणारे विद्युतवाहक पॉलिमर्स संयुगे शोधून त्याचा उपयोग प्रेशर-सेन्सर्समध्ये करण्यावरही त्याने संशोधन केले आहे. विद्युतवाहम पॉलिमर्सची रंग संवेदनशीला व वाहकता वाढविणे हा याच्या संशोधनाचा प्रमुख भाग आहे.

अशा प्रकारे यशस्वीरित्या संशोधनकार्य करत असतानाच इटली या देशातील बोलोना ''सी. एन.आर. इन्स्टिट्यूट ऑफ मॉलेक्यूलर स्पेक्ट्रोस्कोपी'' येथे पुढील संशोधन कार्यासाठी ''व्हिजिटींग सायंटिस्ट'' (अभ्यागत शास्त्रज्ञ) म्हणून निवड झाली. परदेशगमनासाठी सुरुवातीलाच आर्थिक प्रश्न निर्माण होतो. शिवाय आहे ती केंद्र सरकारची कायमस्वरुपी पगारी नोकरी सोडून जायचे. घरच्यांचा विरोधच होता. कर्ज काढण्याशिवाय पर्याय नव्हता.

मला आठवतंय, प्रकाशचे वडील श्री रविंद्र सोमणी मला भेटले व मला आग्रह केला की, तुम्ही तरी त्याला परदेशी जाण्याच्या विचारांपासून परावृत्त करा. परंतु ज्याला विद्यार्जनाची भूक लागली आहे आणि विद्या मिळवितांना येणाऱ्या संकटांची फिकीर न करता इतर सर्व गोष्टी विसरुन अभ्यासावर आपले लक्ष केंद्रीत करतो तोच खरा विद्यार्थी होय.

हल्ली शिक्षण म्हणजे एक प्रकारची चाकरी करुन भाकरी मिळविण्याचा धंदा झाला आहे. हे शिक्षण नव्हे हमाली आहे व त्यापासून राष्ट्राचा उत्कर्ष न होता उलट अवनति होण्याचा संभव आहे, अशा प्रकारचे विचार असणारा प्रकाश थांबतोय थोडाच?

वडीलांशी चर्चा करुन व त्यांची भिती निरर्थक असल्याचे पटवून दिल्यामुळे प्रकाशचा परदेशगमनाचा मार्ग मोकळा झाला. डॉ. प्रकाश सोमणी हे २४/६/२००२ रोजी इटलीसाठी मार्गस्थ झाले.

तेथे त्यांनी ऑरगॅनिक व इनऑरगॅनिक हायब्रिड सोलर सेल तसेच पॉलिमरीक सोलर सेल यावर त्यांचे संशोधन चालू आहे. सोलर सेलची कार्यक्षमता वाढविणे, लवचिकता वाढविणे, निर्मितीमूल्य कमी करणे ही त्यांची उदिष्ट्ये आहेत.

या संशोधनात 'नॅनो तंत्रज्ञान'' या नवीन तंत्रज्ञानाचा वापर त्यांना करावा लागणार आहे. नॅनो म्हणजे एक अब्जांश उदा नॅनो सेकंद म्हणजे एक सेकंदाचा एक अब्जांश इतका लहान भाग किंवा नॅनोमीटर म्हणजे एक मीटरचा एक अब्जांश इतका लहान भाग. अशा सुक्ष्म स्तरावरील विज्ञान व तंत्रज्ञान म्हणजे नॅनोसायन्स व नॅनोतंत्रज्ञान होय.

विविध आंतरराष्ट्रीय मासिकांमध्ये त्यांचे वीस शोधनिबंध प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांचे नावांवर तीन पेटंटस्‌ची नोंद झालेली आहे. त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये आपले शोधनिबंध सादर केलेले आहेत. मार्क यांच्या हूज-हू-इन द वर्ल्ड मध्ये त्यांचे नाव समाविष्ट करण्यात आलेले आहे.

''फिजिक्स ऑफ पार्टिकल्स न्युक्लिआय अँड मटेरियल्स - रिसेंट ट्रेन्डस्'' या संशोधनपर पुस्तकात डॉ. प्रकाश सोमणी यांचे योगदान आहे. जवळजवळ पाच आंतरराष्ट्रीय विज्ञानविषयक जर्नल्समध्ये त्यांचा सल्लागार म्हणून सहभाग आहे.

त्यांच्या सध्याच्या संशोधनात ''ऑरगॅनिक अँड मॉलेक्यूलर इलेक्ट्रॉनिक सेन्सर्स, मॅग्नेटोऑप्टो इलेक्ट्रॉनिक्स स्पिनट्रॉनिक्स, डिव्हाइस फिजिक्स हे विषय मोडतात.

डॉ. सोमणी नुकतेच सप्टें. २००३ मधे भारतात येऊन गेले. त्यावेळी अगस्ति कला वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालयाच्या फिजिक्स डिपार्टमेंटच्या वतीने त्यांच्या मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांना विज्ञान विभागातील विद्यार्थ्यांसमोर आपल्या शैक्षणिक प्रवासाचा इतिहास कथन करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचवेळी नोबेल पारितोषिक विजेत्या संशोधकासमवेत काम करण्याची संधी मिळण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले.

एखादी संशोधन संस्था उभारुन माझ्या ज्ञानाचा उपयोग करुन समस्त मानवजातीस उपयुक्त ठरणारे 'मटेरियल सायन्स, सॉलिड स्टेट फिजिक्स, रसायनशास्त्र यावर संशोधन करणे असे महान उद्दिष्ट डोळ्यापुढे असणारा आमचा हा विद्यार्थी खरोखरच अभिमान वाटावा असा नव्हे काय ?

अल्पवयातच संशोधन क्षेत्रात उत्तुंग भरारी घेणाऱ्या आमच्या या माजी विद्यार्थ्याचे संशोधन कार्य असेच बहरत राहो हिच सदिच्छा.

■ ■ ■

# सामाजिक समता, छुपे शत्रू ओळखा.

- प्राचार्य रमेशचंद्र खांडगे

''मानवाच्या इतिहासाचे समग्र आकलन करुन घ्यायचे असेल. तर मानवाने आपल्या केलेल्या संघर्षाचा इतिहास समजून घ्यावा लागेल'', असे थोर विचारवंत थॉमस कार्लाईल याने म्हटले आहे. वास्तविक पाहता परमेश्वराने मानवाची निर्मिती करताना कोणतेही भेदाभेद निर्माण केलेले नाहीत. नैसर्गिकरित्या जे काही शारीरिक भेद असतील ते वगळले तर यच्चयावत मनुष्य हा समानच दिसतो. विविध कालखंडातील सर्व तत्त्वज्ञांनी व संतांनी हीच शिकवण घालून दिलेली आहे. वसुधैवकुटुंबकम असे आपल्या संस्कृतीत म्हटले आहे तर भेदाभेद अमंगळ असे संत तुकारामांचे प्रसिद्ध वचन आहे. असे असले तरी आपल्या इतिहासामध्ये मानवाने मानवाच्या विरुद्ध ठायीठायी संघर्ष केलेला आपल्याला दिसून येतो. कोणीही, कोणाशीही अथवा कोणत्याही कारणाने का होईना मानवातील दोन समूह एकमेकांच्या विरुद्ध कधी सत्तेसाठी, कधी धर्मासाठी, कधी संपत्तीसाठी तर विविध महाकाव्यात वर्णन केल्याप्रमाणे एखाद्या अलौकिक सौंदर्यवती स्त्रीसाठी एकमेकांसमोर उभे ठाकलेले ठायीठायी पहावयास मिळतात. सीतेकरिता रामायण घडले तर द्रौपदीकरिता महाभारत. ट्रॉयच्या हेलनसाठी ट्रोजन आणि ग्रीक ९ वर्षे एकमेकांशी झगडलेले आहेत. पुरातन काळातील दाखले पाहता युरोपातील धर्मयुद्धे अथवा रशियन, फ्रेंच, अमेरिकन या देशातील क्रांतीचा इतिहास पाहिला किंवा अगदी अलीकडे अमेरिकेने व्हिएतनाम, अफगाणिस्तान अथवा इराक यांमध्ये विविध बहाण्यांनी केलेली युद्धे पाहिली तर हे सत्य प्राप्त होते व व्यापक अथाने ही युद्धे एकही प्रश्न सोडवू शकली नाहीत. उलट एका युद्धातून नकळत दुसऱ्या युद्धाची निर्मिती हात असते. महायुद्धाच्या इतिहासातसुद्धा दोन किंवा अधिक राष्ट्रे एकत्र येऊन त्यांनी भूप्रदेशासाठी किंवा आपले तथाकथित प्रश्न सोडविण्यासाठीच प्रयत्न केलेले आहेत. तात्पर्य - मानवाच्या इतिहासात एका बाजूला विविध क्षेत्रातील उत्तुंग प्रगतीची झेप तर दुसऱ्या बाजूला संकुचित मनाच्या मूलभूत अधिकाराचा साक्षेप करण्याचा विकृत प्रयत्न या वाटचालीत दिसून येतो. अशा राष्ट्रांत होणारा संघर्ष हा स्थूलमानाने समजून घेण्याचा अथवा इतिहासकारांना त्यांचे विश्लेषण करण्यास सोपा असतो. आपल्या देशात असा संघर्ष नाही. उलट आपल्या देशावर युरोपियनांचे आक्रमण होईपर्यंत एकंदर ३८ वेळा हिंदुकुश पर्वतांच्या मार्गे विविध परकीय आक्रमणे झालेली आहेत आणि यातून आजच्या भारतीय संस्कृतीची जडणघडण झालेली आहे. युद्धाचे जसे दुष्परिणाम असतात, तसेच काही चांगले परिणामही असतात. सामाजिक अभिसरण हा त्यातील एक अत्यंत चांगला परिणाम आहे. राम आणि रावणाच्या संघर्षात आर्यद्रविड या दोन संस्कृतीतील संघर्ष होता. त्यातील तथाकथित भारतीय संस्कृतीचे अभिसरण होऊन आजची वैशिष्ट्यपूर्ण अशी ओतप्रोत भरलेली भारतीय संस्कृती दिसून येते आणि त्या सर्वांचा जर विचार केला तर आजच्या भारत वर्षामध्ये कोणीही आपली जात शोधण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्या पदरी निराशाच येईल आणि जे सत्य राहून गेले ते सत्य छातीठोकपणे, अतिशय अभिमानाने जगाला सांगावे, असे खचितच नसेल. भगवान श्रीकृष्णांनी भगवत् गीतेमध्ये 'वर्णसकर' अशी एक संकल्पना मांडलेली आहे. तथापि आजच्या भारतवर्षामध्ये कोणत्याही जातीत वा पोटजातीत वर चर्चा केलेल्या दुर्गुणांवर नजर टाकली तर असत्यपणा हा औषधालाच सापडेल.

हे सत्य एकदा सर्वांनी प्रामाणिकपणे मान्य केले की,

कोणीही कोणालाही जातीच्या नावाने श्रेष्ठ-कनिष्ठ समजू नये, हे अतिशय यथार्थपणे प्रत्येकाला समजेल. परंतु या सत्याचा सहजपणे स्वीकार करील, तो मानव कसला ? आणि हे सत्य सगळ्यांना समजले तर विविध धर्मातील धर्ममार्तंडांची दुकाने कशी चालणार ? त्यामुळेच एकविसावे शतक उजाडून तीन वर्षे होत आली तरी प्रचंड प्रमाणात कुंभमेळे भरतात. साधूंची शाहीस्नाने होतात. त्यांनी 'पवित्र' केलेल्या पाण्यामध्ये जनता जनार्दन पवित्र स्नान करण्यात धन्यता मानतात आणि हे दृश्य सर्व प्रसारमाध्यमांतून सर्वसामान्य जन अतिशय भक्तीभावाने बघत आहेत. एवढेच नव्हे तर ज्या तथाकथित धर्माच्या व्याख्या करताना आपण विश्व हे कुटुंब मानावे, त्याच कुटुंबातील हे तथाकथित साधू-संत आपल्यापासून शंभर फुटांवर ४०-५० माणसे मरतात हे समजले तरी त्यांचे धार्मिक सोपस्कार थांबवित नाहीत किंवा सर्वसामान्य जनतेची कोणत्याही प्रकारची चौकशीसुद्धा करीत नाही हा खरा धर्म असेल काय ? असा प्रश्न पडतो.

गरीबीपोटी एखादा अज्ञानी अथवा अशिक्षित माणूस दारू अथवा तत्सम पदार्थ विकून उदरनिर्वाह करण्याचा प्रयत्न करीत असेल तर या देशातील कायदे त्याच्यावर चाल करून जातात आणि दुसऱ्या बाजूला राजरोसपणे दिवसाढवळ्या विविध पोलीस स्टेशनमध्ये जमलेला गांजा साधूंच्या चरणी समर्पित केला जातो. उपमुख्यमंत्र्यांना धक्काबुक्की होऊन साधू-संतांवर काहीच कारवाई होत नाही. एवढेच नव्हे तर धर्माच्या नावाखाली या देशातील सर्व कारखानदार, व्यापारी कामाला लागतात. अब्जावधी रुपयांचा चुराडा होतो व दुसऱ्या बाजूला सर्वसामान्यांचे मूलभूत प्रश्न तसेच राहतात. गावोगावी महिलांना स्वच्छतागृहे नाहीत. प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सुविधा नाहीत. शाळांना इमारती नाहीत. विना अनुदान शिक्षकांना तर पगार नाहीच. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर आहे आणि अगदीच ज्वलंत प्रश्न बघायचा तर वैद्यकीय शिक्षणाचा, देशातील सर्वधर्मीयांचे हे सर्व मेळे व त्यातील अनावश्यक खर्च व उधळपट्टी जर थांबविली तर किती मेडिकल कॉलेजेस निघतील, हा संशोधनाचा विषय ठरेल.

एक साधा प्रश्न मनात उरतो की, हे इतरांना कळत नसेल काय ? याचे उत्तर होय असेच आहे, पण आपल्या देशात ''ते कळतं पण वळत नाही'', अशी म्हण आहे, त्या म्हणीला अनुसरून वळवून घेणे हे काही लोकांना गैरसोयीचे आहे आणि वर नमूद केल्याप्रमाणे समाजामध्ये विविध ब्रँडखाली दुकानदार नांदत आहेत. त्याचा परीणाम आज ठिकठिकाणी होणाऱ्या दंगली, बॉम्बस्फोट किंवा अतिरेक्यांचे हल्ले अथवा विविध प्रार्थनास्थळांवर होणारे हल्ले या सगळ्यांच्या मागे समाजातील सर्वसामान्य माणसांना भडकावणारे हे धर्मांध ठेकेदारच आहेत.

आज प्रत्येक गावात विविध देवतांची अनेक मंदिरे आहेत. अल्पसंख्याकांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांची प्रार्थनास्थळे पाहिली असता प्रार्थनास्थळांमधून ईश्वर अथवा त्यांचे प्रेषित त्यांचा संदेश पोहोचविण्याचे काम करीत असतात, असे निदर्शनास येते आणि कोणत्याही धर्माच्या धर्मग्रंथात द्वेषाचा पुरस्कार केलेला दिसत नाही.

हे सर्वमान्य सत्य आहे. असे असताना मिरवणूकीवर एकाएकी दगडफेक कशी काय होते ? काही क्षणातच स्फोटके, हत्यारे विविध प्रार्थना स्थळांत कशी सापडतात. गावोगावी लाखो रुपये खर्चून विविध संतांचे अखंड हरिनाम सप्ताह साजरे केले जातात. त्यांच्या हिशोबाच्या बैठका या हिंसक का होतात आणि या संतांची शिकवण विविध दंगली अथवा धार्मिक तणावाचे प्रसंगी उपयोगी का येत नाहीत. नौखालीतील दंगलीमध्ये मोहनचंद करमचंद गांधी हा एक फाटका संत निर्भयपणे एका दंगलग्रस्त भागात फिरू शकला. हल्ली होणाऱ्या दंगलीमध्ये एखादा शंकराचार्य, एखादा मौलवी अथवा एखादा फादर हे धैर्य का दाखवू शकत नाही ! कुंभमेळ्याच्या हजारो साधूंच्या गलबलीत एखादा गाडगे महाराज अथवा एखादा तुकडोजी महाराज का समोर येऊ शकला नाही.

हे सर्व प्रश्न सुजाण माणसांस अस्वस्थ करणारे

आहेत तरी त्यांची उत्तरे शोधण्यासाठी फार बुद्धीची अथवा ज्ञानाची गरज नाही. लहानपणी वाचलेली गोष्ट आठवते, ''कसे का होईना पण लांडग्याला कोकरू खायचे असते'' याच न्यायाने या देशातील सर्वच राजकीय पक्षांना 'सत्तासुंदरीची लालसा' आहे. ती सुंदरी प्राप्त होण्सासाठी हे सर्व खटपटी करीत होते, करीत आहेत, करीत राहतील. हे सत्य आजपर्यंत सर्वसामान्य माणसास समजून घेता आले नाही. धार्मिक उन्माद विसरून आपापसातील सामंजस्य, साहचर्य यांसारखे प्रयत्न या दुकानदारांनी कधीच केले नाहीत. उलटपक्षी आपली दुकानदारी तेजीत चालण्यासाठी जनतेच्या धार्मिक भावनांना उघड उघडपणे हात घालून त्यास खतपाणीच घातले आहे.

आज 'वही बनायेंगे' आ आमचा खराखुरा अजेंडा आहे. सध्या तात्पुरता तो गुंडाळून ठेवला आहे. पुरेशा खासदारांची संख्या जवळ आल्यानंतर सर्व देश पुन्हा एकदा धर्मयुद्धाच्या खाईत नेऊन ठेवणार आहोत, हे सांगायला कोणताच नेता कचरत नाही. अगदी अलीकडे सुप्रीम कोर्टाने नरेंद्र मोदी सरकारवर काही ताशेरे ओढले होते. विविध वर्तमानपत्रांच्या कौल पाहणीत बहुसंख्यांचे मत मोदी सरकारने राजीनामा देऊ नये, असे होते. 'समूहमन' जर अशा प्रकारे भावनांच्या आहारी जाऊन हिंसक होत असेल तर या देशाला कोणीही वाचवू शकणार नाही.

■ ■ ■

सुभाषित सरिता

**राजकारण**

अविश्रामं वहत् भारं, शीतोष्णं च न विन्दति ।
ससंतोषस्तथा नित्यं, त्रीणि शिक्षेत गर्दभात् ।।

तो (गाढव) अविश्रान्तपणे (बिनतक्रार) ओझी वाहील आणि थंडी व ऊन त्याला कधी लागत नाही, बाधत नाही आणि नेहमी तो समाधानी असाते. त्याला खायला काहीही चालते. कष्टाळू, सहनशीलता व अल्पसंतुष्टता हे गुण माणसाने गाढवापासून शिकण्यासारखे आहे.

कच्चित् राष्ट्रे तडागानि पूर्णानि च बृहन्ति च ।
भागशः विनिविष्टानि, न कृषिः देवमातृका ।।

नारदमुनी युधिष्ठिरास विचारतात - ''तुझ्या राज्यात योग्य ठिकाणी खोदलेले मोठे व पाण्याने भरलेले असे तलाव आहेत ना ? शेती केवळ पाऊसावर अवलंबून नाही ना?

न अराजके जनपदे स्वकं भवति कस्यचित् ।
मत्स्या इव जनाः नित्यं भक्षयन्ति परस्परम् ।।

दशरथाच्या मृत्यूनंतर अराजक माजू नये म्हणून, राजा नेमण्याविषयी वसिष्ठ ऋषी म्हणतात- 'राजा नसलेल्या (अराजक) देशात कोणाचेही धन (सुरक्षित) रहात नाही. (पाण्यातील) मासे जसे एकमेकांना खातात, त्याप्रमाणे (अशा देशात) लोक परस्परांना लुबाडतात.

न श्रेयः सततं तेजः, न नित्यं श्रेयसी क्षमा ।
तस्माद् नित्यं क्षमा, तात, पण्डितैर् अपवादिता ।।

प्रल्हाद आपला नातू बलिराजा यास म्हणतो, 'अरे बाबा, नेहमी पराक्रम करणे श्रेयस्कर नाही आणि नेहमी क्षमा करणेही श्रेयस्कर नाही. नेहमी क्षमा करणे हे पंडितांनी दोषास्पद म्हटले आहे.

# कळसूबाई - एक थरारक, सुंदर अनुभव

वैद्य योगेश बाबुराव
प्रथम वर्ष कला

निळंशार आकाश, हिरवीगार दाट झाडी, कधी संथ तर कधी खळखळणारा प्रवाह, आकाशाला गवसणी घालणारे पर्वत, दाटीवाटीतून वाट काढत जाणारा काळा डांबरी रस्ता, मधूनच चौकोनी घरं असणारं गाव आणि सगळीकडे नैसर्गिक शांतता हे वर्णन कोणत्या गोव्याचं नाही, कोणत्या कोकणाचं नाही हे आहे माझ्या, आमच्या सह्याद्रीचं. फक्त इथं कोकणाप्रमाणे माडाची झाडं नसून आंबा, साग, पळस, खैर, अर्जुन, जांभूळ ही वनसंपदा समृद्ध आहे. कळसुबाई शिखराचा ट्रेक करणं म्हणजे एक नितांत सुंदर अनुभव असून संपूर्ण सह्याद्रीला जिंकण्यासारखे आहे.

खरे तर अकोल्याला कोकणाचा शेजार लाभला आहे. सह्याद्रीवर प्रेम असणाऱ्यांना महाराष्ट्राचे 'एव्हरेस्ट' असणारे कळसूबाईचे शिखर, साहसवीरांना साद घालणारा हरिश्चंद्र गड, अमृताचा कुंभ घेऊन धावणाऱ्या प्रवरामाईला जन्म देणारा रतनगड, भंडारदरासारखे सर्व गुण संपन्न ठिकाण व एकापेक्षा एक वरचढ असणारे पर्वत किल्ले, अमृतेश्वरासारखे प्राचीन मंदिराचे शिल्पसौंदर्य, अगदी कसं स्वप्नात असल्यासारखं वाटतं या सर्वांमध्ये म्हणजे अनुभव घ्यावासा वाटणार महाराष्ट्राचं एव्हरेस्ट म्हणजे 'कुळसूबाई' शिखर. कळसूबाई शिखराची उंची १६४६ मी. इतकी आहे. समुद्रसपाटीपासूनची उंची ५४२७ फूट आहे. कळसूबाई शिखर हे सह्याद्री पर्वतातील सर्वात उंच शिखर आहे व ते भंडारदऱ्याच्या उत्तर वायव्येकडे ८ - ९ कि.मी. अंतरावर आहे. हे शिखर अकोले तालुक्याच्या सीमेवर 'बारी' या गावात आहे. आपण भंडारदऱ्याला मागे मागे सारत दऱ्याखोऱ्यांमधून पर्वताच्या पायथ्यापासून पुढे पुढे सरकत बारीकडे कूच करतांना खूपच आनंददायक अनुभव मिळतो जसजसे आपण शिखराच्या पायथ्याकडे जातो तसतशी त्याची भव्यता अधिक खुलू लागते. बारी व जहागीरवाडी ही दोन जोडगावे आहेत. दोन्ही गावांमधून शिखराकडे कूच करण्याचा मार्ग आहे. आपण बारी गावात आल्यावर तुमची येथील निधड्या निडर व अशा दुर्गम भागात राहणाऱ्या मनुष्य प्राण्याची नजरानजर होते. काही माहिती हवी असल्यास किंवा वाटाड्या हवा असल्यास प्रेमाखातर एखादा माणूस येथे मिळू शकतो. बारीच्या पश्चिमेकडे शिखरावर जाण्याचा मार्ग आहे. पहिल्या टप्प्यापर्यंत बऱ्यापैकी झाडी आहे. येथील वृक्ष जुने असल्याचे भासतात व त्यामधून जाताना तो खडा चढ चढतानाच, आपली दमदाक होते. पहिला टप्पा पार केल्यावर एकदा खाली नजर फेकली असता बारी गावातील आडव्या तिडव्या शेतांचं, घरांचं सुंदर दर्शन होते. जर आजूबाजूला धुके नसेल तर 'पट्टा' किल्ला दिसतो. येथे समृद्ध वनसंपदा जराशी विरळ झाली आहे विविध प्रकारची झाडे, छोटी छोटी फुलझाडे, वेली, सुवासिक सुमनांची दाटी, औषधी वनस्पती यांची रेलचेल आहे. यानंतर येथे असणारी भातशेती आपणास आश्चर्यचकीत करून सोडते. एवढ्या उंचावर शेती करणं म्हणजे तेवढंच थरारक असणार असं तेथील लोकांशी बोलतांना जाणवत होतं आणि कधीही वर एकत्रित असणं अत्यावश्यक आहे. थोडा वेळ चढल्यावर पहिली लोखंडी शिडी येते व येथे झाडी कमी-कमी होत जाते. येथे असणारी चिंचोळी पायवाट दोन्ही बाजुंनी खोल दऱ्या पश्चिमेकडे असणारा उरात धडकी भरवणारा प्रचंड उभा कडा त्याच्यामध्ये फटीत उगवलेले गवत पाहून आपला थकवा कोठेच्याकोठे पळून जातो. हे दरमजल करीत ३-४ शिड्या चढल्यावर शिखर दृष्टीपथात दिसू लागते. येथे बऱ्यापैकी झाडी असून वर्षानुवर्षे पावसाशी सामना करावा लागल्यामुळे मोटमोठ्या दगडांची पावसाच्या सरीनुसार झालेली झीज, विविध रंगाची माती, झाडांवर वाढलेले शेवाळ, झाडांना पानांपेक्षा वाकड्या-तिकड्या वाढलेल्या फांद्या, झाडांचा झोत हा पूर्वेकडे झुकलेला विविध प्रकारचे गवत पाहून आपले श्रम सार्थकी लागल्याचे वाटतात. येथे मात्र पुरती दमछाक

होते. तरीपण आजूबाजूचा विस्तीर्ण प्रदेश पाहून आपले मन उभारी घेते.

आपण शिखराच्या शेवटच्या टप्प्यात आल्यावर एक बारामाही पाणी असलेली विहीर आहे. त्यातील पाणी हे खूपच थंड असून आलेल्यांचे जणू स्वागतच करते. समोरच वनखात्याच्या एका पत्र्याच्या शेडचे आता फक्त अवशेष शिल्लक आहेत. आपलं ईप्सित जवळ आलेलं असतं. आपण थोड्याच वेळात एका परमोच्च आनंदाच्या क्षणाला सामोरं जाणार असता पण तत्पूर्वी आपणास फक्त ८० पायऱ्या असलेली लोखंडी शिडी चढावी लागते. येथे जरा जपून चालावं लागतं नाहीतर एखादी दुखापत तुमच्यासाठी हजर होते. तेव्हा आपण वर जातो तेव्हा आपल्या आनंदाला पारावार राहात नाही. आपण जिकतो. महाराष्ट्राच्या सर्वात उंच टोकावर उभे असतो, ह्या रौद्र, भीषण, राकट सह्याद्रीला आपण काही काळापुरते मागे टाकतो. खऱ्या अर्थाने कोकणचा खारा वारा, सह्याद्रीचा शीतल, गोड वारा यांच्या संघर्षातच जणू आपण न्हाऊन निघतो. आपली दृष्टी जिकडे जाईल तिकडे अपुरीच पडते. ते एक सह्याद्रीवर पडलेलं सुंदर स्वप्नच असतं.

गगनाला गवसणी घालणारे पर्वत, आकाशाशी स्पर्धा करणारे सुळके, दृष्टीला घाबरुन सोडणाऱ्या खोल दऱ्या , ढगांना लज्जित करणारे उभे कातळ हे पाहून स्वप्न संपूच नये असे वाटते. बेफाम येणारा वारा अंगावर झेलत आपली पहिली दृष्टी खेचून घेतो तो दक्षिणेकडील भंडारदरा जलाशयाचा विस्तीर्ण भूभाग. जणू काही ही कळसूबाई आपले खुललेले प्रतिबिंब त्या पाण्यात पहात आहे. नैऋत्येकडे खेटूनच असणारे अलंग, कुलंग, मदनगड, दूरवर दिसणारा रतनगड पश्चिमेकडील विस्तीर्ण कोकणाचा भूभाग उत्तरेकडे दिसणारा 'पट्टा किल्ला' हृदयाच्या कप्प्यात जाऊन बसतात. वरुन दिसणारी निसर्गाची रुपे रौद्र, भीषण, सुंदर, मनमोहक सर्वांचाच संगम झालेला दिसतो. यामुळे आलेला थकवा कोठेच्या कोठे पळून जातो. निसर्गाचं ते अप्रतिम सौंदर्य पाहताना देहभान हरपून जातं. हा अनुभव धाडसी अनुभव प्रत्येक मराठी भाषिकाने घ्यावा असाच आहे....

येथील लोक काटक व धैर्यशील आहेत त्यांच्यामध्ये वाघाशी सामना करणारेही बरेच लोक आहेत. त्यांना त्याची सवय आहे. कोणताही गर्व, अभिमान न बाळगता ते आपल्याशी बोलतात व तेथील गाणी, बरेच किस्से ऐकवितात. वाळलेल्या लाकडांच्या भल्या मोठ्या ५ ते ६ फूटांपेक्षा लांब असलेल्या मोळ्या घेऊन जाताना, डोंगर उतारावरुन चालताना अजिबात डगमगत नाहीत. येथे चढण्यापेक्षा उतरताना जरा अवघड वाटते.

कळसुबाईच्या नावाबाबत एक दंतकथा प्रसिद्ध आहे व तेथील वृद्ध स्त्रियांना विचारल्यास त्या खुलेपणाने सांगतात..... **'कळसूबाई'** नावाची एक मूळची इंदोर येथील कन्या रूसून बारीमध्ये आली. ती एका गुराख्याला विचारायची 'मी येऊ का ?''... असे बऱ्याच वेळा विचारायची तो नंतर घाबरू लागला. त्याला भुताटकीचा दाट संशय आला आजारी पडला. घरच्यांनी चौकशी केल्यावर त्याने हे रहस्य उघड केले. नंतर तो तिला घरी घेऊन आला. ती त्या घरी राहू लागली. मात्र तिच्या दोन अटी होत्या. एकतर ती कोणत्याही प्रकारे झाडलोट करणार नाही व खरकटे उचलणार नाही. ह्या नियमांचे पालन झालेही. पण ती उपवर झाल्यावर तिच्या लग्नाचा विचार झाला. जेव्हा तिला पाहुणे बघायला आले जेवण झाले. तेव्हा तिच्या दिलेल्या वचनाचा विसर पडून तिला ती भांडी उचलावी लागली. ती खूपच क्रोधिष्ट झाली व पळतच पहिला टप्पा चढून गेली व नंतर गावाकडे पाहिले म्हणून तेथे पायथ्याचे मंदिर बांधले गेले. नंतर ती शिखर चढली. नंतर तिच्याबद्दल कोणालाच माहिती मिळाली नाही. तिच्या स्मरणार्थ ह्या शिखराला 'कळसुबाई' हे नाव देण्यात आले. शिखराच्या माथ्यावर एक मजबूत साखळी कड्यावरून खाली सोडली आहे. ती जर वरती ओढून काढली तर आपल्या मनातील इच्छा पूर्ण होते, असा समज आहे. साखळी व खडक यांचे घर्षण झाल्यामुळे बरीच मोठी खाच पडली आहे.

गुलाबी थंडीच्या काळात दुर्दम्य महत्त्वाकांक्षेच्या जोरावर उत्साहाच्या भरात एका वेगळ्या साहसाचा अनुभव घ्यावयाचा असेल तर एकदा तरी हा ट्रेक करणे म्हणजे नशीबच म्हणावं लागेल...

■ ■ ■

# नाझी भस्मासुराची प्रेयसी अर्थात इव्हा ब्राऊन !

प्रशांत सुधाकर नागरे
प्रथम वर्ष विज्ञान

जो सत्ताधीश असतो त्याच्याभोवती विशिष्ट प्रकारचे वलय आणि सापळे देखील असतात. त्याच्या भोवतालच्या माणसांना त्याची मर्जी हवी असते. मग ती आपले स्थान प्रबल करण्यासाठी असो वा अधिकार वाढविण्यासाठी ! प्रत्येकजण अशी मर्जी संपादन करण्यासाठी सर्व मार्गांनी प्रयत्न करत असतो. 'हांजी हांजी करणे' ही कनिष्टांसाठी सर्वात सुलभ गोष्ट असते. पण या सर्व मंडळीत सत्ताधीशापेक्षा कनिष्ठ असूनही वेगळी पडते ती त्याची प्रेयसी अथवा पत्नी ! ॲडॉल्फ हिटलरसारख्या हुकूमशहाच्या प्रभावळीखाली त्यांची प्रेयसी फारच झाकोळली गेली. अशा प्रेयसीचे आयुष्य जाणून घेणे हे हिटलरचे व्यक्तीगत चरित्र जाणून घेण्यासाठी उपयुक्त ठरावे.

प्रेयसी अथवा पत्नी यांचे पुरुषाच्या आयुष्यातील स्थान असे आहे की, अशा स्त्रियांचा विविध परिणाम पुरुषाच्या स्वभावावर व कर्तृत्वावर पडणे सहज शक्य आहे. स्त्री-पुरुष प्रेमाचे स्वरुप इतक्या गुंतागुंतीचे आहे की, प्रेयसी वा पत्नीचे नाते काहीसे कनिष्ठ असूनही कल्पनेबाहेर बलिष्ठ असू शकते. ॲडॉल्फ हिटलरच्या प्रेयसीने मृत्यूच्या दारापर्यंत त्याची साथ दिली. मृत्यूच्या दाराअलिकडेच काही क्षण ती त्याची पत्नी म्हणूनही वावरली. मृत्यूच्या सावलीतील विलक्षण लग्न तिने अनुभवले. हिटलरबरोबरच तिने आत्मघात पत्करला. त्याच्या खाजगी आयुष्याची ती एकमेव साक्षीदार आणि भागीदार होती. या स्त्रीचे नाव - 'इव्हा ब्राऊन'.

हिटलर स्वत:च एक महत्त्वाकांक्षी पुरुष होता. ज्वाज्वल्य देशाभिमान आणि उत्कट देशभक्तीसमोर त्याला इतर गोष्टी क्षुद्र होत्या. आपला जन्म हा जर्मनीचे पुनरुत्थान करण्यासाठी व विशाल जर्मन राईश (साम्राज्य) उभारण्यासाठी आहे, असा त्याचा समज होता. त्यामुळेच हिटलरने खाजगी आयुष्यात लग्न करणे, संसार थाटणे हे जाणीवपूर्वक टाळले होते.

नाझी पक्षाच्या उदयाच्या काळातील त्याचा साथीदार हॉफमन याच्या स्टुडिओमध्ये इव्हा ब्राऊन कामाला होती. तिथेच हिटलरची आणि तिची पहिली भेट झाली. हिटलरला तिच्याविषयी आकर्षण वाटले. या भेटीत इव्हा हिटलरच्या वाक्चातुर्याने आणि स्वभावाने खूपच प्रभावित झाली. आकर्षणाचे रूपांतर प्रेमात होत गेले. प्रत्येक भेटीगणिक त्यांचे प्रेम वाढतच गेले. त्यावेळी इव्हाला हिटलर हा जर्मनीतील एक प्रमुख पक्षाचा नेता आहे, याची पुसटशी कल्पनादेखील नव्हती. हिटलरचा सहकारी अल्बर्ट स्पीअर याने आपल्या आठवणीत सांगितले आहे. त्याचप्रमाणे -

''इव्हा ब्राऊन हिला राजकारणात कसलाही रस नव्हता. तिला खेळाची आवड होती. डोंगरातून भटकणे तिला फारच आवडत असे, नटण्यामुरडण्याची तिला हौसच नव्हती.''

हिटलरने स्वत:कडून तिला प्रेमाची कबुली देण्याचे बहुतेक वेळा टाळले. हिटलर आपल्या राजकीय जीवनात इतका गुंतत गेला की, महिनोंमहिने इव्हाची व त्याची भेट होणे दुरापास्त होत असे. परंतु काही ठिकाणी त्याने तिच्या प्रेमाचा स्वीकार केलेला आढळतो. १९३१ ते १९४५ ही चौदा वर्षे इव्हा आणि ॲडॉल्फ परस्पर अनुरक्त अवस्था अनुभवत होते. हा सर्वच कालखंड मुळी हिटरलच्या स्वास्थाचा नव्हता. २३ मार्च १९३३ ला हिटलर जर्मनीच्या सर्वाधिकारी पदावर आला असता, सत्तेवर आल्या आल्या त्याने युरोपचा नकाशा उलथापालथ करण्याचे डावपेच सुरु केले. सप्टेंबर १९३९ मध्ये, त्याने युद्धच पेटवले आणि १९३९ ते ४५ ह्या सहा वर्षांच्या कालखंडात युद्धनेतृत्त्व केले. म्हणजेच, या उभयंतांना स्वास्थाचा काळ कधी लाभलाच नाही. हिटलरने इव्हाला प्रसिद्धीच्या झोतात कधी येवू दिले नाही. यामुळेच, महायुद्धानंतर कित्येक दशके इव्हा ब्राऊ ही अंधारातच राहिली. हिटलरने इव्हा बरोबरच्या आपल्या संबंधात नाजूक समतोल राखला होता. तिला त्याने आपल्याला या संबंधाची लाज वाटते असे कधीही वाटू दिले

नाही. परंतु, अनावधानाने सुद्धा आपल्या संबंधांची कुणाजवळ कबुली दिली नाही.

सुरूवातीच्या काळात इव्हाचे जीवन फारच दु:खमय झाले होते. ॲडॉल्फकडून प्रेमाची अपेक्षा करतांनाच तिला फार मोठा विरह सहन करावा लागत होता. त्याच्याकडून प्रेमाची कबुली न मिळाल्याने तिने दोनदा आत्महत्येचा प्रयत्नदेखील केला. परंतु, अशावेळी हिटलरने तिला आपलेसे केलेले आढळते. तिने त्यावेळी आपल्या डायरीत लिहीले होते - ''तो मनाचा प्रेमळ आहे, पण तार-तम्य नाही. रांगड्यासारखा वागतो; त्याला समजच कमी आहे; इतके जवळचे संबंध असूनही तो जवळीकता मात्र दाखवत नाही. वाटतं हा माझाच दोष आहे किंवा असेलही हे दिवस काही असेच राहणार नाहीत. लवकरच सगळे पुन्हा बदलेल.''

इव्हा आणि ॲडॉल्फचे संबंध कधीच चर्चेत आले नाहीत किंवा त्याबाबत कधीही अफवाही पसरल्या नाहीत. कारण त्याने कधीही तिला समारंभातून, युद्ध छावण्यांतून मिरवले नाही. पण याचा अर्थ त्याच्या आयुष्यातील या स्त्रीला त्याने केवळ एक खाजगी भानगड या स्तरावर ठेवले होते असे मात्र नाही. कारण - गोअरिंग, हिमलर, गोबेल्स, अल्बर्ट स्पीअर इ. सर्व जणांशी तिचा परिचय घनिष्ट होता. हिटलरनेसुद्धा आपल्या व इव्हाच्या संबंधांवर मुद्दाम पांघरूण पसरवण्याचा प्रयत्न कधी केला नाही.

दुसऱ्या महायुद्धातील १९३९ ते १९४२ हा काळ नाझी जयाचा काळ होता. हिटलरची सर्वत्र सरशी होती आणि अर्थातच त्याला सतत युद्धविषयक कामात निमग्न राहावे लागत होते. परंतु इव्हा कुठेही असली व ॲडॉल्फ हा पूर्व प्रशियाच्या लष्करी छावणीत अथवा पश्चिम आघाडीवरील छावणीत अथवा कुठेही असला तरी दररोज रात्री १० वाजता त्याचा इव्हाला फोन येत असे. लष्करी बाबींसंबंधी हिटलर इव्हाशी कधीच बोलत नसे. हिटलरवर असलेले वजन या पुढच्या काळात सर्वांनाच जाणवू लागले. हिटलरचे निर्णय प्रसंगी योग्य दिशेने फिरविण्याची कामगिरी इव्हाने केलेली आढळते. हिटलरच्या फावल्या वेळावर सर्वस्वी इव्हाचीच सत्ता होती. इव्हाला स्वत:चा असा स्वार्थ नव्हताच, तिला स्वत:ची इस्टेट करायची की नाझी प्रभावळीत मोठा नेता म्हणून मिरवायचे नव्हते. उलट स्वत:च्या सर्व इच्छा, आकांक्षा तिने ॲडॉल्फला समर्पित केल्या होत्या. हिटलरला प्रदीर्घ सहवासात इव्हाची पुर्ण ओळख पटली होती. त्याला इव्हाचे हे गुण सतत जाणवत होते.

१९४२ च्या हिवाळ्यातील युद्धात हिटलरचा लष्करी वरचष्मा संपुष्टात आला होता. भविष्याला हवी तशी वाकविण्याची सुत्रे त्याच्या हातून निसटली ती कायमचीच. ऑक्टोबरमध्ये ब्रिटीश आठव्या लष्कराने 'एल अले मिन' वर चढाई सुरू केली आणि ५ नोव्हेंबरला रोमेलची माघार सुरू झाली. त्यानंतर दहा दिवसांनीच स्टॅलिनग्राडजवळ रशियन चढाई सुरु झाली. तेथे झालेला नाझींचा पराभव इतका जिव्हारी होता की, त्यानंतर पूर्व आघाडीवर जर्मन कधी आक्रमण करूच शकले नाही. सगळीकडे माघार, माघार आणि फक्त माघारच दिसत होती.

हिटलरच्या हे पचनी पडूच शकत नव्हते. त्याचा स्वत:वरचा ताबा सुटू लागला. त्याचा स्वभाव संतापी बनत गेला. मूठ उगारलेली आहे, चेहरा लाल झालेला आहे, सर्वांग थरथर कापत आहे आणि असा संतापलेला हिटलर, जनरल कर्बस्, गुडेरीन, रूडन्स्टेड, कोलर अशासारख्या सेनानींवर खेकसत आहे हे दृष्य तिला वारंवार पहावे लागते.

१९४४ मध्ये, तेव्हा पराभवाच्या छाया सर्वत्र पसरू लागल्या. तसे असंख्य साथीदार हिटलरला सोडून गेले. तेव्हा हिटलरची जवळची अशी फक्त दोनच माणसे उरली; एक म्हणजे इव्हा आणि दुसरी व्यक्ती म्हणजे मार्टिन बोरमन. इव्हाला युद्धाच्या व राजकारणाच्या गोष्टीत रसच नव्हता. राईशचा डोलारा सर्व अंगांनी कोसळत असतांना, या मानसिक अपघातात धीर देण्याचे काम फक्त इव्हा करीत होती. या कालखंडात फक्त त्याची सर्वस्व झाली होती. त्याचे सहकारी स्वत:च्या भवितव्याचा विचार हळूहळू करू लागले. त्या काळात इव्हा हिटलरच्या अधिकच निकट आली. प्रत्येक लष्करी पराजयाबरोबर हिटलर हा इव्हाच्या अधिकाधिक जवळ आलेला दिसून येतो.

हिटलरला स्वत:चा संसार व मुले नको होती. यासंबंधी तो अनेकांजवळ बोललेला आढळतो. आपली खाजगी चिटणीस फ्राऊजुंग हिच्याजवळ हिटलरने काढलेले उदगार तिने नमूद करुन ठेवलेले आहेत - ''मी काही चांगला कुटुंबप्रमुख होऊ शकत नाही. अशा स्थितीत संसार सुरू करणे हे बेजबाबदारपणाचे होईल. कारण बायकोकडे लक्ष द्यायला मला वेळच नसतो. शिवाय मला स्वत:ची मुले नको आहेत, क्वचित जन्माला येणाऱ्या माझ्यासारख्या माणसांच्या मुलांना जगात जम बसवणे कठीण जाते. लोकांच्या

त्यांच्याकडून अपेक्षा मोठ्या असतात आणि जर ती मुले सामान्य निघाली तर लोक त्यांना क्षमा करीत नाहीत. शिवाय, अशी मुले दिसायला ओबडधोबड आणि मुर्ख निपजण्याची शक्यताच अधिक असते.

अल्बर्ट स्पीअरजवळ बोलतांना १९४३ च्या अखेरीस हिटलर म्हणाला होता -

''आता मला जवळची अशी दोघंच आहेत. एक इव्हा आणि दुसरी माझी कुत्री ब्लॉंडी.''

पराभव जसजसा जवळ येऊ लागला तसे हिटलरने इव्हाला बर्गहॉफ येथे सुरक्षित ठिकाणी ठेवले आणि स्वत: बर्लिनमध्ये चॅन्सेलरीत राहू लागला. पण यावेळी इव्हा हिटलरचे मुळीच ऐकणार नव्हती. तिने बर्लिनला जायचे ठरवले होते. दोस्तांची बॉम्बर, फायटर विमानांचे हल्ले चुकवत ती धाडसाने हिटलरपर्यंत पोहोचली. हिटलर तिच्यावर रागवला खरा ! पण त्यात इव्हाविषयीचे प्रेम आणि कौतुक लपलेले होते. दोन व्याकुळलेल्या मनांचे मीलन झाले होते. आयुष्याच्या अखेरीला त्यांना एकमेकांचा सहवास लाभला होता.

अमेरिकन सेनेने ऱ्हाईन नदी ओलांडली होती. व्हिएन्ना भोवती रशियाचा फास पडला होता. रशियन सैन्य ओडर नदी ओलांडून बर्लिनच्या दिशेने धावत सुटले होते. बर्लिनवरील बॉम्बहल्ले अधिकाधिक तीव्र होत गेले. १९४५ चा सबंध मार्च महिना चालू असतांना ॲडॉल्फला आशा वाटत होती की, युद्धात काहीतरी चमत्कार घडून जर्मनीला अंतिम यश मिळेल. हा त्याचा आशावाद भोळसट होता; मुर्खपणाचा होता, हे इतरांना समजत होते. १८०६ नंतर परकीय फौजांचे पाय जर्मनीच्या राजधानीला लागलेले नव्हते. १४० वर्षात जे घडले नव्हते, ते काही दिवसांवर येवून ठेपले होते. हिटलरच्यामनात जसजशी ही गोष्ट घर करू लागली, तसतशी त्याचा आत्मघाताचा निर्णय प्रबळ होत गेला. पराभूत जर्मनीला पहाण्यासाठी जीवंत असणे ही कल्पनाच करणे त्याला शक्य नव्हते.

अखेरच्या दिवसांत चॅन्सेलरी खाली जो बंकर होता त्यात हिटलर रहात असे. २० एप्रिलला हिटलर ५७ व्या वर्षात पदार्पण करीत होता. इव्हाने हा वाढदिवस साजरा करायचे ठरवले होते. प्रश्न होता तो फक्त हिटलरला ही गोष्ट समजवायची कशी ? २६ एप्रिलला अखेर इव्हाने हिटलरची समजूत घालून एक छोटासा समारंभ आयोजित केला. दूर गेलेली माणसे पुन्हा एकत्र आली. प्रत्येकाला भावना अनावर झाल्या होत्या.

त्याच दिवशी एक चमत्कारीक घटना घडली. बर्लिनच्या रक्षणासाठी घराबाहेर पडलेले दोन एस्. एस्. तरुण ग्रासमन आणि बुसे यांनी बंकरमध्ये येऊन इव्हाला अशी विनंती केली; की लढाईत शिरण्यापुर्वी आपापल्या प्रेयसीशी विवाह व्हावा आणि हिटलरने त्यांना आशिर्वाद द्यावेत, अशी त्यांची इच्छा आहे. हिटलरशी बोलून इव्हाने विवाहाला संमती तर मिळवलीच व त्यांच्यासह विवाह समारंभालाही हजर झाली. दोन दिवसांनी २८ एप्रिलला त्यांची आभाराची चिठ्ठी आली. चिठ्ठी वाचताच ॲडॉल्फ इव्हाच्या कानात काहीतरी कुजबुजला. ते ऐकून तिचा तिच्या कानावर विश्वासच बसेना. ॲडॉल्फ तिला म्हणाला -

''आज रात्री आपण दोघेही विवाहबद्ध होऊ.''

हिटलरने इव्हाशी लग्न करण्याचे ठरवले. आपल्याबरोबर सोबत करणाऱ्या इव्हाला त्याने अखेरीस आपल्या पत्नीचे स्थान दिले. हे सारे तातडीने ठरविले गेले व तातडीने उरकण्यात आले. कारण - बंकरमध्ये पोहोचलेल्या संदेशानुसार रशियन सैनिक कधीही चॅन्सेलरीत शिरण्याच्या तयारीत होते.

हिटलरने आत्मघाताचा निर्णय पक्का केला होता. इव्हानेही त्याच्याबरोबर आत्मघात करण्याचे ठरविले होते. तिचा हा निर्णय तो बदलवू शकला नाही. ३० एप्रिलला दुपारी दोघांनी आत्महत्या केली. हिटलरने तोंडात गोळी झाडून घेतली होती. तर इव्हाने फक्त विष घेतले होते. १८० लिटर गॅसोलिनने त्यांना अग्नी देण्यात आला. हिटलर आणि इव्हाची हाडेसुद्धा रशियनांच्या हाती लागू शकली नाहीत.

'प्रेम' हे असेच असते त्याला वेळ, काळ, स्थान कशाचेही बंधन नसते. हेच खरे ! हिटलर इव्हापेक्षा २३ वर्षांनी मोठा होता. दुसऱ्या महायुद्धातील तो काळा इतका भीषण होता की, कुणाला, कोणाची व कशाचीही शाश्वती देता येणे शक्य नव्हते. अशा काळात इव्हा एका हुकूमशहाशी एकनिष्ठ राहिली. त्याच्यावर खरेखुरे प्रेम केले व त्याच्या बरोबर मृत्युलाही सामोरी गेली. १६ वर्षे हिटलरशी प्रेम करणाऱ्या इव्हाला अखेरीस पत्नी म्हणून स्वीकारलेच.

■ ■ ■

# अण्णाभाऊ साठेंच्या कादंबऱ्या

कु. अश्विनी रमेशचंद्र खांडगे
द्वितीय वर्ष कला (इंग्रजी)

**सं**स्कृत ही सर्व भाषांची जननी आहे.संस्कृत ही भाषा केवळ उच्च वर्णीयांनाच ज्ञात असल्याने, सर्व सामान्य माणसांचा लिहिण्या-वाचनाचा दूरपर्यंत संबंध नव्हता. धर्म हा श्रेष्ठ मानला जात होता. उच्च-वर्णीयांनी सर्व सामान्यांना ज्ञानापासून वंचित ठेवले होते. श्री संत ज्ञानेश्वर हे उच्च वर्णीय असूनदेखील त्यांना वाळीत टाकले होते. श्री संत ज्ञानेश्वरांनी पुढे सर्वसामान्यांना 'भगवद्‌गीता' मराठीत सांगितली. अशा प्रकारे सर्व सामान्यांना लिखाण करण्याचे दार खुले करुन दिले. महात्मा फुले, वि. वा. शिरवाडकर, नारायण सुर्वे यांनी आपल्या लिखाणाद्वारे आपले विचार लोकांपर्यंत पोहोचविले. असाच एक लेखक १९ व्या शतकात महाराष्ट्रात निर्माण झाला. त्याचे नाव 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे.'

''ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून, दलितांच्या तळहातावर तरलेली आहे.'' असे महान उद्‌गार काढणाऱ्या अण्णाभाऊंचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी 'वाटेगाव' या खेड्यात गावकुसाबाहेर मांगवाड्यात झाला. पहिल्यापासूनच त्यांना उपेक्षित मानले जाऊ लागले. मातंग वस्तीत राहूनदेखील त्यांच्यावर बालपणापासूनच चांगले संस्कार झाले. ज्यांच्यावर समाजव्यवस्थेने पिढीजात अन्याय चालविला होता, जीवन जगण्यासाठी ज्यांना संघर्ष करावा लागत असे, अशा मातंग समाजात जन्म घेऊन अण्णाभाऊंनी चांगले काम केले असे मला वाटते. गुन्हेगार जमात म्हणून शिक्षा बसलेल्या मांगवाड्यातील अण्णाभाऊंनी प्रचंड ग्रंथसंभार निर्माण केले. श्रेष्ठ कलावंत परिस्थितीवर मात करतो. हे विधान त्यांच्या बाबतीत अगदी सार्थक ठरते. अण्णाभाऊंनी केवळ दीड दिवस शाळा केली परंतु मांगबंधुंकडून वाचन - लिखाण शिकून त्यांनी आपल्या जीवनाला वेगळी दिशा दिली. ते उपजतच शाहीर होते. लिखाणाला शाहीरीची जोड देऊन त्यांनी आपल्या उपेक्षित समाजात प्रगतीची बीजं रोवली. अण्णाभाऊंचे जीवन व कलानिर्मितीची पार्श्वभूमी ज्या मातंग समाजात ते जन्माला आले होते. त्या समाजाच्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील दु:खभोगातून समजून घेतली पाहिजे. अण्णाभाऊंना शिक्षणाची संधी न मिळताही शाळेबाहेरील लोकव्यवहाराच्या विशाल विद्यापीठ साहित्य - संस्कृतीचे अध्ययन त्यांनी केले. ते स्वत:च्या अनुभवांवरुन भराभर लिहीत गेले. आपल्या लिखाणाच्या प्रेरणेबद्दल ते म्हणत की, मी जे जगतो, पाहतो, अनुभवतो, तेच मी लिहितो. माझ्या साहित्यातील माणसं मला कुठे ना कुठे भेटलेली असतात. गावकुस आणि गावगाड्या बाहेरील माणसांचा वेध घेणाऱ्या अण्णाभाऊंच्या कथा म्हणजे दलित, पीडित, शोषितांच्या जीवनाचा आरसा आहे.

अण्णाभाऊंना पन्नास वर्षाचं आयुष्य मिळालं. या कालावधीत ३५ कादंबऱ्या, १३ कथासंग्रह, १३ लोकनाट्य तमाशा, ३ नाटके, ७ चित्रपटांच्या कथा, १५ पोवाडे, प्रवासवर्णनं, शाहीरी पुस्तकं अशी प्रचंड साहित्य निर्मिती त्यांनी केली. १९४९ ते १९५९ हा त्यांच्या कथा लेखनाचा काळ. 'खुळंवाडी' हा त्यांचा पहिला कथासंग्रह १९५७ मध्ये प्रकाशित झाला. त्यांच्या पहिल्याच कथासंग्रहाला आचार्य अत्रे यांची प्रस्तावना होती. अत्रे त्या संदर्भात म्हणतात, ''अण्णाभाऊंची कथा ही जगण्यासाठी लढणाऱ्या माणसाची कथा आहे. या कथासंग्रहात शिवकालीन मुगलांशी लढणारी स्त्री-चंद्रा या नायिकेच्या पात्रातून स्त्री भावनांची कदर त्यांनी केली आहे. बहुजन स्त्रीला देशप्रेम, हक्क आणि अधिकारांचा तो एक इशारा आहे. आग, आघात, अग्निदिव्य, अहंकार, कुरूप, चित्रा, फुलपाखरू, वारणेच्या खोऱ्यात, रत्ना, रानबोका, रूपा, संघर्ष, तास, गुलाम, डोळे मोडीत राधा

चाले, ठासलेल्या बंदुका, जिवंत काडतूस, चंदन, मूर्ती, मंगला, मधुरा, मास्तर, चिखलातील कमळ, अलगूज, रानगंगा, माकडीचा माळ, केवड्याचं कणीसं, वैजयंता, धुंद रानफुलाचा, आवडी, वारणेचा वाघ, फकिरा, वैर, पाझर, सैरसोबत ही त्यांच्या ३५ कादंबऱ्यांची नावे.

बेकारीच्या उग्रतेचे चित्र अण्णाभाउंनी आपल्या कथांमधून दाखविले आहे. 'स्मशानातील सोनं' ही कथा जगण्याचा संघर्षच आहे. बेरोजगार झालेला भीमा जीवन जगण्यासाठी स्मशानातील प्रेताच्या तोंडातून सोनं काढतांना स्वत:च्या हाताची बोटं गमावतो. हे चित्र आजच्या परिस्थितीलाही स्पर्श करून जाते. व्यवस्थेने नाकारलेल्या तळागाळातील माणसांची व्यथा अवनतीच्या गोष्टी उसासून सांगण्यासाठी अण्णाभाऊंनी हातात लेखणी घेतली. अण्णाभाऊंनी लिहिलेल्या कादंबरीसृष्टीत भारतीय समाजरचनेतील अन्याय, शोषण, विषमता, याला आव्हान देऊन समता, आत्मसन्मान, न्याय आणि आर्थिक समतोल निर्माण करणाच्या उद्देशाने बंडखोर, धाडसी, आदर्शवादी, लढाऊ व समाजाशी सामंजस्य बाळगणारे समाजनायक त्यांनी चित्रित केले. त्यातून 'फकिरा', 'वैजयंता', 'वारणेचा वाघ', 'मंगला'सारख्या कादंबऱ्यांचा ओघ आला. त्यांनी आपल्या साहित्यातून मर्दानी वीरांगना तयार केल्या. शोषणाविरुद्धची भूमिका समाजात जी माणसे घेतात आणि अन्यायाशी झगडतात असेच नायक त्यांच्या कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी आहेत. पण त्याच वेळी 'वैजयंता'सारख्या कादंबरीतून ते तमाशातील स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या भोगवट्याचा आलेख काढतात, तर 'चिखलातील कमळ' ही कादंबरी मुरळीची जगण्याची कथा सांगते. 'चंदन' आणि 'चित्रा' या कादंबऱ्यांमधून स्त्री कामगारांच्या दुर्दैवाचे दशावतार बघावयास मिळतात तर 'माकडीचा माळ' मधून भटक्या जमातीचं चित्रण केलेलं आढळते. चित्रा ही कादंबरी प्रथमच सोव्हिएत रशियात रशियन भाषेत प्रकाशित झाली.

अण्णाभाऊंच्या नायिकांचे खरे विस्तृत जीवन त्यांच्या कादंबरीत होते. फकिरांमधील त्याची आई, वारणेचा वाघमधील मेरी आणि सई, डोळे मोडीत राधा चाले मधील राधा, चंद्रा (पाझर) या नायिक अण्णाभाऊंच्या स्त्री विषयाच्या धारणा स्पष्ट करतात. अण्णाभाऊंच्या काही कादंबऱ्या नायिकाप्रधान आहेत. चित्रा, वैजयंता, चंदन, चिखलातील कमळ, फुलपाखरू, रत्ना, आवडी, टिळा लाविते मी स्वत:चा या कादंबऱ्यांमधल्या नायिका स्त्रियांचे प्रश्न मांडणाऱ्या प्रातिनिधिक नायिका आहेत, तर अलगूज (रंगू), रानगंगा (प्रभा), संघर्ष (सुलभा), अहंकार (अवंतिका) या प्रेमकथांमधल्या नायिका उदात्त हृदयस्पर्शी प्रीतीचे दर्शन घडवितात. परंतू, माकडीचा माळमधील दुर्गा, चंदन, आवडी, चित्रा, वैजयंता, रत्ना, माझी मैनामधील मैना, फुला (निखारा) यांनाच खऱ्या अर्थाने अण्णाभाऊंच्या प्रातिनिधीक नायिक मानावे लागेल. या नायिकांचे वर्णन करत असताना, अण्णाभाऊंनी स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचा, सन्मानाचा, आदराचा दर्जा दिलेला आहे. अण्णाभाऊंच्या नायिका केवळ शरीरसौंदर्याचे वर्णन करणाऱ्या कचकड्याच्या बाहुल्या नाहीत. त्या रणरागिणी, महिषासूरमर्दीनीच्या स्वरुपातील आहेत. खांद्यावर बंदुक घेऊन पुरूषांच्या बरोबरीने ब्रिटीशांच्या बरोबर लढणारी 'मंगला' येथे आढळते. पैलवान भावाने केलेल्या अन्यायाला बदला घेण्यासाठी घरदार सोडून रामोशी समाजातील प्रियकराची साथ करणारी चौगुल्याची आवडी येथे आढळते. दुर्दैवी स्त्रीचे मजूर जीवन जगतांना झोपडपट्टी दादाबरोबर लढणारी चंदन आढळते. तमाशातल्या नर्तिकेलाही चारित्र्य, व्यक्तिमत्व आणि स्वतंत्र प्रितीजीवन असते हे सिद्ध करणारी लढाऊ वैजयंता सापडते. फिरत्या जमातीतील वासनेने बरबटलेल्या रानरेड्यांशी झुंज घेणारी दुर्गा भेटते. वेश्या वस्तीत राहूनही त्या बंदीखान्यातून बाहेर पडणारी चित्रा भेटते.

स्त्री सौंदर्याकडे विनम्र आदराने पाहणारा अण्णाभाऊ हा दुर्मिळ लोक कलावंत आहे. अण्णाभाऊंच्या साहित्यात स्त्रीच्या शीलरक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अण्णाभाऊंची नायिका ही भारतीय समाजजीवनातील प्रामुख्याने दलित, कष्टकरी, शेतमजूर, कामगार, झोपडपट्टीवासीय अशी कष्टकरी समाज जीवनातील नायिका आहे. अण्णाभाऊंच्या नायिक रणरागिणी आहेत, प्रेमदायिनी आहेत, जीवनदायिनी आहेत, सुंदर आहेत.

अण्णाभाऊंच्या नायिका गरीबीतील पण नैतिकतेचे जीवन जगणाऱ्या आहेत. भल्याचा पुरस्कार आणि बुऱ्याचा तिरस्कार निर्भिडपणे करणाऱ्या आहेत. स्त्री मुक्तीचा सर्वस्पर्शी विचार ज्यांना खऱ्या अर्थाने समजून घ्यायचा असेल, त्याने अण्णाभाऊंच्या नायिका समजून घ्याव्यात. भारतीय स्त्रीला खऱ्या अर्थाने मुक्त व्हायचे असेल, तर त्यांनी अण्णाभाऊंच्या नायिकांचे जीवनदर्शन जरूर घ्यावे. अण्णाभाऊंनी प्रत्येक व्यक्तीला आपल्या कादंबरीत स्थान दिलेले आहे. परंतू स्त्रियांचे चार भींतींच्या आत गुरफटलेले जीवन समजावून घेउन तिला आपल्या लिखाणातून समाजासमोर अनेक रुपांत मांडली, त्यामुळे मला त्यांना मराठीतील शेक्सपिअर ही उपमा द्यावीशी वाटते.

अण्णाभाऊंनी 'फकीरा' ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना, त्यांच्या झुंजार लेखणीस अर्पण केली आहे. फकिरा हा देखील झुंजार वीरनायक आहे. दलितांना उपेक्षितांना दास्यमुक्तीचा संदेश डॉ. आंबेडकरांनी दिला. सामाजिक समतेसाठी सतत संघर्षात राहत दलितांना 'माणूस' म्हणून जगण्याची प्रेरणा बाबासाहेबांनी दिली. फकीरादेखील आपल्या जमातीच्या मुक्ततेसाठी अखेरपर्यंत लढत राहतो. अखेरीस आपल्या जमातीच्या बंधमुक्तीसाठी त्याने आत्मार्पण केले आणि गोरगरीबांना मुक्ती मिळवून दिली. फकिराची कथा स्वातंत्र्यप्रेमी, संघर्षशील, बेडर माणसाच्या स्वाभिमानाची ठरते. फकिराचे संघर्षातून स्वातंत्र्याकडे विकसित हात जाणे हेच 'फकिरा' या कादंबरीचे केंद्र ठरते. अण्णाभाऊंचे स्वातंत्र्यप्रेम 'फकिरा' या धाडसी माणसाच्या प्रत्येक कृतीतून - उक्तीमधून प्रकट होते. 'वारणेचा वाघ' या कादंबरीत नाट्यमय संघर्ष त्यांनी दाखविला आहे.

अशा प्रकारे अण्णाभाऊंच्या प्रत्येक लिखाणातून मग ती कादंबरी असो. अगर कथा संग्रह समाजातील तळागाळातील माणसांच्या समस्यांवर तीव्रतेने आणि जाणीवपूर्वक प्रकाश टाकण्यात आलेला आहे. लेखकाबरोबरच अण्णाभाऊ हे शाहीरदेखील होते. अनेक वेळेस पोवाडे गाऊन त्यांनी आपले म्हणणे लोकांना पटवून दिले. १९४२ च्या 'चलेजाव चळवळीत;' गोवामुक्ती संग्रामात त्यांनी सहभाग घेतला होता. असे हे त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व १८ जुलै १९६९ (शुक्रवार) या दिवशी पंचतत्वात विलीन झाले. त्यांनी केलेल्या थोर कार्याची स्मृती ठेवून आपण त्या दिशेने प्रयत्न करायला हवे. तरच एक दिवस दलित, उपेक्षित यांना समाजात मध्यमवर्गीय अथवा त्याहून उच्च स्थान प्राप्त होईल. अण्णाभाऊंच्या स्मृतीस मी विनम्र अभिवादन करते.

■ ■ ■

## हास्यधारा



कुठल्याशा साहित्य संमेलनात एका सकाळी, आचार्य अत्रे यांच्या खोलीत प्रवेश करीत एक कार्यकर्ता म्हणाला, ''अत्रे साहेब, तुम्हाला कळलं का ?''

''नाही, काय झालं ?''

''हॉलमध्ये एका साहित्यिकाच्या उशाखाली विंचू सापडला.''

अत्र्यांनी विचारल्यावरुन कार्यकर्त्यांनी त्या साहित्यिकाचे नाव सांगितले. त्यावर अत्रे म्हणाले, ''दगडाखाली दुसरं काय सापडणार ?''

एकदा आचार्य अत्रे फिरायला निघाले होते. एका अरुंद पुलावरून जात असताना त्यांच्यासमोर कोणी त्यांच्या विरोधातील माणूस आला. पुलावरून एकावेळी एकालाच जाणे शक्य होते. तो अहंकारी माणूस अत्र्यांना म्हणाला, ''मी मूर्खाला वाट देत नसतो.''

''पण मी देत असतो.'' म्हणत अत्रे पटकन बाजूला झाले.

■ ■ ■

# प्रेमपत्र

श्री. एकनाथ शेटे

Dearest Anuradha,

I Love you,

जीवनाच्या वाटेवर...

असंख्य वाटसरु भेटतात...

पापण्यांचा खेळ खेळतात...

जिंकले की निघून जातात...

काही मात्र...

कायमचेच स्मरणात राहतात...

(इच्छा नसतानादेखील)

अनु....

तशीच तू, कायमचीच स्मरणात राहिली. आठवतो तुला आपला पहिला पापण्यांचा खेळ, अन सुखांचा मेळ. १९९९ ते ११ फर्स्ट इयर. सर्वच काही नवीन. नवा उत्साह आणि नवा पावसाळाही. त्या दिवशी कॉलेज एक तास लवकर सुटलं. अगदी ढगांचा गडगडाट चालू असतांनाच बाहेर पडलो, तर श्रावणसरींचा नाच चाललेला. कुणी एकमेकांच्या छत्र्यामध्ये तर कुणाचे रेनकोट, कुणाच्या उसनं अवधान आणून स्टार्ट होणाऱ्या व चिखल उडवत जाणाऱ्या गाड्या, मला मित्राची संख्या कमी, त्यात दोस्तीचा ओला दुष्काळ, म्हणून की काय पण आपल्या महाविद्यालयाच्या उताराने झपझप पावले स्टॅन्डकडे पडू लागली. प्रथम पावसाचा त्रास वाटू लागला. पण पूर्ण भिजल्यावर बरं वाटू लागलं. काही क्षणातच... रोडच्या पलीकडं पाहिलं... झपझप पावलं टाकीत तू चालली होतीस. चालण्याची तुझी घाई, पावसाची त्यापेक्षा जास्त घाई. वह्या दोन्ही हातांच्या मिठीत. ओढणी अर्धी डोक्यावर, अर्धी खांद्यावर, तो एकच क्षण आणि एकच...एक कटाक्ष... जाणाऱ्या येणाऱ्यांना आणि वाहनांना आपलं सोयरसूतक नव्हतं तेव्हाच वाटलं... दोन ध्रुवांवर दोघे आपण... तरीही... made for each other... तू आताही विचारशील मग काय पाहिलंत माझ्यात ? तर सांगू...

सखे, तू फार सुंदर आहेस

विचार का म्हणून ?

तर...?

तू फार सुंदर दिसतेस म्हणूनही नाही.

अन फार मोहक दिसतेस म्हणूनही नाही. तर तुझ्या ओठात पावित्र्यता अन डोळ्यात निरागसता आहे म्हणून.... सखे तू फार सुंदर...

खरंच अनु तो नजरेचा सिलसिला सुरू झाला. आज पाच वर्षे झालीत थांबला नाही आणि कमीही झाला नाही. उलट आज धोक्याच्या वळणांवर येऊन उभा राहिलाय. त्यावेळी कुठं माहीत होतं की दैव आपली खूप कठोर सत्व परीक्षा पाहणार आहे म्हणून. मांजर डोळे मिटून दूध पिते कुणी बघत नाही म्हणून, पण काकूंच्या हातचं लाटणं जेव्हा पाठीत बसतं. तेव्हा चौदाव्या रत्नाचा साक्षात्कार होतो आणि डोळ्यापुढं काजवे चमकतात. आपणही दोन वर्षे गंभीर शांततेत घालवली. तिसऱ्या वर्षी मित्र मैत्रिणींना शंका. पुढे तुझ्या घरी कुणकुण आणि यावर्षी स्पार्कींग. बोभाटा अगदी नको तेवढा. आज प्रश्न पडतोय आपलं प्रेम सोडून मित्र-मैत्रिणी नातेवाईक घरचे दारचे यांना दुसरा विषय आणि काम नाही का ? आणि याला जबाबदार कोण ? अनुराधा मॅडम, आपणच. म्हणजे बऱ्याच अंशी तू. मी म्हणत होतो ही पत्रं बंद करू नाहीतर त्रास होईल. तू हसून म्हणालीस कागदांचा आणि पेनचा खर्च देते. तुम्ही लिहीत जा आणि आता हो बाईसाहेब घरी गेल्या, निवांत जेवल्या, लाईट गेली म्हणून दिवा लावून अभ्यासाला बसल्या. आई-बाबांना लाडक्या लेकीच्या अभ्यासाचं कौतुक वाटलं आणि तोंडावर सातबाराचा म्हणजे माझ्या प्रेमपत्राचा उतारा ठेवून, लेकरू शांतपणे झोपी गेलं. झोपेत दिवा पडू नये म्हणून तुमच्या मातोश्री डोकावल्या, आणि जवळ येवून पाहिलं काय अभ्यास करतेय ते ? तर तुझी प्रेमात चाललेली पी. एच. डी. उघडी पडली. असचं ना ? तु बावळट. एका क्षणात सारं उघडं केलंस. झाकून ठेवलेलं कोंबडं आरवतं तसं पुन्हा

म्हणते So Sorry डोंबल माझं कप्पाळ.

अनु ! काय केलसं हे जराही सावधानता नाही. तुला झालेला त्रास मला माहीत नाही का ? डोकं अगदी बधीर झालयं. तरीही तू प्रथम शांत हो. पश्चाताप करत बसू नकोस. मी. आहे. मार्ग निघेल. सर्वाना समजलं आहेच आणि परिणामही भोगलेत आणि आता go to the target अगं अनु मधल्या बऱ्याच घटना तुला माहीत नाही त्यानंतर तुझे बाबा आमच्या घरी येवून त्यांच्या राजकारणाची खादी धुवून गेलेत. सर्वांना सज्जड दमही दिला. इ. माझ्यावर इंगळासारखे डोळे केले आणि म्हणाले बघून घेईन ? काय ? ते मात्र सांगितलं नाही. मग ते देशाचं हित म्हणत होते की आपलं ते मात्र समजलं नाही. वडिलांशी ते सभ्यपणाने बोलले नाहीत. पोराला काही काम मिळत नसेल तर थेटरच्या डोअरवर तिकीटं फाडायला ठेवा असे म्हणाले. अगं, ज्यांना सॉफ्टवेअर आणि अंडरवेअर यातला फरक कळत नाही त्यांनी असं म्हणावं. ठिक आहे मी बेकार आहे. मला नोकरी नाही. पण एक गोष्ट खरी सांगतो. अनू तुला आणि कुटुंबियांना सुखात ठेवण्याची ताकद आणि संस्कार आहेत. माझ्या जवळ तुझ्या बाबांची तोफ कडाडून गेल्यानंतर आई रडली अन् वडील काही न बोलता कारखान्यावर निघून गेले. संध्याकाळी मात्र मला रिंगणात घेतलं. मी आपला भूतकाल इतिहासरुपाने मांडला. काही काळ सुन्न अवस्थेत गेला. वडील आपण अनुला मागणी घालून पाहू म्हणालेत. अनु तुझे बाबा कट्टर राजकारणी. त्यांच्या मनातला जावई हा असाच एखाद्या पोलिटीकल रिडर्सचा बगल्याचा असेल. म्हणजे बुद्धीबळाच्या पटावरील तु आता 'सोंगटी' ठरणार असा त्यांचा ठाम विश्वास. पण अनु. तू काळजी करू नकोस. एवढ्या एक दोन महिन्यात माझी नोकरी किंवा बिझनेस प्लॅन नक्की यशस्वी ठरणार. दोनपैकी एक पर्याय आपणच ठरवणार आहोत यात तुझी साथ हवी. कारण मला तुझा हात मागायचा आहे. दुखणं अवघड आहे. अवघड जागी आहे. पण अशक्य नाही. तुझ्या आईची टेन्डंसी बदलली आहेच हळूहळू बाबांमध्येही परीवर्तन (?) होईल. यासाठी मी दोन वजीर शोधलेत मध्यस्थी म्हणून ते डाव चेक ॲन्ड मेट होऊ देणार नाहीत तर करतील पण लग्न लावून देतील आता तर खुश.

पॉलिटीक्स इज दी प्ले ऑफ स्काऊन्ड्रल्स - राजकारण हा बदमाशांचा खेळ आहे. मग आता मलाही तुझ्या बाबांसाठी थोडं बदमाष व्हावच लागेल. अनु, आज जरा जास्तच सिरीयस लिहलय. तुला वाईटही वाटेल. पण वास्तव स्वीकारावंच लागेल आणि एक सर्वात महत्त्वाचं लक्षात ठेव आपण कधीही पळून जाणार नाही. कधीही नाही. कितीही त्रास होवो. समजलीस सर्व ठीक होईल. तू शांत रहा. तुझ्या बाबांना पक्षातून माणसं मारण्याचं लायसन्स नाही मिळालं, घाबरू नकोस. तुझ्या आईला जशी तुझ्या गालावरचा पंजा बघून तुझी दया आली. तरी तु समजुतदारपणे घेतलंस. तुझी भूमिका आणि आपला भविष्यकाळ यशस्वीपणे मांडला तर उद्या तुझे बाबाही मांडव घालण्याची तयारी करतील. तेव्हा इथं प्रत्येकालाच वाटतय आपण किती शहाणे ? यावर एकच उपाय सगळं शांतपणे ऐकत राहणे. म्हणून पळून जाण्याचं खूळ मनातून काढून टाक. तापलेल्या प्रकरणातून तुला भेटणं बोलणंही अशक्य होतयं माझा स्पर्धा परीक्षेचा अभ्यासही कमी पडलाय. घरचे मात्र मला काहीही म्हणत नाहीत. आपण काहीही अक्षम्य गुन्हा केला नाही. सर्वांची मानसिकता व्यवस्थित करावी लागेल. पण तू खूप हलक्या डोक्याची विचार करुन रडत बसणारी. शपथ आहे तुला अश्रुंचा एक थेंबही डोळ्यातून ओघळू न देण्याची. तुझा जबरदस्त विश्वास आणि धीर पाहिजे. आपल्या भवितव्यासाठी... धरी धर सखे, आता लागेलच किनारा. असू दे कितीही समस्यांचा ढिगारा. जागा मिळताच चूल मांडू -

तोवर हृदयावर ठेव निखारा. अगं अनु 'अगं अनु' तुझ्या अश्रुंची फुले होतील. आमच्या अंगणात तुझ्या हातांनी शेणसडा अन रांगोळी सजेल. तुझ्याच पैंजणाचा आवाज तुळशीभोवती गुंजेल आणि पाटलाची कन्या आमच्या घरची लक्ष्मी म्हणून सुखानं राहील. तुझे सर्व लाड इथं आनंदाने पुरवले जातील. सर्वांच्या साक्षीनं लक्ष्मीच्या पावलांनी वैभव प्राप्त होईल आपल्या कष्टाच्या ताकदीनं, सामर्थ्याचे पंख फुटतील तुझ्या माझ्या हिंमतीनं.

अनु, आता तुला धीर आला असेल, अशी माझी खात्री आहे. तु इतकी भोळी आणि निरागस आहेस की दैव तुझी कधीच सत्वपरीक्षा पाहणार नाही. मान अपमान चालूच

असतात. मनावर घेऊ नकोस. तुझ्या गालावरची खळी खळाळत राहीली पाहिजे. ओठांची अन् नजरेची उधळण दरवळत राहिली पाहिजे. अगं कधी कधी मलाही वाटतं...

काश ! हमारा घर आपके घर के सामने होता... मिलना तो दूर, कमसे कम देखना तो नसीब में होता...

काल तुझा भाऊ अनिकेत भेटला. आमची मम्मी तुमच्या घरी येणार आहे असं म्हणाला. कशासाठी हे मात्र नाही सांगितलं. बहुतेक तुझ्या आईचे मत आपल्यासाठी असेल असे वाटते. स्वत:ला जपत जा. काळजी घे हे काही फार मोठं संकट नाही. तुझ्या बांगड्यांची किणकिण पुन्हा खुलू दे. लांबसडक शेपट्यामध्ये नेहमीसारखा मोगऱ्याचा झुपका पुन्हा उमलू दे. गोबऱ्या गालावरची केसांची भुरभुरणारी सोनेरी बट सावरुन आणि पुन्हा ओठांचा चंबू करून अमृतवाहिनीवरच्या रंधा धबधब्यावरच्या खडकांवर तुझे आवडते गीत पुन्हा एकदा ऐकव मला.

मैं जिस दिन भूला दू, तेरा प्यार दिल से

वो दिन आखरी हो... मेरी जिंदगी का..

अनु, लोक काय बडबडतील तिकडे लक्ष देवू नकोस. आपले निर्णय आपणांस पूर्ण विचाराअंती घ्यावे लागतील. तेव्हा तुझ्या स्वप्नांमधली चांदण्यांची रात... हातांमध्ये गुंफलेले हात... मंद दरवळणारा सुगंध सत्यात उतरेल अशी माझीही मनोमन इच्छा आहे. खूप सोसलयं आपण आता सुखाचे क्षणही दूर नाहीत. धीर धर.

आज तू पत्र वाचून तशीच म्हणजे पहिल्यासारखीच झोपी जाणार नाहीस, याची मला खात्री आहे. तुझा वाढदिवस जवळ आलाय. माझ्या आणि तुझ्यासाठी कर्फ्यु आहेच. येता येणार नाही. फक्त एक आरसा आणि कुंकवाचा करंडा घेवून ठेवलाय. तुझ्या माझ्या स्वप्नांच्या पुर्ततेसाठी.

पुन्हा एकदा गुलाबाचं तुझ्या केसात शोभणार, दर्शन होणार, येणार ना ? आणि घरी सारखा फोन करू नकोस. कधी कधी वडील फोन उचलतात आणि माझ्याकडे बघून आकाशवाणी केंद्राचा फोन रात्री उशीरापर्यंत चालतो म्हणतात. आईशी गप्पा मारत जा. ती तुझ्यावर जाम खुश आहे. लाडकी सून म्हणून. अच्छा अनू खुप लिहीलंय कंटाळली असशील आणि नसशील तरीही एक गोष्ट सांगतो फार विचार करू नकोस. प्रत्येक गोष्टीला समोरं जाणं एवढंच आपल्या हातात आहे. सर्व गोष्टी ठीक होतील तु हसलीस तर, तेव्हा.

बाकी सर्व ठीक आहे. आपली भेटण्याची व्यथा सोडून. भेटीअंती खूप बोलू तोपर्यंत खूष रहा. आनंदी रहा आणि त्या आनंदी क्षणांचे आभार मान. आठवतं का तुला आपलं एकाच छत्रीतून जाणं ओघळणारे थेंब आपण निथळतांना पहाणं खरंच तसं तू एवढं नाराज होण्याचीही गरज नाही. प्रेमाचे, आनंदाचे क्षणही काही कमी नाहीत. त्या आठवणी आपल्या जीवनातील आठवणींचा अमृततुल्य ठेवा आहे. म्हणून Never admit the pain आपल्या दु:खाची जाहिरात करू नकोस. मी म्हणालो प्रेम म्हणजे आपल्या मनांची भाषा. तु म्हणालीस मला नाही पटत पण माझ्या मते... आपलं प्रेम म्हणजे आनंदाची उधळण, दु:खांची वजाबाकी, निराशेचा शून्य आणि उत्साहाचा सागर ! काही वेळ जाऊ दे, सर्व गाठी सुटतील. त्यांच्या रेशीमगाठी होतील. सुखाचे क्षण आता दूर नाहीत. अजून एक सांगायचंच राहीलं आरशात पाहताना तुझी खुप आठवण येते. तुझा चेहरा खुणावतोय. काहीतरी बोलतोय. भास की आभास ते तुच सांग ?

तुझ्या उत्तराची वाट पाहतोय तोपर्यन्त....

तुझा

**- सुदर्शन**

■ ■ ■

**सुभाषित सरिता**

**सज्जन**

**शैले शैले न माणिक्यं, मौक्तिकं न गजे गजे।**
**साधवो न ही सर्वत्र, चन्दनं न वने वने ॥**

प्रत्येक पर्वतावर काही हिरेमाणके सापडत नाहीत; प्रत्येक हत्तीच्या गंडस्थळामध्ये मोती सापडतोच असे नाही; सगळीकडेच काही सज्जन माणसे नसतात आणि चंदनवृक्ष प्रत्येक वनामध्ये आढळतो असे नाही.
जगात श्रेष्ठ गोष्टी अत्यंत दुर्मिळ असतात.

# दैव

शिवराम शून्यात दृष्टी लावून अंगणातल्या लिंबाच्या झाडाला टेकून बसला होता. घरामध्ये त्याची बायको रखमा भाकरी थापीत होती. त्यांना रघु, एकुलता एक मुलगा होता. त्याचा बा शिवराम बिचारा एकर-दिड एकरच्या शेतात सतत राबत असे. तेव्हा खर्चाची तोंडमिळवणी होत होती. सोबत लहानग्या रघुला घेऊन रखमा शिवरामला कामात मदत करी घरचे काम करून मोलमजुरीही करीत असे. रघु, रखमा शिवरामचा जीव की प्राण होता. शिवरामनं रघुला सहाव्या वर्षी गावातल्या प्राथमिक शाळेत घातले. रघु चौथी पास झाला व शेजारच्या गावात हायस्कुलला जायला लागला. शिंदेवाडी एक छोटसं गाव तेथे महादराव पाटील गावचे पाटील होते. महादराव मोठा दिलदार आणि जाणकार माणूस होता. घरी चार बैल भरपुर शेती होती पण महादरावाला मुलगा नव्हता गावात महादरावचा शब्द प्रमाण होता. गावातला तंटा बखेडा महादराव गावातच सोडवत असे. त्याला सीता एकुलती एक मुलगी नाकी डोळी छान, निमगोरी. महादराव सीतालाच आपला मुलगा मानत असे. सीताही चौथीनंतर शिंदेवाडीच्या शाळेतून आंबे वाडीच्या हायस्कूलात जायला लागली. रघु तिचा वर्गमित्र, आंबेवाडी व शिंदेवाडीच्या मधोमध मोठी नदी होती. त्या नदीवर जाण्या-येण्यासाठी एक पूल बांधला होता. पूल कमी उंचीचा असल्याने पावसाळ्यात नदीचे पाणी पुलावरून वाहू लागे. जास्त पावसाच्या दिवसात पुलावरून जाणे-येणे बरे होत असे.

नुकतीच शाळा सुरू झाली होती. मृग नक्षत्राची सुरुवात झाली होती. दिवसा उकाड्यामुळे माणसे उकडून निघत होती. दुपारी ४ नंतर आकाशात ढग जमा झाले. काळं भोर शिवार हादरत होता आणि अचानक वळवाला सुरुवात झाली. मुसळधार वळीव सुपारीएवढ्या गारा घेऊन धो-धो बरसू लागला. झाडाच्या फांद्या सोसाट्याच्या वाऱ्याने जमिनीला नाक घासायला लागल्या. दुपारभर पावसाचं थैमान सुरू होतं. शाळेची सुट्टी झाली तरीही पाऊस कोसळतच होता. शिंदेवाडीची दोन-चार पोरं शाळेतच थांबुन होती. पाऊस कमी झालेला पाहून घराकडं पळाली. रघु त्याचे मित्र, सीता घराच्या रस्त्याला लागली. नदीच्या पुलाजवळ आली. पाणी पुलावरून वहायला लागले होते. पोरं पाण्यात घुसली एकमेकांच्या हाताला हात देत पुढं सरकत होती. सीता ही रघुच्या मदतीने पाण्यातून पुलावरून वाट काढत होती. पाणी हळूहळू वाढत होतं. रखमा मुलांना मागं फिरा म्हणुन ओरडत होती. पोरांना पाण्याचा अंदाज आला नाही. पोरं गडबडली होती. पाठीमागं जावं की सरळ पुलावरुन शिंदेवाडीत जावं पाणी कमरेला लागलं होतं. सीता मात्र पुरती घाबरली होती. वाढत्या पाण्यामुळे सीताचा हात सुटला आणि पाण्याबरोबर वहायला लागली. रघूनं पाहीलं तशी त्यानं पाण्यात उडी मारली आणि सीताला धरायचा प्रयत्न करू लागला. रघुला पोहता येत असल्यामुळे त्याने सीताचे केस धरून कसेबसे पाण्यात हात मारत तो सीताला किनाऱ्याकडे ढकलत होता. नाकातोंडात जाणाऱ्या पाण्याची पर्वा न करता तो सीताला किनाऱ्याकडे ढकलत होता. किनाऱ्यावरची मंडळी त्याला धीर देत होती. रघुनं सीताला कसंबसं किनाऱ्यावर आणलं. गावकऱ्यांनी सीतेला उचलून घेतलं रघुलाही उचलून घेतलं व दोघांचेही पटापट मुके घेवू लागली. तोपर्यंत बातमी गावात पोहोचली पाटील घाबऱ्या घाबऱ्या अवस्थेत नदीकडे आले. पाटील रघुजवळ येऊन म्हणाले, शाब्बास रे माझ्या वाघा ! तू सीताचा जीव वाचवून आमच्यावर लई उपकार केले बघ !

रखमानं रघुला मिठ्ठी मारली व त्याला कुरवाळू लागली. गारठलेल्या रघुला मायेच्या उबेने हायसे वाटले सगही मंडळी गावाकडं निघाली काळाकुट्ट अंधार पडला होता. गावात रस्त्यावरून पावसाचं पाणी वहात होतं. रघुच्या हाताला पकडून रखमा लगबगीनं घराकडं निघाली होती. घरी पाहते तर बैल अन् शिवराम आलेला नव्हता. तिच्या

काळजात धस्स् झालं. अंगनात रघुनं दादा दादा म्हणून हाका मारल्या त्याच्या मनात वेगळाच संशय येऊन गेला. रखमा घर न उघडताच महादरावाच्या घराकडं धावली. महादरावांनी शिवराम घरी न आल्याचं आश्चर्य वाटलं.

महादरावाने रखमाला धीर दिला व आपला गडी सद्याला घेऊन महादराव हातात कंदील घेऊन शिवरामाच्या शेतात पोहचले अंधारामुळे रस्ता नीट दिसत नव्हता. जमिनीत गुडघाभर पाय जात होते. रघु लगबगीने महादरावाबरोबर चालत होता. महादराव शिवरामाच्या विहीरीजवळ पोहचले पुढे आंब्याच्या झाडाकडे जाऊ लागले. रघु दादा दादा म्हणून हाका मारीत होता. पण सगळा आसमंत शांत उभा होता. आंब्याच्या झाडाखाली पोहोचले तो दोन्ही बैल निपचित पडले होते. झाडांच्या फांद्या खाली पायाला लागल्या. रघु महादराव शिवरामजवळ गेले. महादरावाने कंदील हातात धरून शिवरामला हात लावून हाक मारली. पण काहीही हालचाल दिसेना. रघुच्या सगळा प्रकार लक्षात आला. शिवरामचे डोळे उघडे होते. चेहरा भाजलेला होता. डोक्यावरचे केस, मिशा जळालेल्या होत्या. सगळं शरीर ताठ झालं होतं. महादराव गोंधळले व मनाशीच पुटपुटले, रघु बाळा आभाळाच्या वीजेने घात केला रं. इज पडली! अनं होत्याचं नव्हतं झालं. रघुनं शिवरामच्या गळ्यात पडून हंबरडा फोडला. वेळ कठीण होती. महादरावाला बोलणं सुचेना. रखमाला काय सांगायचं महादरावाने धाय मोकलून रडणाऱ्या रघुला उचललं सगळ्या आसमंताला रघुचा आवाज चरचर कापत होता. कोवळ्या वयात त्याच्यावर हा मोठा वज्राघात होता. पितृछत्र हरवलं होतं. अन् रखमाला ऐन उमेदीत वैधव्य आलं होतं. एक खांबी तंबूचा खांबच तुटला होता. जेव्हा जेव्हा रघु आठवणी आठवत असे तेव्हा समोर काळी कुट्ट रात्र, धो धो पडणारा पाऊस आणि कानठळ्या बसवणारा गडगडाट त्याला अर्धमेला करीत असे.

रखमा नेटाने संसार चालवत होती. रघु शिंकत होता. अभ्यासात जेमतेम परंतु खेळामध्ये मात्र चांगला प्रवीण होता. खो-खो, कब्बडी, कुस्ती, धावणे हे त्याचे आवडते खेळ होते. शरीरानं चांगला पिळ्दार बनला होता. बारावी पास झाला. पण एकटी रखमा किती दिवस प्रपंच चालवणार म्हणुन मेटाकुटीला आली होती. रघुला पुढे शिकावं वाटलं पण परिस्थिती त्याला बघवत नव्हती बेकारीचा प्रश्न बिकट होता इतर शिकल्यासवरल्या मुलांची बेकारी पाहून तोही स्तंभित झाला होता. त्याला नोकरी करून चार पैसे कमवावेत व आपल्या आईला सुखाचे चार दिवस लाभावेत यासाठी तो चाचपडत होता. पण मार्ग सापडत नव्हता.

रघु नोकरीच्या शोधात तालुक्याच्या गावी, जिल्ह्याच्या ठिकाणी फेऱ्या मारत होता. सैन्य भरतीसाठी जाऊन आला. भरतीमध्ये तंतोतंत बसला होता आणि अचानक त्याला शिंदेवाडीत पत्र आलं त्याची निवड झाली होती. प्रशिक्षणासाठी त्याला बोलावणं आलं होतं. ठिकाण होतं डेहराडून. धावतच त्यानं पत्र आईला दाखवलं, रखमा मनोमन सुखावली. माझा रघ्या आता मिलीटरीत हापीसर होणार. पण शिवरामच्या अचानक जाण्याने आणि रघुचं कौतुक करायला शिवराम नसल्याचे क्षणातच तिच्या डोळ्यात पाणी तरारलं. पदरानं डोळे पुसत ती आपले अश्रु रघुपासून लपवीत होती. पण रघुच्या नजरेतुन सुटणं शक्य नव्हतं. रखमाच्या मनाची अवस्था बिकट झाली होती. घरात कर्ता धनी नव्हता. एकुलता एक लेक तोही आता खूप दूरवर जाणार अन तेही सैन्यामध्ये, शिवरामच्या अचानक जाण्याने हादरलेली रखमा खुपच हळवी झाली होती. पण रघूच्या आनंदापुढे, भल्यापुढे आपली दु:खे ती झटकन टाकत होती.

इकडे सीताचे लग्न महादरावांनी शेजारच्याच गावात जमवले होते. भरपूर शेती आणि वैभव असलेलं घर महादरावानं शोधलं होतं. चैत्रात लग्नाचा मुहूर्त ठरवला होता. रघुचं नोकरीचं काम झाल्याचं ऐकून महादरावालाही बरं वाटलं होतं. महादराव रघुच्या घरी आला. लग्नाचं आमंत्रण दिलं अन् सिताचं लग्न उरकुनच रघुला निरोप देण्याचं ठरवलं होतं. चैत्रात मोठ्या थाटात सीताचं लग्न पार पडलं. रघु घरचंच कार्य असल्याप्रमाणे सिताच्या लग्नात धाव धावला अन् लग्नानंतर दोन चार दिवसांनी स्वत:च बोजा बिस्तर आवरुन सैन्यात जाण्यास तयार झाला. त्याला आंबेवाडीपर्यंत पोहोचवण्यासाठी रघुचे मित्र, रखमा, महादराव, महादरावाची बायको लक्ष्मी त्याच्याबरोबर आले

होते. रखमा मात्र एकाचवेळी आनंद आणि दु:ख अनुभवत होती. पोटचा गोळा आता दूरदेशी निघाला होता. एकट्या आईला एकटीलाच सोडून. पण रखमानही मन घट्ट केलं होतं. महादरावानं रघू गेल्यानंतर रखमाची काळजी घेण्याची व त्याच्या जमिनीकडे लक्ष देण्याची जबाबदारी स्वत:वर घेतली व रघुला निरोप दिला.

रघु प्रशिक्षण व्यवस्थित पूर्ण करून कडवा सैनिक तयार झाला होता. तब्बल वर्षानंतर रघुला रजा मिळाल्यावर रघू सैनिकाच्या वेशात अचानक गावात हजर झाला. रखमाच्या आनंदाला पारावार राहिला नाही. मिसरुड फुटलेल्या रघुची ती पटापट मुके घेऊ लागली. महादराव तेवढ्यात रघूच्या घरी आला. मायलेकाचं प्रेम पाहून त्यालाही गहीवरुन आलं. रघुला सैनिकी वेशात पाहून महादराव बोलले, शाब्बास पठ्ठा ! आता खरा मर्द शोभतो.

पण रघू सैन्यात तुला भिती वगैरे वाटत नाही ना? यावर रघू उत्तरला, सैन्यात नोकरी लई झक्कास ! रोज शेळीचं जगणं जगण्यापेक्षा एक दिवस वाघाचं जगणं कधीही चांगलंच.

रघूने रखमासाठी पेढे, मिठाई, भरजरी साडी अन् दागिने आणले होते. रखमाला स्वत:च्या लेकांच्या कमाईचं खुपच अप्रूप वाटलं. गावभर पेढे वाटत हिंडली रघुचे दोन महिने. घरी गेला तेथे सीताला पाहून त्याला कससंच वाटलं. लक्ष्मीबाईकडून सीताची सारी कहाणी त्याला कळाली - सीताच्या घरच्यांनी त्यांचे रंग महादरावांना दाखवले होते. सीताचा हुंड्यासाठी खूप छळ करण्यात आला होता. अन् तिच्या नवऱ्याने घरामध्ये दुसरी बायको करून आणली होती. सीता मात्र रघुची नजर चुकवत होती. तिचे दु:ख तिच्या चेहऱ्यावरून रघुने जाणले होते. अचानक पोस्टमन महादरावाच्या घरी तार घेऊन हजर झाला. रघुने तार पाहिली. ''हवालदार रघुनाथ शिवराम शिंदे तुरंत ड्युटीपर होना ।'' काश्मीरमध्ये पाकिस्तानने घुसखोरी केली होती. भारतीय फौजांनी घुसखोरांना हाकलण्यासाठी ऑपरेशन विजय सुरू केलं होतं. रघुनं सायंकाळीच सामानाची आवरासावर केली. रखमानं आपल्या लेकरासाठी पुरणपोळीचा बेत केला होता. सीता लक्ष्मीबाई मदतीला आले. महादराव, रघू एका पंक्तीला मनसोक्त जेवले. रखमा रघुचं विलक्षण हसतमुख बघुन सुखावली होती. जेवणानंतर गप्पा झाल्या. रघुने आईच्या खर्चापाण्याची तरतूद केली. वाण्याची उधारी मिटून टाकली. घरात चार-दोन महिने पुरेल एवढे सामान आणून ठेवले आणि शांत झोपी गेला.

सकाळीच सैनिकाच्या वेशात रघुने रखमाच्या चरणावर माथा टेकवला. लक्ष्मीबाईनं ओवाळले रघुच्या तोंडात साखर घातली. रघुने सर्वांचा हसतमुखाने निरोप घेतला. रघुची रवानगी थेट कारगिलमध्ये झाली. रघुचे बाहू फुरफुरत होते. शत्रुचा वेध घेण्यासाठी त्याचे हात सळसळत होते. इकडे रेडिओवर भारतीय सैन्याने एक एक ठिकाणी काबीज केल्याच्या बातम्या ऐकत होती. पण तिला रघुच्या नावाचा उल्लेख ऐकायला मिळत नव्हता. भारतीय सैन्याने सर्व घुसखोरांना हाकलले होते. पण रघुची काहीच बातमी शिंदेवाडीपर्यंत पोहोचली नव्हती. सहा महिने उलटून गेले होते. रखमानं महादरावांच्या मदतीने रघुला फोन करायचे बरेच प्रयत्न केले. पण यात यश येत नव्हते. सैनिकी सूत्रांकडूनही रघुबद्दलची खात्रीशीर बातमी समजत नव्हती. रखमाचे अन्न पाणी तुटत चालले. डोळे खोल गेले होते. कधी कधी बिचारी रघुला फोटोत पाहून उपाशी झोपी जात होती. नऊ महिन्याने अचानक एक रिक्षा शिंदेवाडीत येऊन थांबली. रिक्षावाल्याने जड पेटारे खाली उतरून ठेवले व आतमधल्या एका जवानाला आधार देत खाली उतरून घेतले. हा जवान कुबडीचा आधार घेऊन ताठ मानेने गावकऱ्यांकडे पाहत होता. शंभर सव्वाशे गावकऱ्यांचा गराडा त्याला पाहत होता. रघु आला म्हणुन कुजबुज चालू होती. सीताला रघु आल्याची बातमी समजली. तशी तिनं रखमाकडं धाव घेतली. अंगावरच्या पदराची तमा न बाळगता सीता रखमाच्या ओसरीवर पोहोचली दळण करणाऱ्या रखमाच्या कानात मोठ्याने ओरडली, रघू आला....

शरीराने क्षीण झालेली रखमा हातातले सूप टाकुन ताडकन उठली. अन् मंदीराकडच्या पाराकडे धाव घेतली. गर्दीतून वाट काढत रघुपर्यंत पोहोचली.

समोर एक पाय अन एक हात गमावलेला रघू पाहुन रखमानं हंबरडा फोडला. एकीकडे रघु आल्याचा आनंद

होता. तर हात पाय गमावलेला जवान मुलगा समोर उभा होता. गर्दीतून रघुनाथ शिंदे झिंदाबाद ! अशा घोषणा झाल्या रघुचा चेहरा शांत होता. चेहऱ्यावर हास्य होते. विजयाची उर्मी होती. नजर आश्वासक होती. रघुनं आये म्हणून हाक मारली. रखमानं रघुला कवटाळले. रघु बोलला आई शत्रुला चारी मुंड्या चीत करुन आलेल्या मुलाला तू पुरणपोळी करणार नाही. अगं अश्रु पुस माझा एक हात व एक पाय अजून धडधाकट आहे. अगं अनेक घुसखोरांना कंठस्नान घालुनच हे हात थांबलेत. सर्व गर्दी शांत होऊन ऐकत होती. गावकऱ्यांचा उर भरुन आला होता. महादराव पुढे आले आणि बोलू लागले,

'शिंदेवाडीकरांनो, आपल्या रघुनं आपल्या गावाचं नाव देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचवलं. आपल्या गावाचं नाव मोठं केलं. या मातीचा हा वीर सुपुत्र दुश्मनाला गारद करूनच गावात आला. महादरावांनी गर्दीतुन रखमाला, रघुला घरी नेलं. भरपूर गप्पा झाल्या. सीतालाही रघुबद्दल आदर वाटत होता. ती विचार करीत होती. माझं नशीब किती फुटकं आहे ? कुठून दारूड्या माझ्या पदरात पडला. रघु सारख्या शूर शिपायाशी माझं लग्न झालं असत तर किती अभिमानानं मिरवता आलं असतं. तिच्या डोळ्यात अश्रू तरळले. रघुने सैनिक सहायता निधीतून अल्पव्याजी कर्ज मिळवून गावात किराणा दुकान थाटलं. शेतात नव्या विहिरीचं काम करुन घेतलं. रखमाला आता बरे वाटत होते. पण काळजी मात्र तिला पुन्हा धास्तावत होती. हात पाय नसलेल्या रघुला कोण मुलगी देईल ? कोण त्याच्याशी लग्न करायला तयार होईल ?

रखमा व रघुला संक्रांतीला महादरावांनी जेवणासाठी आमंत्रण दिलं. जेवणं उरकली तेव्हा रखमानं न राहून विषय काढला. रघुच्या लग्नाची चिंता तिला सतावत होती. सीता सर्व गप्पा ऐकत होती. महादराव रघुच्या पाठीवर थाप टाकुन बोलले, 'अरे रघु ! आम्हा सगळ्या गावकऱ्यांना तू लग्नात उभे करायला तयार आहे ना ? रघु थोडा वेळ गंभीर झाला मनातले भाव लपवीत बोलू लागला,

'अण्णा ! पुर्वीचा रघू धडधाकट अन खणखणीत होता. पण आजचा रघु अपंग झाला आहे. एखाद्या मुलीबरोबर लग्न करून मी बोजा का म्हणुन बनू ? का तिच्या बिचारीवर माझ्या संसाराची जबाबदारी टाकू ? कोण माझ्या हाता-पायाकडे पाहुन लग्नाला तयार होईन? तेवढ्यात सीता महादरावाच्या समोर येऊन बसली आणि बोलू लागली,

'अण्णा, मी आपल्या समोर बोलले नाही, आज मला बोलु द्या. मी रघुशी लग्न करायला तयार आहे. एखाद्या दारूड्याची बायको म्हणून जगण्यापेक्षा एका वीर जवानाची बायको म्हणून जगण्यात मला आनंद वाटेल. एक हात आणि एक पाय नाही म्हणुन काय झाले? मला आहेत ना दोन हात आणि दोन पाय ? एका सैनिकाची सेवा करण्याचे भाग्य मला लाभेल. क्षणभर महादराव, रखमा, लक्ष्मीबाई अवाक् झाले. अन् मकरसंक्रांतीला रघुचं लग्न झालं. रघू आणि सीता सुखाने संसार करू लागले.

■ ■ ■

---

**सुभाषित सरिता**

**सद्गुण**

अमन्त्रम् अक्षरं नास्ति, नास्ति मूलम् अनौषधम् ।
अयोग्यः पुरुषो नास्ति, योजकः तत्र दुर्लभः ॥

मंत्र नसलेले असे एकही अक्षर नाही; औषध नसलेले मूळ नाही; योग्यता नसलेला कोणीही माणूस नाही; योजना करणारा हाच त्या त्या बाबतीत दुर्मिळ असतो.

कोणतेही अक्षर मंत्रातील शब्दांत येऊ शकते, किंवा एकाक्षरी असा मंत्रही असू शकतो, उदा. ओम्, शं, गं इत्यादी. प्रत्येक झाडाचे मूळ, पाने, फळे, फुले, यांच्यात औषधी गुण असतात. प्रत्येक माणसात त्याचा विशेष असा एखादा चांगला गुण असतो. मंत्र रचणारे, औषधी व माणसे यांचे गुण जाणणारे व त्यांचा योग्य उपयोग करणारे तज्ज्ञच दुर्मिळ असतात.

# मीच तो अभागी

सकाळची वेळ होती. दारा म्होरच्या गाईला विलास पाणी पाजत होता. आई भाकरी बांधत होती. दादा बैलगाडी जुपत स्वत:शीच गाणं गुणगुणत होता. गावची पोरं मंदिराजवळ खेळत होती. पारावरचा न्हाई डोकी दाढी करीत होता.

एवढ्यात राघवदादानं विलासला हाक मारली, ''अरे विलास कधी जातोय मुंबईला ?'' तशी हातातली बादली खाली ठेवून विलास राघवदादाकडे आला. ''नाही नाही मी आता मुंबईला जाणार नाही.'' राघवदादा आचंबाने पाहत विलासला म्हणाला, ''कारं पोरा, का जात नाही मुंबइला ?'' ''राघवदादा एवढ्या कष्टातून शिकलो, एक वेळच्या जेवणावर राहिलो. बोर्डिंगातला त्रास सहन केला. पण राघवदादा नोकरी मिळत नाही.''

''घरची शेती कोरडवाहु अन् पाऊसपाणी नाही तर पिकणार कुठून ? पण मी ठरवलंय राघवदादा...''

''काय रं काय ठरविलं तु ?''

''मी... मी सैन्यात भरती होईन.''

''अरं वा'' म्हणत राघवदादा विलासला म्हणाला, ''माझ्याबरोबर आठ दिवस तालमीत चल. चांगला तयार करतो.''

''पण राघवदादा, पुढच्या आठवड्यात भरती हाय. पेपरात वाचलयं...'' एवढ्यात आईने हाक मारली. दादानं जुपलेल्या गाडीकडं पाहत विलास गाडीकडं गेला. आईनं दार लावलं. समदं गाव कामावर गेलं, आण आपण हाय इथं, असं म्हणत म्हणत आई विलास बैलगाडीत बसले. मोती कुत्रा नेहमीप्रमाणे दोन्ही बैलांच्या मध्यभागी चालला होता.

शेतातलं बरचसं काम आवरून, दुपारच्या न्याहारीला बसले. वैतागलेला विलास, खोल आवाज आई-बाबांना म्हणाला, ''मी पुढच्या आठवड्यात भरतीला जातोय.''

''कशाच्या भरतीला ?'' आईनं विचारलं.

''मी सैनिक भरतीला जातोय.''

डोक्यावरचा पदर सावरत आई म्हणाली, ''अरं असं वेड्यासारखं काय करतो, एवढं शिकवीत छोटी-मोठी नवकरी पाय इथं. एक भाकरी खायची तर अर्धी खा पण हे असं डोक्यात खूळ काही घालू नको.''

दादानं सारं शांतपणे ऐकून घेतलं. नाही म्हणजे नाही म्हणत दादा भरल्या ताटावरुन उठून गेले. पण विलासनं मनाशी खूणगाठ बांधली होती. शेवटी तो भरतीला गेला. त्याच्या नशिबानं तो सैन्यात भरती झाला.

विलास समद्या गावचा आवडता, विलास सैन्यात भरती झाला म्हणून समद्या गावानं नाही तसं कौतुक केलं हे सारं आई दादा पाहत होते. वरून आनंद पण आतुन मात्र दु:खाचे पूर लोटत होते.

उद्याला माझा विलास जायचा. या गोष्टीनं रात्रभर आई झोपली नव्हती. हे सारं घरातलं वातावरण त्या मुक्या मोत्या कुत्र्यालाही समजत होतं. विलासचा शर्ट दोन्ही पायांत धरुन ते दाराशीच बसलं होतं.

विलास पहाटे लवकर उठला आंघोळ करून त्यानं गावातल्या देवाचं दर्शनही घेतलं होतं. सकाळ झाली होती. विलास पेटी भरत होता. मात्र आईच्या हातून आज कामही उरकत नव्हतं. मोठ्या जड हातांनी ती सारं काही आवरत होती. गाडीची वेळ झाली होती. आई -बाबांचे आशीर्वाद घेतो तेच आईनं दाबून धरलेलं रडू मोठ्यानं सुरू केलं.

विलास आईला समजावत होता. त्याच्या ही डोळ्यातून पाणी खळाळत होते, हे सारं दृश्य दादाही पाहत आपले डोळे पुसत होता.

समदं गाव जमा झालं होतं. नीट रहा, काळजी घे, पत्र पाठीव, अशी अनेक वाक्य विलासच्या कानावर पडत होती. घाटातली गाडी लांबूनच दिसत होती. सारे जण माळावरती जमले होते. सर्व लहान मोठ्यांच्या डोळ्यातजले अश्रू पाहून विलासही दु:खी झाला होता.

तेवढ्यात गाडी आली. विलास गाडीत बसला. त्याला आपल्या आईकडे पाहण्याचे धाडस होत नव्हते.

कारण जीवापाड प्रेम करणाऱ्या आईचा शब्द मोडून तो चालला होता.

पदरानं डोळे पुसत आई त्याला हात देत होती. हात करता करता गाडी दूरवर गेली होती. कुणी मरावं तसं, समदं गाव घरी परतलं.

एक महिना झाला होता. मात्र आईला बरे नव्हते. एक दिवस अचानक आईला छातीत दुखू लागले. तीन महिन्यांनी विलासचं पत्र गावी आलं. समदं गाव जमलं होतं. राघवदादा पत्र वाचीत होता,

''मी खुशाल आहे. माझी काळजी करू नका. दादांना माझा नमस्कार. आईची खुप आठवण येते. गावातल्या समद्यांची खूप आठवण येते. माझ्या आईची काळजी घ्या. राघवदादा, माझ्या मोत्या कुत्र्याला कुणी मारू नका.'' पत्रातला मजकूर वाचून आईला रडू येत होतं. मला सुट्टी मिळाली आहे. सहा-सात दिवसात मी गावी येतो. असंही त्यानं पत्रात लिहीलं होतं.

पण आईचा आजार वाढतच गेला. घरचे सारे उपचार झाले होते. दोन-तीन दिवस झाले होते. मात्र आईच्या छातीत असह्य कळ आली. राघवदादानं तसेच गाडी जुंपली. दादानं पटकन आवरून गावातल्या लोकांना सांगत आईला दवाखान्यात नेलं.

पण आई मात्र फक्त विलास. माझ्या विलासला बोलवा. माझ्या लेकराला मला एकदा पाहू द्या. डॉक्टरांचे उपचार सुरू होते. परंतु वाचण्याची शक्यता फार कमी असल्याने डॉक्टरांनी राघवदादाला बाजूला घेतले.

''विलास कुठं आहे ? त्याला जरा बोलावून घेता का ? कदाचित आपल्या प्रयत्नांना यश येईल.''

राघवदादा दबकत दबकत म्हणाला,

''साहेब तो सैन्यात आहे.''

एवढ्यात आतून मोठा आवाज आला. म्हणून सगळे धावत आत गेले. आईने हाताच्या मुठी घट्ट आवळल्या होत्या. सर्वजण अगदी स्तब्ध झाले होते. कुणाला काहीच सुचत नव्हते. डॉक्टरांचे प्रयत्न चालू असतानाच आईने शेवटची हाक मारली, 'विलास' व तीने आपले प्राण सोडले. दादाचा आक्रोश अनावर झाला होता. सर्व गाव रडू लागला.

विलास मात्र तिकडे आनंदात होता. घरी जायचे म्हणून आईला नवी साडी, दादाला धोतर, मोत्याला पट्टा अशी सारी खरेदी केली. आई दादाला कधी भेटेल असं झालं होतं. सर्व आवरून तो परतीच्या प्रवासाला लागला होता.

तोपर्यंत इकडे आईची मौत करून सारेजण विलासची वाट बघत होते. रात्र संपली दिवस उजाडला होता. विलास आज येणार म्हणून समदं गाव माळरानावर जमा झालं होतं. विलास गाडीत खुप आनंदात होता. प्रथम कुणाला भेटावे असं मनात विचार करुन आईलाच भेटेन अशी मनोमन ईच्छा केली.

गाडी थांबली बाहेरची गर्दी पाहून विलास कावराबावरा झाला होता. मलाच भेटायला सर्वजण आले असं त्याला वाटले. पण विलासनं पाहिलं. ह्या सर्वांचे चेहरे उदास का ? प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी का ? विलास खाली उतरला, मला प्रथम आईला भेटायचे आहे. आई कुठंय, आई म्हणून इकडे तिकडे पाहू लागला. त्याला त्या गर्दीत कुठंच दिसत नव्हती. विलासनं राघवदादाचे हात धरीत विचारले, ''आई, आई नाही आली?'' एवढ्यात दादानं हंबरडा फोडला, ''आई नाही, विलास आता आई नाही.'' म्हणत दादा विलासकडं आले.

ही शांतता कसली, हे विलासला कळले होते. हे सारं पाहून विलास बेभान होऊन रडू लागला होता. लोक त्याला धरीत होते. पण विलास कुणालाच आवरेना.

आई- आई म्हणत त्याच्या तोंडून हृदयस्पर्शी वाक्य बाहेर पडू लागली होती. समदं गाव रडत होतं. स्वतःचे अश्रू पुसत राघवदादानं विलासला धरलं.

''विलास, आई गेली पण ह्या सर्व तुझ्याच आया आहे न्हवं.'' विलास मात्र रडतच होता. ''अरं एक आई सोडून गेली, पण तू जीथं हाय ती पण आईच आय. त्या आईची सेवा केली तरी, ह्या आया सुखी राहतील.''

विलासचा आक्रोश अनावर होता. तो रडत-रडतच घराकडे निघाला. समदं गाव त्याच्या पाठीमागे चालू लागलं मोत्या कुत्रा दारातच अश्रू ढाळीत होता.

विलासला पाहताच मोत्यानं आपले पुढचे दोन्ही पाय वर केले. जणू काही ते विलासकडे माफीच मागत होते.

विलास मोत्याच्या गळ्यात पडून रडत होता. ''मीच तो अभागी, मीच तो अभागी,'' म्हणत त्यानं आपला आक्रोश केला.

■ ■ ■

# पर्यावरण, प्रदूषण आणि आपण

– ज्योती पवार

भारतीय माणूस व्यक्तिगत स्वच्छतेचा जेवढा विचार करतो, त्याच्या शतांशानेदेखील तो सार्वजनिक स्वच्छतेकडे लक्ष देत नाही. परिणामी स्वत:च्या घरातील कचरा तो रस्त्यावर टाकतो. पानाच्या पिचकाऱ्या मारतो वा निरूपयोगी कागदांचे कपडे कोठेही फेकून देतो. आळस व कामचुकारपणा यामुळे कचरा उचलणारेही वेळेवर कचरा उचलत नाहीत. कचऱ्यातून कागद गोळा करून त्याच्या विक्रीवर पोट भरणारे तो कचरा विखरून टाकतात. भाजी बाजार कचऱ्यांच्या ढिगांनी भरलेले दिसतात. हे सारे हवेच्या प्रदुषणाला आमंत्रण देणारे ठरते. त्यामुळे निसर्गाचा समतोल बिघडत आहे याची आम्हाला जाणीवच नसते.

स्वतंत्र भारतात कारखानदारी वाढली हे आम्ही गौरवाने सांगतो. परंतु पूर्ण विचाराअभावी किंवा नियोजनाअभावी सुरू केलेली कारखानदारी हवेचे प्रदुषण निर्माण करते, हे आमच्या लक्षात आले नाही. कारखान्यांतील दुषित, मलीन पाणी, नदी व समुद्रात सोडल्यामुळे यांचे पाणी प्रदूषित झाले आहे. समुद्रातील या दूषित पाण्यामुळे त्यातील मासे प्रचंड प्रमाणात मेले. नद्यांतील पाणी दूषित झाल्यामुळे ते पिण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही कामासाठी निरुपयोगी ठरत आहे. त्यामुळे केंद्र शासनाला नुकतेच 'गंगा शुद्धीकरण'चे काम हाती घ्यावे लागले. पाणी दूषित झाल्यावर ते स्वच्छ करण्याचा आटापिटा करण्याऐवजी ते दूषित न होण्याची काळजी आपण घ्यायला नको का ?

आज साऱ्या शहरातून वाहनांची संख्या भयंकर वाढली आहे. वाहनांतून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे हवा प्रचंड प्रमाणात दूषित होते. मुंबईच्या काही विभागात श्वासोच्छवास करण्यासही त्रास होतो. असे हे वाढते प्रदूषण झाडे न तोडणे, झाडे लावणे एवढ्याच मर्यादित उपयांनी रोखता येणार नाही, हे आता लक्षात आले आहे. म्हणून मोठ्या शहरांतुन पुन्हा सायकलकडे वळण्याचा मार्ग अनुसरला जात आहे.

मानवाने बेसुमार जंगलतोड करून वैराण वाळवंटे निर्माण केली आहेत. 'मानवाचे पाऊल अन् वाळवंटाची चाहूल' अशी म्हण आहे. जळणासाठी आणि घरे बांधण्यासाठी बेसुमार वृक्षतोड झाली. त्यामुळे उष्णता वाढली. पावसाचे प्रमाण कमी झाले. जमिनीची धूप होऊन ती नापीक झाली. दुष्काळाचे प्रमाण वाढले. हवेच्या प्रदूषणासारख्या समस्यां मानवाला तोंड द्यावे लागले.

प्रदूषणामुळे पृथ्वीचे आयुष्य धोक्यात आले आहे. मग 'वसुधा वाचवा' अशी हाकाटी केली जाते. 'वसुंधरा दिन' पाळला जातो. पर्यावरणाचा तोल कसा सांभाळावा, याचा विचार होऊ लागतो. पण एक गोष्ट नक्कीच आहे, ती म्हणजे प्रदूषणाचे हे संकट माणसाने आपण होऊन ओढवून घेतले आहे.

कळत असूनही माणूस या प्रदूषणाकडे दुर्लक्ष करतो. मग एखादी 'भोपाळ दुर्घटना' घडते. तेथे प्रदूषण होऊ नये म्हणून योग्य काळजी न घेतल्याने माणसे किड्या मुंग्यांसारखी मेली. खोपोलीजवळ असलेल्या पाताळगंगेचे पाणी दूषित झाले, तेव्हा हजारोंनी मासे मेले आणि शेकडो मैलाचा परिसर उद्ध्वस्त झाला.

प्रदूषणाचे मळभ जेव्हा येते तेव्हा ते साऱ्या विश्वाला ग्रासते. साऱ्या पृथ्वीवरील उष्णता वाढत आहे. ओझोन वायूचे वातावरणातील प्रमाण कमी होत आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबरच नष्ट न होणारा प्लॅस्टिकचा कचरा वाढत आहे. या सर्वावर कडी करत आहे हे माणसांतील वाढते वैचारीक प्रदूषण... दहशतवाद !

या साऱ्या गोष्टींवर जे प्रतिबंधात्मक असे अनेक उपाय आहेत. त्यापैकी एक म्हणजे वृक्षारोपण होय. 'सामाजिक वनीकरणा'ची कल्पना आता रूढ होत आहे. पण समारंभ करून लावलेल्या झाडांपैकी किती झाडे

जगतात याकडे कोणी लक्ष देते का ?

झाड लावणे जितके आवश्यक आहे, त्याहूनही ते वाढवणे महत्त्वाचे आहे. यासाठी प्रत्येकाने एक तरी दत्तक घेतले पाहिजे. यासाठी आता मोहीम सुरू केली पाहिजे - 'एक तरी झाड जगवा.' लग्न, मुंजी, वाढदिवस अशा निमित्ताने आपण भेटीदाखल एकमेकांना पुष्पगुच्छ देतो. त्याऐवजी एक - एक रोप भेट द्यावे. नवीन बालक जन्माला आले की त्या कुटुंबाने नवीन झाड लावावे व बाळाबरोबरच बाळासारखे ममतेने त्यालाही वाढवावे. शाळेतील प्रत्येक मुलाने शाळेच्या आवारात एक तरी झाड लावावे. त्याचे नीट संगोपन करावे, प्रेमाने देखभाल करावी. रस्त्याच्या दुतर्फा वृक्षांची लागवड उभारण्याऐवजी गर्द झाडे लावावीत. म्हणजे वसुधा पुन्हा 'हरितश्यामल' बनेल.

निर्सगचक्र खंडीत करण्याचा आपल्याला अधिकार नाही. ते आहे तसे अबाधित राखण्यातच साऱ्या मानवजातीचे हित आहे. पुढच्या पिढीच्या उज्ज्वल भवितव्याची जबाबदारी आपल्यावर आहे. म्हणून, एक तरी झाड जगवा ! हा आजच्या युगाचा संदेश आहे.

प्रदूषणाचे हे प्रश्न बरेचसे माणसाने निर्माण केले आहेत. ध्वनीप्रदूषण आणि विचारप्रदूषण हे त्यापैकीच. या प्रश्नांची उकल आता माणसानेच केली पाहिजे. कुणी परमात्मा व परमेश्वराचा प्रेषित त्यासाठी येणार नाही. माणसाला ही आठवण करून देण्यासाठी दरवर्षी ५ मे रोजी 'जागतिक पर्यावरण दिन' पाळला जातो. त्याचे महत्त्व आपण सर्वांनीच जाणून घ्यायला हवे.

■ ■ ■

सुभाषित सरिता

## सद्गुण

कोऽतिभार: समर्थानां, कि दूरं व्यवसायिनाम् ।
को विदेश: सविद्यानां, क: पर: प्रियवादिनाम् ॥

(पंचतंत्र)

बलवान माणसांना (न पेलणारा) मोठा भार असा कोणता ? उद्योगी किंवा निश्चयी माणसांना दूर (म्हणजे पोचण्यास कठीण) असे कार्य आहे ? विद्वान माणसांना परदेश कोणता आणि गोड बोलणारांना परका माणूस कोणता ?

क्षमाशस्त्रं करे यस्य दुर्जन: किं करिष्यति ।
अतृणे पतित: वह्नि: स्वयम् एव उपशाम्यति ॥

(महाभा. पर्व ५ अ. ३३)

विदुर धृतराष्ट्रास सांगतात की, ''ज्याच्या हातात क्षमारूपी शस्त्र आहे, त्याला दुष्ट मनुष्य काय इजा करू शकेल ? गवत नसलेल्या (खडकाळ) जमिनीवर अग्नी पडला तर तो आपोआपच विझून जातो.

क्षमाशील माणसापुढे दुष्ट माणसे नमतात. त्यांचा हृदयपालट होतो.

काक: कृष्ण:, पिक: कृष्ण:, को भेद: पिककाकयो:?
वसन्तसमये प्राप्ते काक: काक:, पिक: पिक: ॥

कावळा काळा तसेच कोकिळही काळाच, मग त्या दोघांत भेद कोणता ? परंतु वसंत ऋतू आला म्हणजे कावळा तो कावळा आणि कोकिळ तो कोकिळच. कोकिळ गाऊ लागला की मग त्याची योग्यता समजते. मग कुठे त्याचे मधुर कूजन आणि कोठे कावळ्याची कर्कश कावकाव !

माणसाला संधी मिळाल्याशिवाय त्यांच्या अंगी असलेल्या श्रेष्ठ गुणांची ओळख पटत नाही. असामान्य माणसे ही पुष्कळ बाबतीत सामान्यांसारखीच दिसतात व असतातही.

# सर्व समस्याचे मूळ – लोकसंख्येचा विस्फोट

मानवाने जसजसे यंत्रयुग स्विकारले तसतशी ज्ञानाची क्षितिजे मंदावली. नवनवीन शोध लागले, नवनवीन औषधे निघाली, बालमृत्यु, अल्पकालीन मृत्युचे प्रमाण घटले. आयुमर्यादा वाढली, अमृताचे विषात रूपांतर झाले हे वरदान शाप ठरेल अशी लक्षणे दिसू लागली. तसे या शोधाच्या फायद्यातुन लोकसंख्या वाढीचा धोका निर्माण झाला. मृत्युत घट झाली पण जनन प्रमाणावर हवे तेवढे नियंत्रण झाले नाही. त्यामुळे मृत्युप्रमाण कमी आणि जनन प्रमाण जास्त झाले. लोकसंख्येने उग्र रूप धारण केले. त्यामुळे लोकसंख्येचा विस्फोट होत आहे.

'जागा थोड्या अर्ज फार' ह्याप्रमाणे सकाळी वर्तमानपत्र हाती पडले की संपाची, हरताळाची कुणीतरी, कशासाठी तरी धरणे धरल्याची बातमी छापून असतेच. प्रत्येक क्षेत्रात कार्यालयात काही ना काही असंतोष असतोच. सतत वाढणारी लोकसंख्या व त्यामुळे वाढणारी महागाई ह्याच गोष्टी त्या असंतोषाच्या मुळाशी असतात. त्यातच बांगलादेश, पाकिस्तान, श्रीलंका येथुन स्थलांतर करून भारतात आलेल्या लोकांची लक्षणीय भर पडली आणि बघता बघता या वाढत्या लोकसंख्येने भस्मासुरासारखे भयानक रूप धारण केले. त्यातुनच अन्न, वस्त्र व निवारा यांची टंचाई निर्माण झाली. उत्पादनात वाढ झाली असूनही लोकसंख्या वाढीचे प्रमाण भयंकर असल्याने त्याचा मेळ घालता येत नाही. भारतातील १२% जनता उत्पादनक्षम आहे. बाकी ८८% जनता परावलंबी आहे. म्हणजेच उत्पादनक्षम आणि अकार्यक्षम लोकांचे प्रमाण जवळ जवळ सारखेच आहे. लोकसंख्येच्या समस्येच्या पोटी निरक्षरता, बेकारी, दारिद्र्य, प्रदुषण ही अपत्य जन्माला आली.

विकसित देशांच्या मानाने विकसनशील देशांमधील लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेल्या समस्या फारच गंभीर स्वरूपाच्या आहेत. या देशांमध्ये लोकसंख्या वाढ फारच जलद गतीने होत असुन त्या प्रमाणात साधनसंपत्तीचा विकास होत नसल्याने लोकांना मुलभूत गरजा पूर्ण करणे देखील कठीण होत आहे. लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेल्या समस्या सोडविण्यातच या देशांचा बराचसा पैसा खर्च होतो. त्यामुळे आर्थिक विकास कमी व मंद गतीने होत आहे.

दिवसेंदिवस लोकसंख्या वाढतच आहे. या वाढीमुळे विकसनशील देशांसारख्या कृषीप्रधान देशांमध्ये पारंपारिक पद्धतीने जमिनीची विभागणी होत आहे. त्यामुळे जमिनीचे लहान-लहान तुकडे होत आहे. अशीच वाढ होत राहिल्यास शेतजमिनीच्या तुकडीकरणामुळे कालांतराने या तुकड्यांवर शेती करणे अशक्य होईल. उत्पादन कमी होऊन तुकडे यांत्रिकीकरणास अयोग्य ठरतील. आर्थिकदृष्ट्या शेती परवडेनाशी होईल.

देशांमध्ये उपलब्ध साधनसंपत्तीच्या मानाने लोकसंख्या जास्त वाढल्यामुळे साधनसंपत्तीवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. खनिज संपत्ती, जंगले, भूजल, शक्तीसाधने, पशुसंपत्ती या प्रमुख नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरेकी वापर, केला जात आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतजमिनीचे प्रमाण कमी होऊ लागले. त्यामुळे शेतीसाठी जंगले तोडून तेथे शेती करण्यास सुरुवात केली आहे. यामुळे जंगलसंपत्तीचे प्रमाण कमी होऊ लागते. त्यामुळे शेतीसाठी जंगले तोडून तेथे शेती करण्यास सुरुवात केली आहे. यामुळे जंगलसंपत्तीचे प्रमाण कमी होऊन जमिनीची धूप, पर्जन्य प्रमाणात घट, तापमानात वाढ व वन्य प्राण्यांचा ऱ्हास अशा समस्या निर्माण झाल्या आहेत.

लोकसंख्या वाढीमुळे विकास कार्यात फार मोठा अडथळा निर्माण झाला आहे. पंचवार्षिक योजनांमधील जास्तीत जास्त खर्च लोकांच्या मुलभूत गरजा भागविण्यावर होतो. त्यामुळे विकास कार्यासाठी फारच थोडा हिस्सा वाट्याला येतो. त्यामुळे देशाचा विकास मंद गतीने होत आहे.

ओतला भावो ॥

म्हणोनि भक्तामाजी सवो । आणि ज्ञानिया तोचि ॥''

(ज्ञा. ७-१३६)

हे संपूर्ण विश्व श्रीवासुदेव आहे अशा अनुभवरूपी रसाची त्याची समजूत ओतलेली असते, म्हणून सर्व भक्तांमध्ये तो राजा आणि ज्ञानी ही तोच आहे.

आत्मज्ञान हे आपले परमप्राप्तव्य आहे ज्ञानयोगालाच सांख्ययोग असे दुसऱ्या अध्यायात म्हटले आहे.

या सर्व चराचर विश्वामध्ये शरीराच्या उपाधीमध्ये चैतन्य गुप्त आहे. त्या चैतन्याचा साक्षात्कार हे खरे ज्ञान आहे.

''या उपाधीमाजी गुप्त । चैतन्य असे सर्वगत ।

ते तत्वज्ञ आणि संत । स्वीकारिती ॥ (ज्ञा. २-१२६)

या देहादी प्रपंचामध्ये सर्वत्र चैतन्य गुप्तरूपाने आहे. हे चैतन्य तत्त्व जाणणारे संत ते ओळखून त्याचेच ग्रहण करतात. या बोधालाच संत ज्ञानदेव. ''तत्त्वम्असि'' असे म्हणतात.

■ ■ ■

## सुभाषित सरिता

## दुर्जन व दुर्गुण

अकृतोपद्रव: कश्चिद् महान् अपि न पूज्यते ।
अर्चयन्ति नरा: नागं, न तार्क्ष्यं न गजादिकम् ॥

त्रास न देणारा असा कोणी थोर माणूस असला तरी लोकांकडून त्याला आदर दिला जात नाही. लोक नागाची पूजा करतात - गरूडाची नाही की हत्ती वगैरे प्राण्यांची नाही !

अहो दुर्जनसंसर्गात् मानहानि: पदे पदे ।
पावको लोहसंगेन मुद्गरै: अभिताड्यते ॥

दुष्य माणसांच्या सहवासामुळे पावलोपावली केवढा तरी अपमान होतो ! लोखंडाच्या संगतीमुळे अग्नीला (लोहाराच्या) घणाचे घाव सोसावे लागतात.

लोखंडाच्या वस्तू तयार करण्यासाठी लोहार ते भट्टीत घालून तापवितो व नंतर घणाचे घाव घालून त्याला हवा तो आकार देतो.

आदौ चित्ते तत: काये, सतां संपद्यते जरा ।
असतां तु पुन: काये नैव चित्ते कदाचन ॥

(पंचतंत्र)

म्हातारपण सज्जनांच्या मनात आधी आणि नंतर शरीरात उत्पन्न होते, परंतु ते (म्हातारपण) दुर्जनांच्या शरीरातच उत्पन्न होते, मनात कधीच नाही. दुर्जनांना म्हातारपणाबरोबर शहाणपण, विचारीपणा येत नाही.

केतक्य: कण्टकै: व्याप्ता:, नलिन्य: पङ्कसंभवा: ।
विलासिन्य: सगर्वाश्च, क्व रत्नम् अनुपद्रवम् ॥

केवड्याची पाने काट्यांनी व्यापलेली असतात, कमलवेली चिखलात उगवलेल्या असतात आणि सुंदर स्त्रिया गर्विष्ठ असतात- त्रासदायक नसलेली अशी रमणीय गोष्ट कोठे असते बरे ? 'Every rose has its thorn' (प्रत्येक गुलाबाच्या फुलाला काटे असतात.) अशी इंग्रजीत म्हण आहे.

# विज्ञान तंत्रज्ञान आढावा : २००२

**प्रा. के. बी. नाईकवाडी**
प्रमुख, प्राणीशास्त्र विभाग

मागील शतक अणुऊर्जा, पालीमर, स्वयंचलीत वाहने, सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स, डी. एन. ए. व क्लोनिंग तंत्रज्ञानाने गाजले. सन २००२ मधील विज्ञान तंत्रज्ञानाचा आढावा घेणे हे भारतातील व जगातील विविध घडामोडीशी संबंधित माहिती मिळविण्यातून शक्य होईल. सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या जगात या गोष्टींची दखल घेणे हे आता प्रत्येकाला क्रमप्राप्तच आहे.

मानवी कल्याणासाठी अहोरात्र संशोधनात स्वत:ला गुंतवून घेणाऱ्या व त्यातच आपले जीवन समर्पित करणाऱ्या ज्ञात-अज्ञात, हयात व हयात नसलेल्या सर्व संशोधकांना विनम्र अभिवादन करूनच आपण सन २००२ मधील विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा आढावा घेऊ या.

**मान व सन्मान -**

भारतातील ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची राष्ट्रपतीपदी म्हणून निवड झाली. विज्ञान समाजाभिमुख व लोकप्रिय होण्यासाठी केलेल्या प्रयत्नांसाठी अपर्णा वैश, डॉ. सरोश घोष व डॉ. सी. आर. चंद्रशेखर यांना पुरस्कार दिला गेला. प्रा. माधव गाडगीळ यांना पर्यावरणातील ''शतकवीर माजी विद्यार्थी पुरस्कार'' हॉवर्ड विद्यापीठाने दिला. तरूण शास्त्रज्ञांसाठी शांतीस्वरुप भटनागर पुरस्कार पुढील संशोधकांना मिळाला - जीवशास्त्रात डॉ. अभिताभ चटोप्पाध्याय व डॉ. उमेश वारशेणे, रसायनशास्त्रात डॉ. चंद्रशेखर व डॉ. उदय मैत्रा, पर्यावरण शास्त्रात डॉ. प्रशांत गोस्वामी व के. एम. कृष्णा, गणितात डॉ. मिश्रा व वेंकटरमण, वैद्यकिय क्षेत्रात डॉ. मलीक व भौतिकशास्त्रात डॉ. राहूल पंडीत, डॉ. मधूसूदन यांना सैद्धांतिक संगणकशास्त्रातील नेव्हनलीना पारितोषिक (बिजींग) मिळाले. डॉ. दत्तायडू नोरी हे अमेरिकेतील सर्वात चांगले डॉक्टर ठरले. अरूण नेत्रावली व के. आर. राव यांना अमेरिकेतील राष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान पदक मिळाले. डॉ. स्वामीनाथन यांची पगवॉश संमेलन अध्यक्षपदी निवड झाली. डॉ. पचौरी यांची आंतरराष्ट्रीय हवामान समितीच्या अध्यक्षपदी निवड झाली. अमेरिकेतील डॉ. श्रीनिवासन यांची आंतरराष्ट्रीय भौतिक परिषदेवर निवड झाली. गणित ऑलिम्पियाडमधील सुवर्णपदक निखील वागळेने तर तन्मय देशपांडे व शुभांगी सराफने कास्य पदक पटकावले. खगोल ऑलिम्पीयाड (रशिया) मध्ये राधिका मराठेची व मटेरिअल रिसर्च (अमेरिका) मध्ये राहूल पानट यांची सर्वोत्तम विद्यार्थी म्हणून निवड झाली.

**नोबेल पारितोषिके -**

१) भौतिक शास्त्रात रेमंड डेव्हीस (पेनसिल्व्हानीया विद्यापीठ), रिकार्डो गिआक्कोनी (वॉशिंग्टन), मासातोशी कोशिबा (जपान) यांना वैश्विक न्युट्रीनो व क्ष किरणांचा स्त्रोत शोधण्यासह खगोल भौतिकशास्त्रातील मुलभूत संशोधनाबद्दल नोबेल पारितोषिक मिळाले.

२) रसायनशास्त्रांतर्गत जैविक रेणूच्या विघटनासाठी प्रक्रिया शोधून काढल्याबद्दल जॉन फेन (अमेरिका), कोईची तनाका (जपान) व कुर्त विएथरीच (स्वित्झर्लंड) यांना नोबेल पुरस्कार मिळाला.

३) वैद्यक व शरीर क्रिया शास्त्रात सिडने ब्रेनर व जॉन सुसल्टन (ब्रिटन) व एच. रॉबर्ट होर्वित्झ (अमेरिका) यांना जनुके अवयवांचा विकास नियंत्रित कसा करतात आणि पेशीचा अंत कसा होतो या अभ्यासासाठी नोबेल पुरस्कार दिला गेला.

४) त्याचप्रमाणे इम्रे कर्टेज (हंगेरी) यांना साहित्यातील व जिमी कार्टर यांना शांततेसाठी नोबेल पुरस्कार दिला गेला.

आता आपण विज्ञान तंत्रज्ञानाच्या महत्त्वाच्या शांखांमधील संशोधनाचा आढावा घेवू.

**भौतिकशास्त्र/पदार्थ विज्ञान** - नॅनो म्हणजे एक सेंटीमीटरचा एक कोटीचा भाग, इलेक्ट्रॉन चीपवर अणूंचा लेयर निर्माण करता आल्यामुळे, अणू चीप बनविता येईल.

या तंत्राचा वापर क्वांटम करता येईल.

अँटेनासाठी झाडांचा उपयोग होतो असे निदर्शनास आले आहे. त्यावरून पुर्वी ऋषी मुनींना प्रचंड वृक्षाखाली परिसराचे ज्ञान कसे प्राप्त होत असेल ? याबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.

सर्व प्रयोगशाळेत (अमेरिका) डॉ. रूसी तल्यारखान यांना ड्युटेरिअमच्या कोल्डफ्यूजनमधून प्रचंड उर्जा होते, असे निदर्शनास आले. जिनिव्हातील प्रयोगशाळेत प्रति हायड्रोजनाचा स्थिर ओघ मिळविण्यात शास्त्रज्ञांना यश मिळाले.

ऑस्ट्रेलियातील डॉ. बाकोर राल्फ यांना लेसर ब्रीमचा १ मीटर अंतरावर पुन: प्रत्यय आला यातून टेलीपोर्टेशनबद्दल उत्सुकता नक्कीच वाढली आहे.

**रसायनशास्त्र** -

दुर्गंधी मुक्त कपडे - कापड व एन. हॅलामाइन यातून मंद सुवास व अतिनिल किरणांपासून संरक्षण देणारे कपडे करता येतील.

**रंग बदलणारे व बुद्धीमान कापड** -

कापडनिर्मितीत विशिष्ट रंगद्रव्ये, उपकरणे इ. चा उपयोग करून तापमानानुरूप रंग बदलणारे व सूचना देणारे कापड निर्माण करता येईल.

**स्वयंस्वच्छ कापड** - कापड निर्मितीवेळी काही जिवाणू त्यात गोवल्यास कापडावरील धूळ, घाण इ. हे जिवाणू खातील व कपडा नेहमी स्वच्छ राहू शकेल.

**बुद्धीमान प्लॅस्टिक** -पॉलिव्हीनील डिनेडी फ्लूराईड पासून बनवलेली ५ मी.मी. चा तुकडा विद्युतप्रवाह, श्वास, ताप, आघात, धोक्याची सूचना इ. आपणास देवू शकेल.

**इथेनॉल** - कोपरगाव येथील संजीवनी ८५% इथेनॉलवर चालणारे मोटारसायकल इंजिन निर्माण केले तर औरंगाबाद येथील अभियांत्रिकी महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी केळीच्या सालीपासून इथेनॉल तयार करण्याची प्रक्रिया शोधून काढली.

ऑस्मियम धातू हिऱ्यापेक्षा जास्त दाब सहन करू शकतो असे लॉरेन्स लिव्हमूर प्रयोगशाळेत सिद्ध झाले आहे.

जास्त घनतेचा अस्फटीकी बर्फ (पाण्यात बुडणारा) निर्माण करण्यात इन्सब्रूक विद्यापीठातील (लंडन) संशोधकांना यश मिळाले.

मूलद्रव्य नं. ११८ चा शोध व्हिक्टर निनॉव्ह यांना असफलतेमुळे मागे घ्यावा लागला.

**अवकाश व खगोलशास्त्र** -

प्रख्यात व शास्त्रज्ञ स्टिफन हॉकींग यांची वयाची ८ जानेवारी रोजी साठ वर्षे पूर्ण झाली. सन २००२ मध्ये एकूण दोन सौरमाला व २७ नवीन ग्रहांचा शोध लागला. मंगळ ग्रहावर बर्फरूपात पाणी असल्याचे फिलीप स्विस्टनसन यांनी नमूद केले तर कोलोरॅडचे ओवेन टून यांनी मंगळ हा रूक्ष व कोरडा असल्याचे स्पष्ट केले आहे. प्लूटोच्या पलीकडे कोआर नावाचा लघुग्रह असल्याचे ब्राऊन व चॅडविक यांना दिसून आले आहे. अवकाशात आतापर्यंत सजीवातील १३० रेणू सापडले. नुकतेच ग्लायसीन हे अमिनो आम्ल स्नायडर (इलीनॉय विद्यापीठ) यांना सापडल्याचे नमूद केले आहे.

**आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानक** - सोळा देश एकत्र येवून ८८.४ मीटरचे ४१८ टन वजनाचे अवकाश स्थानक निर्मितीचे काम चालू आहे. हे स्थानक पृथ्वीपासून ४०७ कि.मी. उंचीवर आहे. स्टार चेसर कंपनी या संदर्भात अवकाश सहली आयोजित करण्याचा विचार करत आहे. ५४ वर्षाचे जेरी रॉस यांनी आतापर्यंत ७ वेळा अंतराळप्रवास करण्याचा विक्रम नोंदविला आहे.

**यान** - अर्थ कनेक्शन व नासा यांच्या वतीने २००७ मध्ये सूर्याचा अभ्यास करण्यासाठी सूर्य यान पाठविण्याचे निश्चित झाले आहे.

**संरक्षक व विज्ञान तंत्रज्ञान** - इतर प्रगत देशांच्या बरोबर भारताने या वर्षात अग्नी, त्रिशूल, आकाश, ब्राम्होस व नाग या क्षेपणास्त्राच्या यशस्वी चाचण्या घेतल्या आहेत. त्याचप्रमाणे हलके लढावू विमान व लक्ष्य हे वैमानिकरहीत विमान निर्माण केले आहे.

**संगणक** - महासंगणक/सुपर कॉम्प्युटर बनविण्याचे काम जपानच्या शास्त्रज्ञांनी पूर्ण केले आहे. त्यात ५१०४ प्रोसेसर असून त्याची क्षमता ३५६०० गिगाफ्लॉप आहे.

पुण्यातील कॅट कॉम्प्युटरचे कैलास व संजय काटकर यांच्या ब्लीक हिल सॉफ्टवेअर ला जागतिक मान्यता मिळाली. कानपूरचे प्रा. मनिंद्र आगरवाल यांनी मूळसंख्या

ओळखण्याचे संगणकसूत्र शोधले आहे. त्याचा उपयोग संगणकीय गुप्तलिपीसाठी करता येईल. लॉस एंजलीसचे डॉ. एली यब्लोनवीच यांनी फोटो इलेक्ट्रॉन चीप शोधली आहे. त्यामुळे दूरसंचार क्षेत्र १० हजार पटीने वेगवान होईल.

संगणकासाठी माऊसचा सतत वापर केल्याने माऊस एल्बो, रिस्ट इ. चा त्रास होवू शकतो.

**तंत्रज्ञान** – नोकीया व बी. पी. एल. इ. कंपन्या खेळ, संगीत, कॅमेरा, रेकॉर्डिंग इ. ची सोय असलेले मोबाईल निर्माण करू लागले आहेत.

**रोबोट** – असिमो नावाचा जपाननिर्मिती रोबोट १० चेहरे ओळखतो. रोबोडॉकच्या सहाय्याने न्यूयॉर्कमधील डॉक्टरांनी ७००० कि. मी. वरील स्ट्रॉसबर्गमधील रुग्णावर शस्त्रक्रिया केली.

फ्लेक्सीबोट रोबोट अपंग व्यक्तींना मदत करतो. डिजीटल पेन हा इन्फ्रारेड सिग्नलच्या सहाय्याने ५० पाने लक्षात ठेवतो. टुथब्रशमध्ये १४ संगीत धून आहेत. हा टुथब्रश मुलांमध्ये चांगल्या सवयी जोपासण्यासाठी वापरता येईल. पेडोमोटरच्या आधारे पाऊले, नाडी, कॅलरी इ. मोजता येतात. रेकॉर्डर हा मोबाईलच्या आकाराचा असून ९९ संदेश मुद्रीत करुन २०० मिनीटांपर्यंत आठवण करून देतो.

प्रो. टेड विल्यमस यांनी क्रेडीट कार्डच्या आकारावर संपूर्ण ब्रिटन घेता येईल असे नमूद केले आहे.

डॉ. स्टिव बेबी यांनी स्वयंचलीत छोटा डायनामो बनविला आहे. भारतात बॅटरीवर सायकल ४० कि. मी. चालू शकेल असे प्रयोग यशस्वी झाले आहेत. कोकण रेल्वेने विकसित केलेली अपघात प्रतिबंधक यंत्रणेस इतर देशांकडून मागणी होत आहे. भारतीय अवकाश संशोधन केंद्राने उपग्रह प्रक्षेपण साठीचे रॉकेटचे क्रायोजेनीक इंजिनाची यशस्वी चाचणी घेतली. पुण्याच्या आरती या संस्थेस सराई ओव्हन चूलीसाठी अॅश्डेन पुरस्कार मिळाला. सोलर ग्रीड हायब्रीड यंत्रणा वापरून पाँडेचरीत सौर उर्जेवर आधारीत घरांची निर्मिती होत आहे. बोईंग पेंटागोंनच्यावतीने विमान हेलीकॉप्टर असे हायब्रीड वाहन निर्मिती चालू आहे. पुण्याच्या शिर्के उद्योग समूहाच्या सायलो कणगीची रशियास निर्यात सुरू झाली आहे. पुण्यातील चंद्रकांत पाठक यांनी शेतीसाठी सायकल फवारणी पंप निर्माण केला आहे. वारस्टोस, पावलस व नोमिकोस यांनी ३ महिने आणि भूकंपाची सूचना देणाऱ्या यंत्राचा शोध लावला आहे. फ्रान्सचे गाय नेगरे यांना हवा या इंधनावर ११० कि. मी. प्रती तास चालणारी ३.२५ लाख रु. किंमतीची कार नुकतीच कार शोमध्ये प्रदर्शित केली.

**माहिती तंत्रज्ञान** – भारतीयांच्या अमेरिकेत एकूण २७० कंपन्या आहेत. भारतामधून या क्षेतातील निर्यात २६% ने वाढली आहे. तंत्रज्ञान उद्यानाचे नुकतेच कोल्हापूर येथे उद्घाटन झाले. मायक्रोसॉफ्ट कंपनीचे बील गेट्स यांनी भारतात २ हजार कोटींची गुंतवणूक करणार असल्याचे जाहीर केले. डॉ. विजय भटकर यांच्या ''नेत्रा'' या संस्थेने शाळा महाविद्यालय अशा संस्थांचे जाळे निर्माण करण्याचे काम सुरू केले आहे. संगणकातील माहितीची गुप्तता राखण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणाचा शोध घेण्याचे काम अद्यापही सुरु आहे.

**पर्यावरण** – निर्लेप पॅनद्वारे वायूप्रदूषण होत असल्याचे लक्षात आले आहे. फ्लाय अॅशपासून वस्तू बनविण्याचे तंत्रज्ञान विकसीत झाल्याने त्यामुळे होणारे प्रदूषण आता थांबेल. सॅन्सब्यूरी कंपनीने बटाट्यापासून पॅकींग तयार केले आहे. जहाजाच्या तळास दिलेल्या रंगामुळे पाण्यातील प्राण्यांमध्ये विकृती निर्माण होते. तसेच पाण्यावरील तेलाचा तवंग खाऊन टाकणाऱ्या पाच जिवाणूंचा शोध लावला आहे. पुण्याच्या आघारकर संस्थेने कीटकनाशके, खते यामुळे होणारे पाणी व जमीन प्रदूषण कमी करण्याकरता सूक्ष्मजीवांचा वापर यशस्वीपणे केला आहे. भारतात सर्वात स्वच्छ शहर म्हणून हैद्राबाद तर सर्वात प्रदूषित शहर म्हणून कानपूरची घोषणा करण्यात आली. पुण्यात इ. एम. (इफेक्टीव्ह मायकोबीअल) सोल्युशनचा दुर्गंधी कमी करण्याकरिता निर्धार संस्थेमार्फत वापर सुरू झाला आहे. ताजमहालावर कणीय पदार्थाचा तिप्पट भर काढण्यासाठी मुलतानी मातीचा उपयोग होतो आहे. जागतिक तापमानात वाढ होत असल्याचे सिद्ध झाले असून हिमनद्या मागे सरकत आहेत. त्यामुळे उष्णतेच्या लाटा, वादळ पूर इ. मध्ये वाढ झाली आहे. ज्यूट केळीपासून कॅरीबॅग

निर्मितीत बऱ्याच संशोधकांना यश मिळाले आहे. त्यामुळे प्लॅस्टिक कचरा व कॅरीबॅगमुळे होणारे प्रदूषण बरेच कमी करता येईल.

**जीवशास्त्र** - मलेरिया व हत्तीरोग प्रसार नियंत्रणासाठी सेप्टीक टँकच्या व्हेन्ट पाईपला जाणी बसवून डास नियंत्रणाचे प्रयोग शिवाजी महाविद्यालय उद्‌गीर च्या एन. एस. एस. च्या विद्यार्थ्यांनी केले. प्रदूषणामुळे सारस पक्ष्यांची संख्या कमी होत असल्याचे लक्षात आले आहे. एकूणच ३४% मासे, २५% उभयचर व ११% पक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. गिधाडांच्या संख्येत १५% घट झाल्याने त्यासाठी हरयानात एक केंद्र सुरु करण्यात आले आहे. दुर्मिळ झालेला तणमोर हातकंणगले तालुक्यात सापडला. उसावरील पांढरा लोकरी मावा या किडीवर बायर कंपनीने मेटॅसिस्टॉस व फॉलीडॉल नावाची औषधे उत्पादित केली आहेत. राजीव गुप्ता यांनी जंगली मधमाशांच्या उपयोगाने उत्पादनवाढीची अपेक्षा व्यक्त केली आहे. माईक मेंडेल यांनी कावळे, डुक्कर इ. प्राण्यंच्या बुद्धीमत्तेवरचे आश्चर्यकारक प्रयोग नुकतेच प्रसिद्ध केले आहेत. ब्राझीलच्या अमेझॉन जंगलात माकडाच्या दोन नव्या प्रजाती सापडल्या आहेत. २० ते १५० नॅनोमीटर (एक मीटरचा एक अब्जांशावा भाग) आकाराचा सर्वात सूक्ष्मजीव ऑस्ट्रेलियातील संशोधकांना सापडला आहे. वनस्पती व प्राणी यांना भावना असतात की नाही ? यावर सध्या जोरात संशोधन सुरु आहे. पेशीतील आर. एन. ए. हे जनुक नियंत्रणाचे काम करत असल्याचे लक्षात आले आहे. तसेच मागरिट फेम यांनी एस. आर. सी. प्रथिने कर्करोग पेशींना मूळपेशींपासून वेगळे करत असल्याचे दिसून आले आहे.

**जैव तंत्रज्ञान** - जगभरातील विविध शास्त्रज्ञांनी या वर्षात प्लेगचा जंतू, मलेरिया, कुष्ठरोग व कॉलऱ्याच्या जंतू तसेच तंबाखू, तांदूळ इ. चा जनुक आराखडा किंवा नकाशा तयार करण्यात यश मिळविले आहे. तसेच मानवाशी संबंधित जीन्सचा अभ्यास करताना वृद्धत्व, वाचा व भाषा, बुद्धीमत्ता, मद्यपान, कर्करोग, हृदयरोगास कारणीभूत ठरणाऱ्या जनुकांचा शोध लागला आहे.

जनुक अभियांत्रिकीतून जिवाणूंचे जीन तांदळात घुसविण्यात तसेच बी. टी. बियाणे, प्रचंड आकाराची फळे निर्मिती शक्य झाली आहे. ऊती संवर्धनातील विविध प्रयोगाबरोबरच डॉ. मातापूरकर यांना स्टेम सेलचे पेटंट अमेरिकेने दिले आहे. तसेच डॉ. फिरूझा पारीख या गर्भजलपेशीवर संशोधन करीत आहे. म्युनिचचे रूडी फ्राईज हे माणसांसाठी डिजीटल डि. एन. ए. ओळखपत्र तयार करता येईल, असे सांगत आहेत. तसेच डॉ. कार्ल फ्लिरमन्स हे जिवाणूंच्या सहाय्याने भूसुरुंग शोधण्यात यशस्वी झाले आहेत. जगातील हजारो लोकांच्या जनुक अभ्यासातून ब्रिटनचे स्पेन्सर वेल्स हे मानवजातीचा मूळपुरुष हा आफ्रिकन असावा या निष्कर्षापर्यंत पोहोचले आहेत. क्लोनिंगच्या तंज्ञाने आतापर्यंत बैल, गायी, म्हैस, माकड, मांजर यांची हुबेहुब प्रतिकृती निर्माण करण्यात शास्त्रज्ञांना यश आले. पण या तंत्राचा उपयोग मुले होत नसलेल्या जोडप्यांसाठी करण्याचा प्रयत्न इटलीतील डॉ. अँटीनोरी यांना करून जानेवारी २००३ मध्ये पहिला मानवी क्लोन जन्माला येईल असे घोषीत केले. तत्पूर्वी फ्रान्सच्या ब्रिगीट बोसेलीअर यांनी डिसेंबर २००२ मध्येच क्लोनिंग तंत्राने इव्ह मुलीचा जन्म झाल्याचे जाहीर केले. पण अजूनही ते सिद्ध व्हायचे आहे. विविध प्राणघातक व असाध्य रोगांवर प्रतिबंधक लस तयार करण्याचे शास्त्रज्ञांचे अहोरात्र प्रयत्न चालू आहेत. जैविक शस्त्रांच्या दहशतीमुळे तर या प्रतिबंधक लसी व औषधे यांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

**वैद्यकशास्त्र** - डास चावण्याचे कारण घामातील मिथाइन २ हेक्झोनॉइक ७ आक्टोनॉईक आहे. हे आता सिद्ध झाले आहे. पार्कीन्सन्स व अल्झायमर या रोगांवरील उपचाराकरिता जीन थेरपीचा शास्त्रज्ञ विचार करत आहेत. कर्करोगाची मूत्रपिंडातील गाठ काढणे, स्तनाचा कर्करोग निदान उपचाराची पुण्यात सुविधा निर्माण झाल्या आहेत. मोबाईल वापरामुळे कॅन्सर होत नसल्याचे ही आता सिद्ध झाले आहे. स्त्री लिंगी गर्भ हत्या रोखण्यासाठी सोनोग्राफी तंत्राच्या वापरावर कायद्याने निर्बंध आणले गेले आहेत. तसेच उर्ध्वपातीत गोमुत्रासाठी भारतास पेटंट मिळाले. सूक्ष्म स्फटींकांपासून पर्यायी हाड निर्मिती करण्यात एडवर्ड ॲन व सहकाऱ्यांना यश मिळाले आहे. सुगंधी द्रव्यातील डायइथील थॅलेटचा शुक्र जंतूच्या जनुकांवर परिणाम होतो, हे अमेरिकेचे हाऊसर यांनी दाखवून दिले. उत्तरप्रदेश व

बिहारमध्ये कुष्ठरोगाचे सर्वाधिक रूग्ण असल्याचे दिसून आले आहे. लठ्ठपणावरील चीनचे डाएटपील स्लीम - १० या औषध वापरावर दुष्परिणामामुळे प्रश्नचिन्ह लागले आहे. जर्मन शास्त्रज्ञांनी हिवतापावर 'फॉस्मिडोमायसीन' हे औषध निर्माण केले आहे. तसेच भारतात ए. व्ही. नारायण यांनी 'मायोडॉप्स' हे बायपास पर्यायी औषधी निर्माण केले आहे. कृत्रिम अवयव निर्मितीसाठी सिलीकॉन रबरचा उपयोग करण्यात शास्त्रज्ञांना यश मिळाले आहे. सिग्नस कंपनीच्या ग्लुकोवॉच बायोग्राफरमुळे मधुमेहींची आता विनासायास तपासणी होवू शकेल. अॅलन व्हिसेंटची यांनी सिलीकॉनपासून कृत्रिम नेत्रपटल विकसित केले आहे. इंग्लंडचे टॉमब्राऊन यांनी सदोष गुणसुत्रे शोधण्यासाठी निदान संच तयार केला आहे. मूळव्याध नष्ट करण्यासाठीचे यंत्र अकोला येथे उपलब्ध झाले आहे. दिल्ली विद्यापीठाचे प्रो. चौधरी यांनी एड्स निदानासाठी निदानसंच निर्माण केला आहे. डॉ. मालाराव चंद्राबनूदास यांनी एच.आय.व्ही. वाढ रोखणारा जैविक रेणू शोधून काढला आहे. एड्सवरील उपचारांतर्गत रोश कंपनीने 'फुझीऑन' तर हुटोन संशोधन संस्थेने 'हुईम' हे औषध बाजारात आणले आहे. १ डिसेंबर या जागतिक एड्स दिनी जाहीर झालेल्या आकडेवारीवरून एड्सची भीषणता किती तीव्र आहे हे लक्षात येते. जागतिक आरोग्य संघटनेचे 'जगा आणि जगू द्या' हे घोषवाक्य किती सार्थ आहे हे पटते.

**समारोप** - २१ व्या शतकातील सुरुवातीच्या या विज्ञान तंत्रज्ञानाच्या आढाव्यातून मानवाच्या सृष्टीतील सत्य शोधन प्रक्रियेची नितांत धडपड दिसून येते. संशोधनातून पुढे आलेले क्लोनिंग तंत्र, गर्भपेशी रोपण व एड्सच्या प्रसारातून नीतिकल्पना, नीतीमुल्ये यावर विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. हवा पाणी, अन्न व जमीन प्रदूषणाबरोबर बौद्धिक व वैचारिक प्रदूषणातून अतिरेकी निर्माण झाले असावेत असे वाटते. चंद्राचा अभ्यास नवीन ग्रहांचा शोध, मानवी जनुके इ. च्या मालकीचा व पेटंटचाही प्रश्न निर्माण झाला आहे. सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येकाला या माहितीच्या स्फोटात सामोरे जावे लागणार आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या अपरिहार्यतेमुळे प्रत्येकालाच या सर्व गोष्टींची दखल घ्यावी लागणार आहे.

२१ व्या शतकातील या सुरुवातीच्या संशोधनाची माहिती घेताना हे शतक जनुक अभियांत्रिकी, जैव - तंत्रज्ञान, अवकाश पदार्थ विज्ञान रेणवीय जीव विज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता यांचे असणार यात शंकाच नाही तरीही मानवाने माणुसकी, सहिष्णुता, करूणा यासारख्या चिरंतन मुल्यांना बाधा येणार नाही, याची काळजी घेतली तरच विज्ञान तंत्रज्ञान प्रगती सार्थ ठरेल.

जय विज्ञान तंत्रज्ञान !

■ ■ ■

**सुभाषित सरिता**

**सुख-दुःख**

सुखस्य दुःखस्य च न को अपि दाता परो ददाति इति कुबुद्धिः एषा ।
'अहं करोमि' इति वृथाऽभिमानः स्वकर्मसूत्रग्रथितो हि लोकः ॥

(अध्यात्मरामायण)

निषादराज गुहक कैकेयीला व मंथरेला दोष देऊ लागला, तेव्हा लक्ष्मण त्याला सांगतो - ''सुख आणि दुःख ही देणारा कोणी नसतो. दुसरा माणूस ती आपणांस देतो हा विचार चुकीचा आहे. 'मी करतो' हा अभिमान व्यर्थ आहे. सर्व लोक आपल्याला पूर्वजन्मीच्या कर्माच्या सूत्राने बांधलेले असतात.'' आपल्याला सुखदुःख प्राप्त होते ते आपल्याच पूर्वजन्मीच्या कर्मानुसार. त्याबाबत आपण दुसऱ्यास जबाबदार धरू नये किंवा त्यांना श्रेय देऊ नये.

दुःखितस्य निशा कल्पः, सुखितस्य एव च क्षणः ॥

(योगवासिष्ठ, प्र. ३, स. ६०-६२)

दुःखी माणसाला रात्र ही कल्पान्तकालाएवढी दीर्घ वाटते, तर सुखी माणसाला ती एका क्षणाइतकी थोडी वाटते.

# "एड्स उच्चाटनात महाविद्यालयीन युवकांचा सहभाग"

प्रा. किरण जाधव
इतिहास विभाग

आधुनिक वैद्यकशास्त्राला आव्हान देणारा भयानक व जीवघेणा आजार अशा शब्दात एड्स या रोगाला आपणास शब्दात बांधता येईल, परंतु शास्त्रीय भाषेत सांगायचं झाल्यास एड्स म्हणजे मानवी शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती हळूहळू नाहीशी करणारा आजार होय. या रोगाने त्रस्त गस्त झालेल्या रोग्याची त्यापासून सुटका करणे हे अजून तरी मृत्यूशिवाय दुसऱ्या कोणाला शक्य नाही. त्याचाच परिणाम म्हणून आज संपूर्ण जगाने एड्सचा धसका घेतला आहे. एड्स होऊ न देणे हाच त्यावरचा एकमेव आणि सर्वोत्कृष्ट उपाय आहे.

एड्सचे समूळ उच्चाटन अवघड असले तरी अशक्य मात्र नाही आणि ही सर्वस्वी जबाबदारी आहे समाजातील तरुण वर्गाची, त्यातल्या त्यात खऱ्या अर्थाने महाविद्यालयातील युवकांची. युवक हा समाजाचा राष्ट्राचा आधार असतो. युवक ही फार मोठी शक्ती आहे. भारताकडे पाश्चात्य राष्ट्रांच्या तुलनेत युवाशक्ती मोठ्या प्रमाणात आहे. म्हणूनच हे आव्हान त्यांनी स्विकारले पाहिजे. एड्सचे समूळ उच्चाटन होईपर्यंत अविश्रांतपणे हे महान मानवतावादी कार्य करत राहिले पाहिजे.

महाविद्यालयातील युवकाने आपली जबाबदारी ओळखून या रोगाच्या निर्मुलन कार्यात प्रत्यक्ष समाजात जाऊन कार्य करणे आवश्यक आहे. या रोगापासून दूर राहणे कसे राहणे कसे शक्य आहे, त्यासाठी काय करावे अथवा करू नये याबाबतची माहिती समाजाला ज्ञात करून दिली पाहिजे.

एड्सचा म्हणजे एच.आय.व्ही.चा संसर्ग होण्याची खालील कारणे आहेत.

१. असुरक्षित लैंगिक संबंध
२. एच. आय. व्ही. बाधीत रक्ताद्वारे
३. दूषित सुया किंवा सिरिंजेस
४. एच. आय. व्ही. ग्रस्त मातेकडून होणाऱ्या अपत्यास जन्मापूर्वी, जन्म देतांना किंवा स्तनपानाद्वारे

या कारणांचा विचार करून महाविद्यालयीन युवकाने एड्स निर्मूलन कार्य योजनाबद्ध रितीने केले पाहिजे. यासाठी समाजात या विषयावर आधारीत चर्चासत्र कृतीसत्र नागरिकांच्या सक्रीय सहभागाने घडवून आणली पाहिजेत. एड्सबाबत अनेक समाज गैरसमज समाजात निर्माण झाले आहेत. उदा. एड्स हा संसर्गजन्य (हवा, पाणी, स्पर्श इ.) रोग आहे. त्यामुळे एड्सच्या रुग्णाला उपेक्षित जीवन जगावे लागते.

एड्सची खास अशी काहीच लक्षणे नाहीत. रक्ततपासणीशिवाय त्याची लागण झाली आहे किंवा नाही हे सांगता येत नाही. त्यामुळे महाविद्यालयाने काही सामाजिक संस्थांच्या सहकार्याने रक्त तपासणी शिबीरे आयोजित केली पाहिजे. एखादी गोष्ट वारंवार सांगितल्यास तिचे महत्त्व पटते. म्हणून सातत्याने यासंदर्भात जागृती (Hammering) केल्यास त्याचे चांगले परिणाम बघायला मिळतील.

सुदेवाने आपल्या देशाला चांगली सांस्कृतिक परंपरा आहे. या महान संस्कृतीने कितीतरी चांगली मूल्ये सांगितली आहेत. चांगल्या चारित्र्याला समाजात महत्त्व आहे, अतिशय चांगली अशी ग्रंथसंपदा आपल्याला लाभली आहे. परस्त्रीला मातेसमान मानले जाते. अशा महान संस्कृतीचे जतन, संवर्धन आपण केले पाहिजे. महाविद्यालयीन युवक हा सर्वार्थाने चारित्र्यसंपन्न असावा. महाविद्यालयीन युवकाने आपल्या गुणदोषांकडे लक्ष देवून स्वतःचे परिक्षण केले पाहिजे. एड्सचे उच्चाटन करतांना अशा चारित्र्यसंपन्न युवकांचीच गरज आहे. हा युवक जर सर्वगुणसंपन्न होऊन महाविद्यालयातून बाहेर पडला तर एड्सचे उच्चाटन लवकर होईल.

समाजाला जागरूक करण्यासाठी प्रथम हा युवक स्वत: जागरूक असणे गरजेचे आहे. महाविद्यालयीन पातळीवर काही संस्था स्थापन करुन त्याद्वारे समाजात एड्स जागृतीसाठी मोहिमा काढल्या पाहिजे. एड्सचा प्रसार होण्याची शक्यता वेश्यावस्तीत जास्त असते. वेश्यावस्तीत जाऊन त्यांना एड्सबाबत सर्व प्रकारची माहिती समजावून सांगितली पाहिजे. लैंगिक संबंध सुरक्षित असावा याबाबत जागरूक राहणे कसे आवश्यक आहे हे त्यांना समजावून सांगितले पाहिजे. त्यांच्या प्रबोधनासाठी जास्त प्रयत्न करणे आवश्यक आहे. वेश्यामधील जागरूकतेने आपल्या कार्यातील एक महत्त्वाचा टप्पा साधला जाणार आहे. म्हणून त्यांना लक्ष्य बनवून हे काम पुढे नेणे आवश्यक आहे.

एड्सग्रस्त व्यक्तीच्या रक्तात एच.आय.व्ही. हे विषाणू असतात. अशा व्यक्तीचे रक्त दुसऱ्या व्यक्तीला दिले जाऊ नये म्हणून युवकांनी अभ्यासपूर्ण योजना आखल्या पाहिजे. रक्तदान करतांना त्या रक्तदात्याची एच.आय.व्ही. चाचणी झाली पाहिजे. आपल्या नजिकच्या रक्तपेढ्या कशा प्रकारे रक्त गोळा करतात. याची पाहणी युवकांनी केली पाहिजे आणि अयोग्य यंत्रणेला विरोध केला पाहिजे. महाविद्यालयात रक्तदात्यांची सूची केली पाहिजे. म्हणजे गरज भासल्यास रुग्णाला एच. आय. व्ही. चाचणी करण्याचा आग्रह धरून रक्त दिले जाईल. एड्सचा प्रसार शीरेमधून मादक द्रव्य घेणारे, एकाच सुईने गोंदवून घेण्याने होणे शक्य असल्याने त्याबाबत जागृती केली पाहिजे. आपल्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सूया व सिरिंजेस जंतूविरहीत असाव्यात असा आग्रह धरणे, प्रत्येक व्यक्तीचा हक्क आहे. या हक्काची इतरांना जाणीव करून देणे महाविद्यायलीन युवकांचे काम आहे.

एड्स झालेली स्त्री एड्सग्रस्त अपत्याला जन्म देण्याची शक्यता अधिक असते. अशी मुले ५ वर्षापेक्षा अधिककाळ जगू शकत नाही. तेव्हा लग्नापूर्वीच एच.आय.व्ही. चाचणी करून घ्यायला पाहिजे. गर्भारपणाच्या काळात एखादी स्त्री रक्त तपासणीत एच. आय. व्ही. ग्रस्त आढळल्यास अशा स्त्रीने सरकारनमान्य संस्थांद्वारे गर्भपात करवून घेतला पाहिजे. महाविद्यालयीन युवकांनी अशा जाणीवा घडवण्यात आपले योगदान दिले पाहिजे.

महाविद्यालयीन युवकांना विशेषत: विवेक वाहिनी, एन.एस. एस., एन. सी. सी. नशाबंदी मंच इ. मधील स्वयंसेवकांना एड्स उच्चाटनासाठी बरेच काही करता येणे शक्य आहे. आपल्याकडे गणेशोत्सव नवरात्र यासारखे उत्सव मोठ्या गर्दीने व उत्साहाने साजरे होतात. अशा उत्सवांच्यावेळी काही मंडळांच्या सहाय्याने व स्वयंसेवकांनी माहिती केंद्रे स्थापन करून एड्सबाबत जागृती घडवता येईल. तसेच स्टेजवर काही कार्यक्रम सादर करता येतील. काही पथनाट्ये करता येतील.

महाविद्यालयाने आपल्या नजीकचा परिसर निवडून एड्सबाबत जागृतीचे काम केले पाहिजे. एड्सची माहितीपत्रके छापून ती लोकांपर्यंत पोहचवली पाहिजे. विवाह समारंभाला महाविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणून हजर राहावे. नव दांपत्याला शुभेच्छांसह एड्सबाबत माहिती पुस्तिका द्यावी. मानवतावादी भावनेने प्रेरीत होऊन महाविद्यालयातील युवाशक्तीने आपले तन-मन-धन अर्पण करून आपल्या देशातील हा जीवघेणा रोग समूळ नष्ट केला पाहिजे.

महाविद्यालयीन युवकांना या संदर्भात कार्य करायला भरपूर वाव आहे. ही युवाशक्ती जागृत राहून हे कार्य साध्य करेल असा विश्वास आपल्या देशातून व्यक्त केला जात आहे. महाविद्यालयीन युवकांच्या सहभागाने आपला देश एड्समुक्त होऊन सर्व जगापुढे आदर्श घालून देईल यात शंका नाही.

■ ■ ■

> **जेव्हा माणूस तरुण असतो त्या वेळी त्याला मित्र असणे ही चांगलीच गोष्ट आहे, परंतु खरोखर ज्या वेळी तुम्ही वृद्ध होता त्या वेळी मित्र असणे ही जास्त चांगली गोष्ट असते. जेव्हा तुम्ही तरुण असता त्या वेळेला तुम्हाला मित्र असणे ही इतर गोष्टींप्रमाणेच सहज ओघाने येणारी गोष्ट आहे. परंतु तुमच्या म्हातारपणीच्या दिवसात मित्र असणे म्हणजे काय याचा खरा अर्थ तुम्हाला समजू लागतो.**

# इंडो जर्मन पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम – दृष्टिक्षेत्रात धामणगाव आवारी

-प्रा. अभिमन्यू केदार
कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते
विज्ञान महाविद्यालय अकोले

**भा**रत खेड्यांचा देश म्हणून थोडक्यात ओळखला जातो. भारताचा खरा चेहरा खेड्यातच दिसतो. म्हणून खेड्याकडे चला असे आवाहन म. गांधींनी केले. 'स्वयंपूर्ण खेडे' हे त्यांच्या ग्रामराज्य व रामराज्याच्या कल्पनेतील मुख्य स्वप्न होते. खेड्याच्या विकासाचा पाया शेती असून त्यासाठी पाणी उपलब्ध करून देणे शेती विकासाबरोबरच लघुउद्योग व पूरकव्यवसायाला प्रोत्साहन मिळाले पाहिजे. म्हणून गावात उच्चजीवनाची अभिलाषा जागविणे आवश्यक आहे. आत्मकर्तृत्वाबरोबरच आत्मविश्वास निर्माण करावा लागतो. श्रमावर विश्वास ठेवणाऱ्या व दुबळ्यांना हात देणाऱ्या व्यासपीठाचा सुयोग्य उपभोग केला पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजना ही एक चळवळ बनली पाहिजे. त्या द्वारे राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक विद्यार्थी, कार्यक्रम अधिकारी वरील आवाहन स्वीकारू शकतात. त्यासाठी त्यांना समाज विकासाची लढाई लढावी लागेल. या लढाईचे मुख्य उद्दिष्ट ''खेड्यांचा चौफेर विकास'' असले पाहिजे या पूर्तीसाठी पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हे एकच उत्तर आहे.

वरील विचाराने झपाटलेल्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिटने आव्हान स्विकारले आणि पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हा अभिनव उपक्रम धामणगांव आवारी येथे पुर्ण केला. अशा प्रकारचा भव्य उपक्रम पुर्ण करणारे अकोले महाविद्यालय ही एकमेव शैक्षणिक संस्था आहे.

धामणगाव आवारी हे गांव चार हजार लोकवस्तीचे असून त्यामध्ये ३०% आदिवासी असून बाकीचा इतर समाज आहे. हे गाव चोहोबाजूंनी डोंगरांनी वेढलेले असून एकूण १८४० हेक्टरचा परिसर त्याला लाभलेला आहे. अकोले ह्या तालुक्याच्या गावापासून दक्षिणेस ५ कि. मी. अंतरावर हे गाव आहे. आज या गावाचा चेहरा पुर्णपणे बदलून गेला आहे. त्याचे एकमेव कारण म्हणजे पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम होय.

**पार्श्वभूमी** – कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोले मधील राष्ट्रीय सेवा योजनांतर्गत धामणगांव आवारी हे गांव १९९२ मध्ये रा. से. यो. चे विशेष हिवाळी शिबीर चालू असतांना इंडो जर्मन पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पाचे प्रणेते मा. फादर बाकर यांनी शिबीरास भेट दिली. शिबीरार्थीचे श्रमदान पाहून आपले महाविद्यालय योग्य प्रकल्प राबवू शकेल, असा विश्वास व्यक्त केला. धामणगाव आवारी हे गाव पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमासाठी योग्य आहे, असे सुचवून या गावासाठी प्रकल्प तयार करण्यास सांगितले.

१९९२ ते १९९४ या दोन वर्षांच्या काळात सोशल सेंटर अहमदनगर यांचे मार्गदर्शनाखाली संपुर्ण क्षेत्राचा तांत्रिक दृष्टिकोनातून प्रकल्प तयार करण्यात आला. तो नाबार्ड बँकेकडे पाठवल्यानंतर १ एप्रिल १९९५ पासून इंडो जर्मन पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमास मान्यता देण्यात आली. ही मान्यता राष्ट्रीय सेवा योजना कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोले जि. अहमदनगर या स्वयंसेवी संस्थेस (एन. जी. ओ.) मिळाली. आमचे राष्ट्रीय सेवा योजना युनिट एनजीओ म्हणून मान्य करून या प्रकल्पाची पुर्ण जबाबदारी त्याच्यावर टाकण्यात आली. या प्रकल्पासाठी एक कोटी तेरा लाख रुपये मंजूर करण्यात आले. आजपर्यंत एनजीओ म्हणून राष्ट्रीय सेवा योजना व महाविद्यालय चोखपणे आपली भूमिका पार पाडत आहे. या भूमिकेतून धामणगाव आवारी 'स्वयंपुर्ण खेडे' म्हणून आज पुढे आलेले आहे.

**प्रकल्प पूर्व परिस्थिती** – धामणगांव आवारी आज स्वयंपुर्ण खेडे व मा. अण्णा हजारे, प्रसिद्ध समाजसेवक यांच्या कल्पनेतील आदर्श गाव या कल्पनेप्रमाणे प्रसिद्धीस येत असले तरी त्या अगोदर या गावची परिस्थिती समजून

- पडीक जमीन वहीतीखाली आली बागायती क्षेत्र वाढले. टॉमेटो, कांदा, कोबी, फ्लॉवर, वालवड, लिंबू, उस इ. भाजीपाला व नगदी पिकांमध्ये वाढ झाली. आज जवळ जवळ २ कोटींची दरवर्षी उलाढाल होते.
- चारा वाढला, पशुधन वाढले, आज २५०० लिटर दुध संकलन होते. यातून रू. ५० लाखाची दरवर्षी उलाढाल होते.
- भूमिहीनांना व मजुरांना शेतकऱ्यांची वाट्याने शेती मिळाली. त्यातून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न तर मिळालेच शिवाय स्थलांतर थांबले.
- सातवीपर्यंत प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालय, बालवाड्या, साक्षरता वर्ग सुरू झाले. साक्षरतेत वाढ, पद्मश्री दया पवार वाचनालय सुरू झालेले आहे.
- रस्ते, दळणवळण वाढ, एस.टी.ची सोय झाली. फोन, ड्रेनेज, नळपाणीपुरवठा, शौचालय इ. सुविधा तसेच खाजगी वाहनांची भाजीपाला वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणावर सोय झालेली आहे.
- शुद्ध पाणी पुरवठा, आरोग्य तपासणीसाठी पुर्णवेळ परिचारिका कार्यरत असून. खाजगी डॉक्टर या गावात मोठ्या प्रमाणावर सेवा देत आहे. थोड्याच काळात प्राथमिक आरोग्य केंद्र उभे राहणार आहे.
- भांडणतंटे कमी झाली. एकोप्यात वाढ झाल्याने सर्वच संस्थांच्या निवडणुका बिनविरोध होतात.

**विशेष परिवर्तन** - शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली आज कर्जवसुली चांगल्याप्रकारे होते. विहीरीची संख्या वाढली. त्यातून बारामाही पाणीपुरवठा होतो. तीन पिके घेतली जातात.

**१९९५ पासून चालू असलेला इंडो जर्मन पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम** - धामणगांव आवारी डिसेंबर - २००० अखेर पुर्ण झाला. या प्रकल्पाद्वारे स्वयंपुर्ण खेडे ही संकल्पना पुर्णत्वास आणण्यासाठी कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले मधील राष्ट्रीय सेवा योजना युनिटने प्रयत्न केले. हा प्रकल्प मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांचे मार्गदर्शनाखाली प्रकल्पाचे संयोजक, रा. से. यो. चे अहमदनगर जिल्ह्याचे समन्वयक व कार्यक्रम अधिकारी प्रा. अभिमन्यू केदार यांचे सहकारी कार्यक्रम अधिकारी प्रा. संजय ताकटे, प्रा. महेंद्र बाणाईत, प्रा. अविनाश झांबरे, प्रा.बापु आवारी, प्रशासकीय कर्मचारी, धामणगाव आवारी ग्रामस्थ, प्रकल्प अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व स्वयंसेवक इ. संयुक्त योगदानातुन हा अभिनव प्रकल्प पुर्णत्वास आला.

हे काम पाहून पुणे विद्यापिठाने अकोले महाविद्यालयास रा. से. यो. उत्कृष्ट एकक हा पुरस्कार दिलेला आहे.

यावेळी मा. डॉ. बाबा आमटे यांचे विचाराची आठवण येते. ते म्हणतात. ''एकत्र येणे ही सुरुवात आहे. टिकून राहणे ही प्रगती, मिळून कार्य करणे म्हणजे यश.''

■ ■ ■

सुभाषित सरिता

**मृत्यू**

**अहनि अहनि भूतानि गच्छन्तीह यमालयम्।**
**शेषाः स्थावरम् इच्छन्ति, किम् आश्चर्यम् अतःपरम्।**

''सर्वात मोठे आश्चर्य कोणते ?'' या यक्षाच्या प्रश्नास उत्तर देताना युधिष्ठिर म्हणतो, ''दिवसानुदिवस प्राणिमात्र यमसदनास जातात, (पण) राहिलेले प्राणी आपण कायमचे जिवंत रहावे असे इच्छितात, यापेक्षा अधिक आश्चर्य ते कोणते ?'

**मृत्योः बिभेषि किं बाल, न स भीतं विमुञ्चति।**
**अद्य वा अब्दशतान्ते वा मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः॥**

अरे मूर्ख माणसा, तू मृत्यूला का भितोस ? मनुष्य भ्याला आहे. म्हणून काही मृत्यू त्याला सोडून देत नाही. आज किंवा शंभर वर्षांनी का होईना, प्राण्यांचा मृत्यू निश्चित आहे.

मृत्यू हा अटळ आहे, म्हणून त्याला न भिता मनुष्याने आपले कार्य करीत रहावे.

# वर्तमान समाज स्थिती और गति

– प्रा. देवीदास चौधरी

संपूर्ण समाज मे आज एक विचित्र परिस्थिती दिखाई दे रही है। असली बात को कम तथा नकली बात को ज्यादा महत्त्व दिया जा रहा है। आदमी का आदमी पर विश्वास नही है। आदमी समय समयपर चाले चलकर अपना उल्लू सिधा करने की ठाण रहा है। छात्रों का अध्यापक पर और अध्यापकों का छात्रोंपर विश्वास नही है। गुरु और शिष्य का पवित्र नाता समाप्त होने जा रहा है। छात्रो को शिक्षा बेकार नजर आती है यह हमारा दुर्भाग्य है।

आज के इस तडक भडक जमाने में नीति, मूल्य, सदाचार, सच्चाई लुप्त हो रही है। किसी भी बात को आधुनिकता का टच दिया जाता है। मनुष्य के जीवन में कृत्रिमता आ गई है। समाज सच्चाईयोंको खुलकर सामने प्रकट करने की अपेक्षा झूठी बातें सच सिद्ध हो रही है। स्त्री, पुरुष, बच्चे और बुढे विचित्र परिस्थितीयोंसे गुजर रहे है। क्या करना चाहिये और क्या नहीं यह बात उनकी समझ मे नही आ रही है।

आज की फिल्मे, दूरदर्शन तथा विभिन्न प्रकार के चैनलोंपर नंगी औरतें नाचती हुई, जिसका अभिनय कम कामुकता ज्यादा दर्शाने के कारण युवा पीढी पर इसका बहुत गहरा असर बहुत ही जल्दी हो रहा है। इसी बजह से समाज में गलतधारणाओं एवम् मापदण्डो को सहारा मिल रहा है। जो नही दिखाना चाहिये वह क्लिअर दिखाया जाता है। हिंदी फिल्म के गीत की चंद पंक्तियाँ देखे –

''अब ना छिपाऊंगी, सबको बताउंगी, तुझे कसम से मै अपना बनाऊंगी,''

''तू ने किया है मुझे प्यार ओए दिल तेरा आशिक।''

फिल्मों मे तथा दूरदर्शन पर जो दिखाया जाता है। उसी को सच्चा जीवन हम मान बैठे है। विवाह बाह्य संबंध रखना तो मानो फैशन बन गया है।

किसी भी मार्ग से क्यों न हो पैसा कमाना बदनाम होकर नाम कमाना, नकली जीवन से सुख प्राप्त कर लेना, दुसरों को धोखा देना जो अपने पास नही है वह दिखाने का प्रयत्न करना, दुसरों की उन्नती अच्छी न लगना, दुसरों के रास्ते में रूकावटें पैदा करना, भ्रष्टाचार, रिश्वत को जीवन से अलग न करना आदि बातों को ही लोगों ने सफल जीवन जी लेना समझ लिया है। वास्तव मे 'सफल जीवन' को समझने की आवश्यकता कोई भी नही जानना चाहता। मनुष्य का पल में मूल्यांकन करना, किसी व्यक्ती पर किसी भी प्रकार का गंभीर आरोप करना, किसी को लक्ष्य बनाना, एक को खूश करने के लिए दुसरे को पीडा पहुँचाना आदि बातो मे बुद्धिमान लोगों ने अपनी बुद्धी खपा दी है। जो अपने हित का है, उसे बुरा होते हुए अच्छा कहना और जो अपने हित का नही है, उसे बुरा होते बुए अच्छा कहना। दूसरों की जान पर खेलना, कपडे जैसे विचार और सिंद्धांत बदलना स्वयं को पंडीत बताकर दुसरों को मुर्ख समझना मनुष्य का स्थायीभाव बन गया है।

समाज की सूरत ही बदल गई है। देवात्मा, धर्मात्मा, जैसे दिखानेवाले लोग शैतानी बर्ताव कर रहे है। राजनिती से कानून से लोगों का विश्वास उठ गया है। गुनाहगार खुलेआम घुमते है और बेगुनाह लोगों को सजा फर्मायी जाती है। इसका नतीजा है कि जज की भरी अदालत मे जूतों से पिटाई की जाती है। आए दिन लोगों पर अन्याय एवं अत्याचार के खिलाफ बोलता है तो उसकी बोलती हमेशा